म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. १६९०

सन

द्वीमि क्र.ऊ. १७५

निबंध
१६९०

१७५
सं.क्र. १६९०

राष्ट्रीय प्रकाशन

निबंध

# राष्ट्रीय प्रदर्शन,

इ. स. १८८३-८४ सालीं

## कलकत्ता येथें झालें तें.

हें पुस्तक,


## रामचंद्र भिकाजी गोखले

यांणीं लिहिलें.



पुणें येथें

शिराळकर आणि कं० यांच्या ‘आर्यविजय’ छापखान्यांत छापिलें.

---

सन १८८८.

---

किंमत सहा आणे.

# प्रस्तावना.

सामान्यतः प्रदर्शन या विषयावर ग्रंथ लिहिणाराच्या अंगीं मोठें ज्ञान व विद्वत्ता हीं पाहिजेत. तसेंच कलकत्ता येथें झालेल्या प्रदर्शनांतील महान् संग्रह अवलोकन करून त्याची बरीशी माहिती मिळविण्यास तें संपेपर्यंत तेथें राहिलें पाहिजे होतें. पहिल्या गोष्टीच्या संबंधानें आम्ही कमकुवत आहों; दुसऱ्या गोष्टीच्या संबंधानें एवढा काल तेथें राहण्यास असावीं तीं साधनें नसून आम्हांस सवडही नव्हती.तथापि 'अंधांमध्यें काणा श्रेष्ठ' या म्हणीवर केवळ भरंवसा ठेवून आम्ही या कामास प्रवृत्त झालों. जे लोक हें प्रदर्शन पाहून आले आहेत, ते, प्रदर्शनांत जो पदार्थसंग्रह दाखविला होता, त्याच्या शतांशाची किंवा सहस्त्रांशाचीही माहिती या लहान पुस्तकांत आलेली नाहीं असें म्हणतील, हें आम्ही समजून आहों; व हें त्यांचें म्हणणें अगदीं यथार्थ होईल म्हणून आमचेंच मन साक्ष देतें. तथापि ज्या लोकांस हें प्रदर्शन स्वतः पहाण्याचा अलौकिक लाभ मिळालेला नाहीं किंवा ज्यांस पुस्तकद्वारें किंवा वर्तमानपत्रद्वारें त्याजविषयीं कांहीं माहिती होण्याचा मार्ग नाहीं, अशा लोकांच्या फायद्याकरितां वर सांगितलेल्या म्हणीवर अवलंबून हा उद्योग आम्हीं आरंभिला.

हें काम हातीं घेण्यास आणखी एक कारण असें झालें कीं, कांहीं यात्रा करावी व उत्तर हिंदुस्थान पहावें असा आमचा फार वर्षें उद्देश होता; आणि कलकत्ता येथें बडें प्रदर्शन होण्याचें ठरलें म्हणून समजलें तेव्हां तें पहावयास जाण्याचा व वर सांगितलेला उद्देश सिद्धीस नेण्याचा आम्हीं विचार ठरविला असतां **श्रीमंत त्रिवर्ग कुरुंदवाडकर** यांनीं आम्हांला या कामीं उत्तेजन देऊन अशी आज्ञा केली कीं, प्रदर्शनांत ज्या गोष्टी विशेष महत्त्वाच्या किंवा चमत्कारिक दृष्टीस पडतील त्याची आपल्या माहितीकरितां कांहीं टिपणें करून आणावीं. या आज्ञेस अनुसरून आम्हीं तेथें अधिक दि-

वस राहून कांहीं टिपणें करून घेतलीं. तींच पुढें एकत्र जुळून हें लहानसें पुस्तक प्रिय वाचकांस नजर केलें आहे. यांत कांहीं गुणलेश दृष्टीस पडेल तर हा लेख त्यांच्या आश्रयास पात्र होऊन आम्हीं केलेल्या श्रमाचें सार्थक्य होणार आहे; नांहीं पेक्षां अशा उद्योगाचा शेवट काय होत असतो हें सर्वांस माहीत आहेच! असो ; हें पुस्तक छापून प्रसिद्ध होण्यास अनेक कारणांमुळ कालातिक्रमण फार झालें याजकरितां आम्ही मोठे दिलगीर आहों.

# उपोद्घात.

दा. क. ...........

या प्रदर्शनाचे मूल स्थापक जे एम्. जोबर्ट साहेब यांनी कांहीं लोकांच्या विनंतीवरून सामान्यतः प्रदर्शन या विषयावर व मुख्यत्वें त्या वेळीं पुढें चालू होणार होतें त्या प्रदर्शनावर कलकत्ता येथील बेंथून सोसाइटीच्या सभेपुढें जें व्याख्यान दिलें त्यांतील थोड्या भागाचा तर्जुमा येथें देतों; त्याजवरून प्रदर्शन म्हणजे काय, त्याचें महत्व, व त्याजपासून होणारे फायदे यांजविषयीं वाचकांस कांहीं कल्पना येणार आहे.

प्रदर्शन म्हणजे पदार्थ किंवा संपत्तिसंग्रह याचें लोकांस दाखविणें; असा या शब्दाचा अर्थ घेऊन त्याचें बीजारोपण युरोप खंडांत शेंकडों वर्षांपासून चालू असल्याचें त्यांनीं सांगितलें. या अर्थानें पाहिलें असतां आपल्या देशांतही निरनिराळ्या स्थलीं ज्या लहान मोठ्या जत्रा भरून त्यांत नानाप्रकारचे पदार्थ किंवा जनावरें विकावयास येतात, त्या जत्रांस प्रदर्शनें म्हटलीं असतां शोभेल. हीं प्रदर्शनें आपल्या येथें हजारों वर्षांपासून होत असल्याचें सर्वांस विदितच आहे. युरोप खंडांत खरीं प्रदर्शनें चालू शतकाच्या मध्यापासून सुरू झालीं. गेल्या पंचवीस तीस वर्षांपासून साहेब लोकांच्या आश्रयानें आपल्या देशांत फलें, पुष्पें, भाजीपाला, शेतकीचें उत्पन्न, जनावरें, स्त्रियांनीं हस्तकौशल्यानें केलेलीं कशिद्याचीं व दुसरीं शिवणकामें इत्यादि वस्तूंचीं प्रदर्शनें होऊं लागलीं आहेत.

याप्रमाणें प्रदर्शन शब्दाचा अर्थ व आरंभ हें सांगून इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी, आस्त्रिया, रशिया, इटली इत्यादि देशांत व अमेरिका व आस्त्रेलिया या खंडांत आलीकडे पांचपन्नास वर्षांत जीं अनेक प्रदर्शनें होत आलीं त्यांतील कांहींची ठोकळ माहिती दिली; तींतील चारपांच प्रदर्शनांविषयींचें टिपण आम्हीं शेवटीं जोडलें आहे. त्याजवरून प्रदर्शनाचें महत्व वाचकांच्या लक्षांत येईल. कलकत्ता येथें त्या कालीं होणाऱ्या प्रदर्शनाच्या संबंधानें एम्. जोबर्ट यांनीं

असें बोलून दाखविलें कीं, इ० स० १८९१ वर्षी लंडन येथें जें बडें प्रदर्शन झालें त्याच्या इमारतीनें जेवढी जागा व्यापिली होती तिजपेक्षां सांप्रत झालेल्या इमारतीनें अधिक व्यापिली होती. तसेंच सांप्रतची इमारत तयार करण्यास तिजपेक्षां खर्च कमी लागला असून प्रदर्शनांत दाखविण्यासाठीं पदार्थ पाठविणारांची संख्या वरील प्रदर्शनांत पाठविणारांच्या संख्येहून दुपटीपेक्षां जास्त होती. सांप्रत झालेल्या प्रदर्शनाच्या इमारतीच्या संबंधानें एक गोष्ट विशेष लक्षांत ठेवण्यासारखी आहे; ती अशी कीं, आपण जेवढी जागा मागितली होती तिजपेक्षां फार कमी मिळाली म्हणून पुष्कळ लोकांची कुरकूर आमच्या कानीं आली; यावरून सर्वांच्या मागण्याप्रमाणें जागा देण्यांत आली असती तर याहीपेक्षां अधिक मोठी इमारत बांधावी लागती.

आतां लंडन येथें जें प्रदर्शन इ० स० १८९१ सालीं झाल्याचें वर सांगितलें आहे त्याजविषयीं थोडी माहिती देतों, म्हणजे सांप्रत झालेल्या प्रदर्शनाचें खरें स्वरूप वाचकांच्या लक्षांत येईल. तें प्रदर्शन आपल्या महाराणी साहेब यांचे प्रिय भ्रतार प्रिन्स आलबर्ट यांनीं सुचविलेल्या बेतास अनुसरून झालें होतें. त्यास राजाश्रय होता. त्याजकरितां जी इमारत तयार केली होती, तिचें क्षेत्रफळ वीस चौरस एकर होतें. ती तयार करण्यास सुमारें एकोणिस लक्ष रुपये खर्च आला होता. तें साडेचार महिने चालू होतें. त्याचें रोख उत्पन्न सुमारें पन्नास लक्ष रुपये आलें. त्यांत दाखविण्याकरितां पदार्थ पाठविणारांची संख्या चौदा हजार होती; पैकीं निम्मे ग्रेटब्रिटन येथील व बाकीचे पृथ्वीवरील अन्य देशांतून आले होते. तें पहावयास एकंदर साठ लक्ष लोक गेले होते. आंत पहावयास जाणाऱ्या लोकांकडून नुसतें दरवाज्यावरील फीचें उत्पन्न बेचाळीस लक्ष रुपये झालें होतें.

अशा प्रकारचीं प्रदर्शनें करण्यापासून कोणते फायदे होतात याजविषयीं थोडेंसें निरूपण करितों. प्रदर्शनांच्या योगानें आपल्या देशाचें दुसऱ्या देशांशीं दळणवळण वाढून कोणत्या देशांत कोणते

पदार्थ उत्पन्न होतात हें ज्ञान होतें. मग ते सृष्टिजन्य असोत, अगर कृत्रिम असोत. कृत्रिम असल्यास ते तयार करण्यास आवश्यक जी कला ती त्या देशांत पूर्णावस्थेंत किंवा मध्यमावस्थेंत आहे हें समजतें. त्यांच्या योगानें कोणत्या देशांतील लोकांस कोणते पदार्थ त्यांच्या ऐषआरामास किंवा नित्य व्यवहारास जरूर लागतात हें कळून येतें. त्यांच्या योगानें कारागीर लोकांत मोठी ईर्षा उत्पन्न होऊन कलाकौशल्यास व व्यापारास चांगलें उत्तेजन मिळतें, आणि त्यांचा विशेष प्रसार होतो. त्यांच्या योगानें मनुष्याचें ज्ञान, जिज्ञासा, सुख, व हौस हीं वाढतात, आणि सर्व प्रकारचे गैरसमज नाहींसे होतात. कारागीर व उदमी लोकांस आपल्या मालाची पृथ्वीवर जाहिरात देण्यास प्रदर्शन हें एक मोठें साधन आहे. सारांश पृथ्वीवरील सर्व द्रव्यरूप सृष्टि, नवीन शोध व सुधारणा यांचें तें भांडारगृहच आहे.

प्रस्तुत प्रदर्शनाचे स्थापक व पुरस्कर्ते कलकत्ता सरकार असेल अशी कांहीं लोकांची समज आहे, पण ती चुकीची आहे; कारण एम्. जोबर्ट हे याचे खरे स्थापक असून त्यांनीं याकरितां होणाऱ्या सर्व जमाखर्चाची जबाबदारी आपल्यावर घेतली होती. आतां या महान् कृत्यास सरकारचा आश्रय म्हटला म्हणजे परकीय व एतद्देशीय राजेरजवाडे, कारागीर, व्यापारी व कारखानदार, इत्यादि लोकांस प्रदर्शनांत दाखविण्यासाठीं पदार्थ पाठविण्याविषयीं शिफारसपत्रें पाठविणें, प्रदर्शनगृहास जागा देणें, तेथें बंदोबस्त राहण्यास व बाहेरून जो माल दाखविण्यास येईल त्याची अफरातफर न होण्याकरितां पोलिसाची मदत देणें, तसेंच आपल्या लहानमोठ्या कामगारांस त्यांच्यानें होईल तेवढी मदत करण्याविषयीं शिफारस करणें अगर परवानगी देणें एवढा होता. द्रव्यसंबंधानें पाहिलें असतां प्रदर्शनानिमित्त एक पक्की इमारत बांधली असून तिचा सर्व खर्च देऊन ती विकत घेण्याचें सरकारानें कबूल केलें होतें.

या प्रदर्शनसंबंधी एकदर जमाखर्चाची माहिती बरोबर समजली नाहीं; तथापि तें चालू होण्यास लाखों रुपये खर्च झाले असतील व

उत्पन्नही लाखों रुपये झालें असेल, असें पुढील हकीकतीवरून लक्षांत येणार आहे. आम्ही तें पहावयास सुमारें एक महिना दररोज जात होतों. प्रदर्शनगृहांत जावयास तीन प्रशस्त द्वारें ठेविलीं होतीं. तरी आगगाडीच्या मोठ्या स्टेशनावर तिसऱ्या क्लासाचें तिकिट काढण्यास लोकांच्या गर्दीमुळें जशी कांहीं वेळ धकाबुकी सोसावी लागते त्याप्रमाणें येथें आंत जाते वेळीं केव्हां केव्हां सोसावी लागे, यावरून तें पहावयास दररोज पंधरा वीस हजार तरी लोक येत होते; व यावरून या लोकांच्याच फीचें उत्पन्न दर दिवशीं चार हजार रुपये आलें असावें असें आमचें अनुमान आहे. प्रदर्शन ९६ दिवस चालू असून प्रेक्षक लोकांची संख्या दिवसेंदिवस वाढती होती.

आपल्या देशांतील लोकांस द्रव्यसामर्थ्य व जिज्ञासा हीं चांगलीं अनुकूल असतीं तर याजपेक्षां दुपटीनें ज्यास्त लोक आले असते असें आम्हांस वाटतें. कारण युरोप, आस्ट्रेलिया या खंडांतील व आपल्या खंडांतील दूरदूरच्या देशचे शेंकडों लोक आपले पदार्थ दाखविण्यास व प्रदर्शन पहाण्यास पदरचे हजारों रुपये खर्च करून व महिना दीड महिना वाट चालून आले होते; या मानानें पाहिलें असतां आपल्या देशांतील लोक यावे तितके मुळींच आले नव्हते. आपल्या इलाख्यांतील म्हणजे पुणें, मुंबई वगैरेकडील लोक नाताळच्या सुटींत देखील प्रदर्शनगृहांत आम्हांस फार थोडे आढळले.

याप्रमाणें दरवाज्यावर येणाऱ्या दररोजच्या फीच्या उत्पन्नाचा अंदाज वर दाखविला. याशिवाय प्रदर्शनगृहांतील जाग्याच्या भाड्याची रकम ही बरीच मोठी जमा झाली असेल. प्रदर्शनापासून खरा फायदा, मुख्यत्वेंकरून जे कारागिर किंवा दुसरे लोक आपले पदार्थ तेथें दाखवितात त्यांस होतो, असें एम्. जोबर्ट यांचें मत असल्यावरून त्यांनीं असें ठरविलें होतें कीं, पदार्थ दाखविण्यास ठेवण्याकरितां जेवढी जागा घेतली जाईल तिजबद्दल दर वीस चौरस फुटांस दोन शिलिंग भाडें पदार्थ दाखविणारानें दिलें पाहिजे, व वीस फुटींपेक्षां जेवढी अधिक जागा पाहिजे असेल तिजबद्दल दर चौरस

फुटास एक शिलिंग ज्यास्त दिला पाहिजे. आपला माल सर्वांच्या चांगला नजरेस पडावा म्हणून तो ठेवण्यास कोणास पुढच्या बाजूस नाक्याची जागा पाहिजे असेल तर त्यानें दर चौरस फुटास पांच शिलिंग दिले पाहिजेत. प्रदर्शनगृहाचा विस्तार मनांत आणिला म्हणजे या भाड्याचेंही उत्पन्न लाखों रुपये झालें असेल असें सहज अनुमान करितां येतें. याशिवाय ' सीझन् टिकिट ' वाल्यांच्या फीची रकम आली असेल ती वेगळीच. या उत्पन्नांत भर पडण्यास जमेच्या आणखी दुसऱ्याही कांहीं लहान बाबी होत्या.

हें प्रदर्शन भरविण्याकरितां जी टोलेजंग इमारत तयार केली होती, तिजविषयीं थोडीशी माहिती देतों. कलकत्ता येथें दक्षिणोत्तर जाणारा चौरंगी नांवाचा एक प्रसिद्ध रस्ता आहे. त्याच्या पूर्व बाजूस सरकारी बडी **म्यूझियम्** ( पदार्थसंग्रहालय ) आहे. त्यास लागून रस्त्याच्या पूर्व बाजूस व पश्चिम बाजूस ही इमारत तयार केली होती. पूर्वेकडील इमारतींत जाण्यास तीन द्वारें राखिलीं होतीं. पूर्व भागांतून पश्चिमेकडील इमारतींत जाण्या येण्यास, मोठ्या स्टेशनावर एका प्लॅटफॉर्मावरून दुसऱ्यावर जाण्यास जसा पूल बांधिला असतो, त्याप्रमाणें चौरंगी रस्त्यावरून लांकडी पूल बांधिला होता. या अति विस्तृत इमारतींपैकीं पदार्थसंग्रहालयास लागून बांधलेली मात्र एक पक्की इमारत; बाकीची सर्व इमारत हंगामी होती. ही पक्की इमारत बांधण्यास एक लक्ष रुपये खर्च आला असल्याचें ऐकिलें होतें. दोहों बाजूंच्या सर्व इमारतींत एकमेकांस लागून लहानमोठे दिवाणखाने केले होते. एकांतून दुसऱ्यांत जाण्या येण्यास वाटा राखिल्या होत्या. याच दिवाणखान्यांस कोर्टें किंवा तदर्थी दुसरीं नांवें दिलीं होतीं.

प्रदर्शनगृहांत जावयास मुख्य तीन द्वारें होतीं. त्यांतील दोन द्वारें दररोज किंवा दर खेपेस फीचा रोख पैसा देऊन जाणारांकरितां होतीं. तिसरें सीझन टिकिटवाले लोकांकरितां होतें. प्रदर्शन पहावयास जाण्याच्या तीन वेळा होत्या; सकाळच्या सात वाजल्यापासून तों दहा वाजेपर्यंत, नंतर अकरापासून संध्याकाळचे साडेसहापर्यंत, पुढें रात्रीं आठपासून दहा वाजेपर्यंत. सकाळीं जाणाऱ्यास

दर खेपेस चार आणे, दुपारपासून अस्तमानपर्यंत चार आणे, व रात्रीं जाणारास आठ आणे फी आंत जाते वेळीं द्यावी लागे. सीझन टिकिट घेणारांस प्रथम एकवार २५ रुपये द्यावे लागले. त्यांस प्रदर्शन चालू झाल्यातारखेपासून तों बंद होईपर्यंत दररोज पाहिजे त्या वेळेस आपलें टिकिट दाखवून आंत बाहेर जाण्या येण्यास मोकळीक होती. दर खेपेस रोख फी देऊन जाणारास ही मोकळीक नव्हती. बाहेर जाऊन पुनः आंत येण्याचें असल्यास त्यास पुनः पूर्वींइतकी फी द्यावी लागे. बुधवारीं कोणत्या ही वेळीं गेलें तरी दर खेपेस एक रुपया द्यावा लागे.

वर सांगितलेल्या फीशिवाय ब्यालाक्लेवाची लढाई, अक्वेरियम् (जलांतील चमत्कार) व ब्रम्हदेशचें नाटक हीं पहावयास जाणारास प्रत्येक जागीं दोन आणे वेगळे पडत; तसेंच कांचेचें काम आपल्या समक्ष तयार करून दाखवीत, तें पहावयास जाणारास चार आणे फी द्यावी लागे. ही सर्व फी त्या त्या स्थलांच्या मालकाची खासगी जमा होती. कोणास क्षुधा किंवा तृषा लागली असतां त्यांच्या शांत्यर्थ जातिभेदास अनुसरून उत्तम तजवीज केली होती. गोरे लोकांस लागणाऱ्या खाण्या पिण्याच्या पदार्थांचीं दुकानें वेगळींच होतीं. आपल्या लोकांकरितां जीं दुकानें बंगाली लोकांनीं घातलीं होतीं त्यांत पुऱ्या, बासुंदी, लाडू, मेवामिठाई, लोणचीं, असोले नारळ नारिंगें, केळीं, इत्यादि पदार्थ असत. या दुकानांतील फी मात्र भोक्त्याच्या इच्छेवर होती. पानसुपारी व ओढण्याच्या विड्या विकण्याचींही दुकानें होतीं. तृषा शांत करण्याकरितां उत्तम पाण्याच्या तोट्या आणून कांहीं ठिकाणीं सोडिल्या होत्या.

सर्व प्रदर्शनगृहाचे मुख्य भाग दोन केले होते. पश्चिमेकडील भागांत बहुधा एतद्देशीय व पूर्वभागांत परदेशांचीं कोर्टें होतीं. एत्तद्देशीय कोर्टाच्या मुख्य दिवाणखान्याची लांबी ७००, रुंदी १०० व उंची ५० फूट होती. या दिवाणखान्यास लागून दुसरीं लहान मोठीं अनेक कोर्टें तयार केलीं होतीं. एत्तद्देशीय व परदेशीय मुख्य कोर्टांचीं नांवें खालीं देतों.

## एतद्देशीय.

| | | |
|---|---|---|
| काश्मीर | मध्यहिंदुस्थान | मद्रास |
| पंजाब | राजपुताना | हैदराबाद |
| कलकत्ता | जयपूर | त्रावणकोर |
| आसाम | मध्यप्रांत | म्हैसूर |
| ब्रम्हदेश | मुंबई | |

## परदेशीय.

| | | |
|---|---|---|
| सिलोन (लंका) | ब्रिटन | इटली |
| तुर्कस्थान | फ्रान्स | स्विट्झर्लंड |
| चीन व जपान | जर्मनी | स्पेन |
| माल्टा | बेलजम | पोर्तुगाल |
| मारिशियस | नॉर्वे | नेदरलन्डस् |
| स्ट्रेटस्‌सेटल्मेंटस् | स्वीडन | फिलिपाइन बेटें |
| बटेविया | डेन्मार्क | ब्रिटिश ग्वायना |
| आस्ट्रेलिया | आस्ट्रिया | युनायटेडस्टेट्स् |

वर सांगितलेल्या मुख्य कोर्टांत अनेक पोटकोर्टें दाखविलीं होतीं. त्या सर्वांची संख्या मनांत आणिली असतां शेंकडों कोर्टें सांगावीं लागणार; याकरितां त्यांतील थोड्यांचीं पोटकोर्टें नमुन्यादाखल पुढें दिलीं आहेत. प्रत्येक कोर्टांतील पदार्थसंग्रहाचे दहा भाग केले होते, आणि दर एक भागांत कोठें पांच, दहा, व कोठें वीसपर्यंत वर्ग केले होते. त्या सर्वांची संख्या सुमारें दीडशें होती. वर जीं मुख्य कोर्टें सांगितलीं त्यांप्रमाणें किंवा त्यांच्याहून विशेष महत्वाचीं दुसरीं स्वतंत्र कोर्टें होतीं. त्यांपैकीं कांहींतील संग्रह जसा वर्णनीय तसाच मनोरंजक असल्यामुळें त्याचें वर्णन पुढें वेगळेंच दिलें आहे. प्रत्येक कोर्टावर त्याचें नांव चांगलें दिसण्यासारखें मोठ्या अक्षरांनीं लिहिलें होतें. कोर्टांच्या यादी (क्याटलॉग) इंग्रजींत छापिल्या होत्या. कांहींच्या छापून तयार झाल्या नव्हत्या. या यादींत कोर्टांतील हरएक पदार्थाविषयीं थोडक्यांत माहिती दिली आहे. प्रत्येक याद लहानशा पुस्तकाएवढी आहे.

आतां वर जीं कोर्टें सांगितलीं त्यांपैकीं कांहीं मुख्य कोर्टांतील ठळक पदार्थांविषयीं थोडीशी माहिती देण्याचा यत्न पुढें केला आहे. त्यापूर्वी एक गोष्ट येथें सांगणें अवश्य वाटते ती ही कीं, हीं सर्व कोर्टें एकमेकांस अगदीं लागून होतीं व क्वचित् स्थळीं एका कोर्टाचा फांटा दुसऱ्यांत गेला होता, व कोठें कोठें कोर्टांच्या मर्यादा बरोबर समजत नव्हत्या. कोठें स्थलसंकोचामुळें कांहीं पदार्थ एका कोर्टांतील असून ते दुसऱ्या कोर्टांतील आहेत असें वाटण्यासारखे ठेविले होते. या कारणानें आम्ही पुढें जी माहिती देत आहों, तींत कोठें घोंटाळा झाला असेल, म्हणजे एखादा पदार्थ एका कोर्टांतील असून त्याचें वर्णन दुसऱ्या कोर्टाच्या सदराखालीं आलें असेल.

येथें दाखविलेल्या सर्व पदार्थांची संख्या एक लक्षावर होती. राजेरजवाडे, बडे कामगार व दुसरे थोर लोक यांजकडून जे पदार्थ पाठविण्यांत आले होते ते बहुतकरून दाखविण्याकरितां परतबोलीवर दिलेले होते, व व्यापारी कारखानदार, कारागीर, व दुसरे लोक यांनीं जे पाठविले होते ते विकरीकरितां होते. जे पदार्थ उत्तम कारागिरीचे, मोठे नाजूक किंवा मौल्यवान् होते ते, कांचेचीं उत्तम कपाटें, टेबलें व पेट्या यांत सर्वांच्या चांगले दृष्टीस पडतील अशा बेतानें लावून ठेविले होते. सर्व कोर्टांत कपाटें, टेबलें व पेट्या हीं रांगांनीं उभीं केलीं असून त्यांच्या दोहों बाजूंस प्रेक्षक लोकांस मधून फिरतां येण्यास वाटा ठेविल्या होत्या. प्रत्येक पदार्थास एकेक छापीव चिठ्ठी बांधिली होती. तींत त्याचा भाव, वर्ग, नंबर, तो पाठविणाराचें किंवा त्याच्या कारागिराचें नांव, विकरीचा किंवा परतबोलीचा, त्याची मूळची व प्रदर्शनांतील किंमत या गोष्टी थोडक्यांत लिहिल्या होत्या. विकरीस ठेविलेल्या पदार्थांपैकीं आपल्या देशांतील प्रख्यात कारागिरांनीं केलेल्या पदार्थांची त्यांच्या कसबाविषयीं मोठी वाखाणणी होऊन त्यांतील बरेच पदार्थ विकूं लागले होते. ते खरेदी करणारे बहुतकरून साहेब लोक होते. जो पदार्थ विकला जाई त्याजवर ( विकला ) या अर्थी इंग्रजी शब्द लिहिलेली छापील चिटी लाविली जाई.

नि. १२३
६१८८

# कोर्टांचें वर्णन.

## काश्मीर कोर्ट.

काश्मीर प्रांतास हिंदुस्थानांतील स्वर्ग म्हणून जें म्हणतात तें अगदीं योग्य आहे. कारण येथील हवापाणी उत्तम असून कांहीं अप्रतिम व मनास विलक्षण आनंद देणारे सृष्टिजन्य व कृत्रिम पदार्थ येथें उत्पन्न होतात. सर्व फलांचा राजा जें द्राक्षफल तें या प्रांतीं उत्तम निपजतें. या फलापासून काढिलेल्या आसवाच्या बाटल्या या कोर्टांत दाखविल्या होत्या. तसेंच सर्व फुलांत मोठा सुवासिक जो गुलाब तो येथें फारच उत्तम होतो; त्याजपासून काढलेल्या अत्त-राची एक लहान कुपी दाखविली होती. निरनिराळ्या रंगांचीं, उत्तम नकशीचें काम केलेलीं टेबलें, पेव्या, कार्डकेसेस, देव्हारे, डबे, गुलाबदाण्या, कमलें, करंडे, कलमदानें, व्यासपीठें व दुसरें लांकडी-सामान दाखविलें होतें. यांतील कांहींवर सोनेरी रंगाचें पत्तीचें काम केलें होतें. येथें हस्तिदंती कामें फार सुरेख तयार करितात, त्यांचे व तारकशी कामाचे मासले दाखविले होते. गोमदेव (Carnilian) ( याचा रंग तांबूस असतो ) हे मणी येथें सांपडतात. हे बसवून अमृतसर येथें तयार केलेले अल्प मोलाचे दागिने दाखविले होते. येथें उत्तम जातीचें केशर उत्पन्न होतें तें व त्याचीं जशीं सुवासिक तशींच दिसण्यांत मोठीं रमणीय पुष्पें दाखविलीं नव्हतीं, ही एक प्रदर्शनांत मोठी उणीव राहिली होती असें आम्हांस वाटतें.

येथील शालींची प्रसिद्धि तर प्राचीन काळापासून आहेच. पूर्वकालीं पांचहजार रुपयांपर्यंत किमतीच्या शाली येथें काढीत असत असें समजतें. सांप्रतकालीं अशा उंची शाली तयार होत नाहींत. व्यापाराकरितां ज्या शाली आलीकडे काढितात त्यांची किंमत दोन

अडीच हजार रुपयांपर्यंत असते. दोन हजारांपेक्षां ज्यास्त किमतीच्या शाली प्रदर्शनांत आल्या नव्हत्या. हा व्यापार अलीकडे पुष्कळ वर्षें मोडकळीस येत चालला आहे, तरी आज मित्तीस शाली काढण्याचे दोन तीन हजार माग चालू असून सुमारें दहा लक्ष रुपये किमतीच्या शाली येथून दरसाल बाहेर जातात. याप्रमाणें शाली, कलाबतूचे उत्तम केलेले चोगे फलकरी इत्यादि कपडे दाखविले होते. येथील महाराज यांजकडून दरसाल उंच किमतीच्या तीन शाली, शालीच्या लोकरीचे बारा बकरे व एक घोडा असा नजराणा महाराणीसाहेब यांस जात असतो.

## पंजाब कोर्ट.

पंजाबप्रांत प्राचीनकाळीं आपल्या आर्य लोकांचें वसतिस्थान होतें. पुढें ते दक्षिणेकडे खालीं आले ते तिकडूनच आले ही गोष्ट मनांत आणिली म्हणजे त्या प्रांताची कलाकौशल्याच्या कामाकरितां जी प्रसिद्धि आहे ती योग्यच आहे असें म्हटलें पाहिजे. या बड्या कोर्टांत बत्तीस पोटकोर्टें दाखविलीं होतीं. त्यांतील कांहीं मुख्य कोर्टांचीं नांवें सांगून पुढें येथें जे विशेष पदार्थ पाहिले त्यांचें टिपण देतों.

| | | |
|---|---|---|
| दिल्ली. | जलंदर. | जेलम. |
| हिसार. | कांगारा. | मुलतान. |
| अंबाला. | अमृतसर. | देराइस्मालखान. |
| लुधियाना. | गुरुदासपूर. | पेशावर. |
| सिमला. | लाहोर. | कोहान. |

सुरेख नकशीदार काम केलेलीं रुप्याचीं तबकें, ताटें, जांब, सुरया, व दुसरीं पात्रें, बारीक कोरींव व जाळीदार काम केलेलें लांकडी सामान, जसें कपाटें, दारें, चौकटी, पलंगाचे खूर; यांतील एका कपाटावर हस्तिदंती नकशीचें व एकावर सोनेरी वेलबुटीचें काम केलें होतें. सुरेख काम केलेलें एक ताऊस; अबनस व सागवानी लांकडाचीं शोभिवंत पदार्थ ठेवण्याचीं टेबलें, कोंचें, भिंतीजवळ मांडून त्याजवर सुरेख पदार्थ मांडून ठेवण्याचीं कपाटें; (यांस इंग्रजींत घ्या-

केट असें म्हणतात ); कोरींव काम करून त्यावर सोनेरी वेलबुटीचें काम केलेलीं छतें; चौरंग, कलमदानें, खडावा; यांतील कांहींवर हस्तिदंती वेलबुटीचें बारीक काम केलेंहोतें. सुरेख काम केलेल्या लिहिण्याच्या पेट्या, कलाबतूचे गेंददार काम केलेले कपडे; सोनें रुपें यांच्या कलाबतूचे दाणेदार काम केलेले कपडे; कलाबतूचें नकशीदार काम केलेले पायांत घालण्याचे जोडे; दिल्ली येथें तयार केलेले रत्नजाडित व मिन्याचें काम केलेले दागिने येथें ठेविले होते. जडावाच्या व मिन्याच्या कामाकरितां या शहराची मोठी प्रसिद्धि आहे. येथें तारकशीचें कामही उत्तम करितात. जडाव, मिना, तारकस यांचे दागिने व सुरेख पात्रें दाखविलीं होतीं. तृणमणी अथवा तैलस्फाटिक व गोमेद या पाषाणांचे डबे, पेले, सोंगट्या, बुद्धिबळें, लहान वाट्या, चकत्या इत्यादि अनेक पदार्थ दाखविले होते. लालनथू नांवाचा शीक जातीचा घड्याळें करणारा कारागीर लाहोर येथें राहतो, त्यानें मैनेसारखा लहान पक्षी दाखविला होता; तो सुस्वर शब्द करून आपले पक्ष हालवीत असे. दोन अडीच हजार वर्षांपूर्वी या प्रदेशांत जे राजे झाले त्यांच्या वेळची जुनीं नाणीं दाखविलीं होतीं. पानपत येथें तयार झालेल्या सुऱ्या, चाकू, कातऱ्या, व निरनिराळ्या जातींचीं खुबीदार कुलुपें, कांग्रा येथील चहा, तांदूळ व मध यांचे मासले दाखविले होते. लाहोर येथून चिलखतें, शिरस्त्राणें, वज्रमुष्टी, परशु व (Crawbills) क्रॉबिल्स् हीं प्रदर्शनाकरितां आणिलीं होतीं. कांहीं जुने ग्रंथ दाखविले होते. जसें तीसपत्री कुराण किं. रु. १५००; खामसानि जामी नांवाचा इराणी ग्रंथ; मक्का व मदिना यांचा इतिहास; गुलिस्तान किं. ५०० रु., व दुसरे जुने ग्रंथ दाखविले होते. यांपैकीं कांहीं पातियालाचे महाराज यांजकडून आले होते. या कोर्टांतील तसबिरींचें वर्णन जवाहीरकोर्टाच्या वर्णनांत दिलें आहे.

## कलकत्ता कोर्ट.

अन्य कोर्टांप्रमाणें या कोर्टांतही अनेक पोटकोर्टें होतीं. हें इंडियन कोर्टांतील मुख्य कोर्ट होतें. यांतील पदार्थसंग्रह दुसऱ्या स्व-

देशीय कोर्टापेक्षां फार मोठा व महत्वाचा असून तो दाखविणारे मुख्यत्वें कलकत्ता येथील व त्याच्या आसपासचे प्रसिद्ध व्यापारी, कारागीर, बडे लोक, व सरकारी कामगार हे होते. आतां येथें दाखविलेल्या संग्रहापैकीं कांहीं ठळक पदार्थांचें टिपण देतों.

हस्तिदंती कोंच, याजवर सुरेख कोरींव काम केलें असून सोनेरी वेलबुटी काढली होती; लांकडी पडदे, यांत जाळीदार काम केलें होतें; लिहिण्याचीं व शोभिवंत पदार्थ वर मांडून ठेवण्याचीं मेजें; यांतील कांहींवर मोत्यांच्या शिंपल्याचें सुरेख वेलबुटीचें काम केलें होतें. हस्तिदंती सामान, जसें ताटल्या, मूर्ति, हत्ती, घोडे, गाई व दुसरीं चित्रें व खेळण्याचे पदार्थ; शिसवी लांकडांवर हस्तिदंती नकशीदार काम केलेले पदार्थ, जसें पेट्या, टेबलें, कलमदानें कार्डकेसेस; तारेनें बातमी पाठविण्याचीं अनेक जातींचीं यंत्रें दाखविलीं असून तीं कशीं चालवितात हें समजून दाखवीत. याचप्रमाणें टेलीफोनचीं यंत्रें दाखविलीं होतीं.

हातानें जरीचें वेलबुटी काम केलेले कपडे; याच मासल्याचे कशिद्याचें काम केलेले रेशमी कपडे; जसें, चोगे, दुलई, सरपोस, तक्यावरील अभरे व टेबलावर घालण्याचीं आच्छादनें, निरनिराळ्या जातींच्या घड्याळाच्या सांखळ्या, अनेक प्रकारचीं दगडी व मृत्तिकेचीं भांडीं, यांतील कांहींवर नकशीदार काम केलें होतें. अशोक राजानें भोपाळ येथें उभारलेल्या स्तंभाचा नमुना, हा चार हात उंचीचा एक दगडी खांब असून त्याजवर तीन सुरेख सिंह कोरले होते. दोघांच्या वावेंत मावण्यासारखे मोठे चार पांच तंबोरे; सर्व प्रकारचीं वाद्यें व तंतुवाद्यें—वीणा, सुरवीणा, त्रितंत्रीवीणा, प्रसरणीवीणा, यशोदा कृष्णाचें चित्र व दुसरीं चित्रें. पहिल्यांत कृष्णजी चंद्रास व दुसऱ्या ताऱ्यांस हांक मारून आपल्याकडे बोलावीत असल्याचा आविर्भाव दाखविला होता. हें काम पहाण्यासारखें होतें. हस्तिदंती हौदा, याजवर कोरींव काम करून वाघाची लढाई काढली होती.

आग्रा येथील चार विद्यार्थी व त्यांचा एक वस्ताद हे गालिचे कसे विणतात तें काम करून दाखवीत होते. वस्तादजी

कांहीं चमत्कारिक स्वरानें हिंदुस्थानी भाषेंत कोणत्या रंगाचें कुकडें घेऊन तें कसें भरावें हें प्रत्येक चेल्यास दर वेळीं सांगे व चेलेही त्याच्या सांगण्याप्रमाणें काम केलें ह्मणून कांहीं मौजेच्या स्वरानें त्यास प्रत्युत्तर देत असत. लखनौ येथून रेशिमासारख्या मऊ शिंदीच्या हंतऱ्या, व एक कृत्रिम बगीचा, काशीहून किनखाबाचे उंच तागे, एकाची किं० ८०० रु. दिली होती. मुराशिदाबादेहून हस्तिदंती उत्तम चित्रें आलीं होतीं. त्यांत अंबारी घातलेला एक हत्ती होता. व तींत दोन सरदार बसले होते. हें काम फार वाखाणणी करण्यासारखें होतें. सोनें व रुपें यांचे शेकडों प्रकारचे सुरेख दागिने; कटक येथें रुप्याचें फार उत्तम नकशीदार अलंकार व दुसरीं कामें करितात, त्यांचे मासले दाखविले होते. भागीरथी नदीवरून लोहमार्गाकरितां एक बडा पूल बांधण्याचें काम चालू आहे त्याचा नमुना दाखविला होता.

याच कोर्टांत निरनिराळ्या कंपन्यांनीं मोठा पदार्थसंग्रह दाखविला होता, त्यांतील कांहींची माहिती देतों. यांतील बहुतेक कंपन्यांचें मुख्य ठिकाण कलकत्ता हें आहे. (Moore and Co.). 'मुअर आणि को' या कंपनीनें महाराणी साहेब यांच्या तीन स्नुषा—प्रिन्सेस् ऑफ् वेल्स्, डचेस् ऑफ एडिन्बरो, व डचेस् ऑफ क्यानाट यांचे तीन, व कन्यांपैकीं मार्शीऑनेस् आफॅ लॉर्न व प्रिन्सेस बियाट्रिस, यांचे दोन; एंप्रेस युजिनी (फ्रान्स देशची माजी बादशाहीण) यांचा एक व डचेस ऑफ क्यानाट यांची सहचारीण प्रिन्सेस ल्यांगट्री यांचा एक असे सात पुतळे दाखविले होते. हे सर्व मेणाचे केले होते. या पुतळ्यांवर मोठे मौल्यवान् व नाजूक कपडे घातले होते. हे पुतळे दाखविण्याचा मुख्य उद्देश हे कपडे दाखविण्याचा होता. यांतील वडील दोन जावा व मार्शीआनेस् ऑफ लॉर्न यांजवरील कपडे तर सर्व आपल्या देशांत विणलेले असून ते कोणकोणत्या प्रसिद्ध स्थलीं तयार होतात यांजविषयीं थोडीशी माहिती सांगतों

| कपडा. | कोठें बनतो त्या जाग्याचें नांव. |
|---|---|
| भरगच्ची किनखाब .... | .... बनारस. |

| | |
|---|---|
| उंच अतलस.... .... .... | ब्रह्मदेश. |
| कलाबतूचें काम (तुई).... .... | ट्रिचनापोली व कलकत्ता. |
| मलमल.... .... .... | डाका व लकीपूर. |
| फ्याशमीना.... .... .... | अमृतसर. |
| काश्मीर.... .... .... | काश्मीर. |
| नकशीदार कशिद्याचें काम.... | हुगळी. |
| झालर.... .... .... .... | कलकत्ता. |
| वळीव रेशमाचें काम.... .... | बरद्वान. |
| पामपान्स .... .... .... | कलकत्ता. |
| रेशमी अस्तर.... .... .... | बरामपूर. |
| कान्वास.... .... .... | राजबलहट. |
| रंगवरेजी.... .... .... | कलकत्ता. |
| मखमल.... .... .... | लायन्स (फ्रान्स). |
| बीडिंग.... .... .... | लंडन्. |
| अस्तर.... .... .... | मांचस्तर. |
| वेलबुटीदार.... .... .... | प्यारीस्. |

प्रिन्सेस ऑफ वेल्स यांचा झगा सोनेरी बुटीदार पांढऱ्या कापडाचा होता. त्यांच्या उजव्या हातांत एक सुंदर पुष्पगुच्छ दिला होता. दुसऱ्या जावेच्या झग्याचा रंग बुंदासारखा होता. तिसरीच्या झग्याचा रंग मोतिया असून तोंडावरून पारदर्शक बारिक जाळीदार बुरखा घेतला होता. दोघी राजकन्यांचे झगे अशाच मासल्याचे होते. प्रिन्सेसच्या उजव्या हातावरून दुपेट्याप्रमाणें विचित्र रंगाचा एक उत्तम रेशमी कपडा लटकत होता. फ्रेंच बादशाहिणीच्या झग्याचा रंग गुलाबी होता. मिसेस् ल्यांगट्री यांच्या झग्याचा पांढरा तांबडा असून त्यांच्या हातांत फुलांचा एक सुंदर गेंद होता. सर्वांचे चेहरे मोठे सुरेख व नखरेदार बनविले होते.

फ्रेंच बादशाहिणीचा मात्र उतरल्यासारखा दाखविला होता. हे पुतळे ज्या प्रसिद्ध स्त्रियांचे म्हणून दाखविले होते ते त्यांची हुबेहुब नक्कल नव्हते, तरी ते चांगले सुरेख केलेले असून त्यांजवर उंच

व झगझगीत पोषाख घातले होते. त्यामुळें ते पहावयास प्रेक्षकांची मोठी गर्दी होत असे. हे सर्व पुतळे उत्तम कपाटांत उभे केले होते.

येथून जवळच प्रिन्सेस ऑफ वेल्स यांचा दुसरा एक पुतळा उभा केला होता. तो (Alexander & Cumming) 'अलेक्झांडर आणि कामिंग' या कंपनीनें दाखविला होता. यांच्या हातांत पुष्पांचा एक सुरेख झेला दिला होता. कपाळावर बिंदी-बिजोऱ्यासारखे दोन दागिने घातले होते. त्यांतील मणी बोरा-येवढे मोठे असून हिऱ्यासारखे चमकत होते. गळ्यांत दोन कंठे होते. उजव्या खांद्यावरून डावे बाजूस कमरेखालीं टांचेपर्यंत मोत्यांचे दोन हार सेलीप्रमाणें लटकत होते. हातांत कांकणें, व कोपराजवळ बाजुबंदासारखे हिऱ्याचे दागिने घातले होते. यांचा झगा रेशमी बुटीदार कापडाचा असून त्याचा रंग तांबूस होता. त्याजवर पुष्पें जडविलीं होतीं. त्यांचें हास्यवदन, पेहराव व झोंक हीं पाहून मनास जो आनंद होत असे त्याचें यथार्थ वर्णन आमच्यानें करवत नाहीं.

याच कोर्टांत स्त्रिया, पुरुष व बालकें यांचे अनेक मुखवटे दाखविले होते. यांतील कांहींची करणावळ तारीफ करण्यासारखी होती. एका मातेच्या उजवे बाजूस एक व डावे बाजूस एक अशीं दोन लहान बालकें करून ठेविलीं होतीं. एकाकडे ती लडिवाळपणीं प्रसन्न नजरेनें व दुसऱ्याकडे थोडेंसें रागावल्याप्रमाणें गैरखुषीनें पहात असल्यामुळें पहिलें बालक आनंदयुक्त मुद्रेनें हांसत तिजकडे पहात होतें, आणि दुसरें दुःखानें म्लान वदन करून तिजकडे हळूच पाहत होतें. येथें गुजराथी बायकांचे, शिपायांचे व दुसरे पुतळे दाखविले होते. हे स्वदेशी कारागिरांनीं केलेले असून यांची करणावळ सुरेख होती.

एफ्. सी. ऑस्लर (F. C. Osler.) या कंपनीनें हिरव्या, निळ्या, तांबड्या, जांबळ्या इत्यादि अनेक रंगांची लहान मोठीं झाडें, झुंबरें, कोचें, छपरपलंग, खुर्च्या, निरनिराळ्या जातींचे स्व्यांडूस, वालाशिटें, समया, आरसे व दुसरें पुष्कळ बिलोरी सामान दाखविलें होतें. हें बिलोर स्फटिकासारखें स्वच्छ, मौल्य-

वान्, चकचकीत व सुरेख असल्यामुळें प्रेक्षकांचे डोळे अगदीं दिपून जाऊन मनास मोठा आनंद होत असे; आणि रात्रीं विद्युत्प्रकाश होऊन हें सामान चमकूं लागलें म्हणजे प्रेक्षकजनांस इंद्रभुवनाचें स्मरण होऊन मन इतकें रमून जाई कीं, तें पहातच उभें रहावें असें वाटे. यांतील कांहीं सामानावर मिन्यासारखें सुरेख वेलबुटीचें काम केलें होतें. छपरपलंग, कोचें, खुर्च्या हीं उत्तम जातीच्या मखमलीनें मढविलीं होतीं. शेजारीं एक बिलोरी कारंजें उभें केलें होतें. त्याच्या तळाचा भाग संगमरवरी दगडाचा असून भोंवतालचा कठडा व त्यास आधारभूत खालचे खांब बिलोरी करवेदार होते. एका खांबावर बिलोरी सुरेख कमल व एकावर नारळाकृति कांचेचा पैलूदार गोळा असे एकामागून एक बसविले होते. कारंज्याभोंवतालच्या कठड्यास तेरा खांब होते. कठड्याचा परीघ तीस फूट होता. बिलोरी झाडाप्रमाणें हें कारंजें असून तें द्वादशकोनी होतें. त्याची उंची पंधरा सोळा फूट होती. हें चालू करीत त्या वेळीं मोठी मौज दिसे. वर सांगितलेल्या सामानाजवळ कांचेचे दोन मयूर ठेविले होते ते मोठे शोभिवंत दिसत. वरील पलंग ब्रम्हदेशाच्या राजानें खरेदी केला म्हणून आम्हांस पुढें समजलें.

(C. Lazarus and Co.) 'सी लाझेरस आणि को' या कंपनीनें लहानमोठे बिलोरी आरसे दाखविले होते. त्यांची कांच फार उत्तम होती. मोठ्या आरशांची उंची दहा व रुंदी सहा फूट होती. त्यांच्या चौकटी (फ्रेमी) मुलामा दिलेल्या होत्या. त्यांजवर वेलबुटीचें सुरेख काम केलें होतें. याशिवाय शिसवी व अबनस लांकडांचीं उत्तम कोचें, खुर्च्या, पलंग, टेबलें, कपाटें, भिंतीजवळ ठेवून त्यांजवर सुशोभित पदार्थ ठेवण्याचीं कपाटें व दुसरें सामान दाखविलें होतें. खुर्च्या व कोचें हीं उंच मखमल किंवा रेशमी कापड यांनीं मढविलीं होतीं.

हामिल्टन आणि को. (Hamilton & Co.) हिनें घड्याळें, पुतळे, तसबिरी, (agate) अगेट दगडाचे पदार्थ, बाजाच्या पेट्या व दुसरें सामान दाखविलें होतें. एका घड्याळावरून वार, तारीख,

महिना, हीं समजत असून बाहेरच्या बाजूस एक लोहार उभा केला होता, तो दर मिनिटास एक ठोका मारी, व दर तासास एक शिपाई कोठडींतून बाहेर येऊन तास वाजवून लगेच आंत जाई. या घड्याळाची किंमत आठ हजार रुपये होती; पुतळ्यांत पानबुड्याचा व पिशाचाचा हे दोन मोठे पहाण्यासारखे होते.

बाबू हजारीमल्ल रामचंद ( कलकत्ता ) यांनीं सामान दाखविलें तें. काश्मीर देशांतील उत्तम शाली; त्यांची किंमत शंभर पासून बाराशें रुपयेपर्यंत होती. मोत्यें व हिरे यांनीं जडलेली एक लहान ढाल, तिची किंमत चौदाशें रुपये दिली होती. विशेष जातीच्या रत्नाचा केलेला एक डबा व एक पेला, यांची किंमत अनुक्रमें ९९० व ९०० रुपये दिली होती. कलाबतूचें उत्तम काम केलेले चोगे, व दुसरे कपडे; दोनशें रु० किमतीचा एक पंखा; यावर लहान मोत्यें बसविलीं होतीं, व याजवरील नकशीचें काम मोठें नाजूक केलें होतें.

दयाजी टिकम् पटेल या व्यापाऱ्यानें गोमेद व दुसऱ्या पाषाणाचे केलेले अनेक पदार्थ दाखविले होते; त्यांतील कांहींचीं नांवें सांगतों. लहानसे खलबत्ते; तळहाताएवढ्या चकत्या, डबे, पेले, सोंगट्या, बुद्धिबळें, मणि, लहान वाट्या, कागद कापण्याच्या सुऱ्या; व अर्ध नारळाएवढा एक खलबत्ता दाखविला होता; यावर दोनशेंपन्नास रु० किंमत लिहिली होती; हा दगड खंबायत येथें सांपडतो व त्यास किंमत फार पडते.

बलभुदरदास (कलकत्ता) यांनीं दाखविलेल्या अमृतसरी व बनारशी शाली, उंच किनखाब, चोगे, रुमाल, कमरपट्टे, दुपेटे, शालू, पगड्या, टोप्या, यांतील कांहींवर कलाबतूचें कशिद्याचें काम केलें होतें. घोडे व हत्ती यांजवर घालण्याचीं भरजरी सामानें; गालिचे, तक्क्यांवर घालण्याचे अभरे, सरपोस, इत्यादि कपडे दाखविले होते.

एका कंपनीनें महॉगनी लांकडाचा छपरपलंग दाखविला होता. त्याजवरील मेघडंबरीच्या कामांत मोठी मौज केली होती. ती अशी कीं, तिजवर एक सुरेख फुलपात्र ठेविलें असून त्यांत एक

कृत्रिम द्राक्षवेली लाविली होती. ती पूर्ण विकसित होऊन तिच्या मध्यभागीं कबुतराचें एक घरटें आहे; त्यांत मादी अंड्यावर बसली असतां नर तिजकरितां चोंचींत भक्ष्य धरून घरट्याभोंवतीं फिरत आहे. याच्या भोंवतीं तारांची जाळी असून बाहेरच्या बाजूस दुसरे दोन पक्षी कबूतरांवर नजर ठेवून उडत आहेत. हा पलंग कुमार इंद्रचंद्रसिंग बहादूर यांजकरितां त्यांच्या हुकुमावरून तयार केला होता.

एका कंपनीनें हार्मोनियम, आर्गन्स, इत्यादि सुस्वर वाद्यांच्या पेट्या दाखविल्या होत्या. एकीनें अनेक जातींच्या कार्डस् दाखविल्या होत्या. एकीनें पृथ्वीवरील सर्व देशांत मिळणाऱ्या उत्तम फळांचे मोरंबे, मिठाईचीं फलझाडें व फुलझाडें दाखविलीं होतीं. एकीनें ( वेडिंगकेक्स् ) लग्नांतील पोळ्या दाखविल्या होत्या. या एक हात उंचीच्या ताबुताच्या आकृतीसारख्या किंवा लहान झाडासारख्या असून मिठाईच्या करितात. हीं झाडें, फळें, व पुष्पें, इतकीं हुबेहूब करितात कीं, तीं मिठाईचीं केलेलीं असतील अशी शंका सुद्धां मनांत येत नाहीं. एकीनें दांतांचे सांगाडे दाखविले होते. हे खनिज पदार्थांचे केले असून स्वाभाविक दांतांप्रमाणें दिसत. यांनीं सर्व पदार्थ चावून खातां येतात, व ते तोंडांत बसविण्यास कमानीचा किंवा चापाचा उपयोग करावा लागत नाहीं. एकीनें मिठाईचा केलेला ताजमहाल दाखविला होता. एकीनें लश्करी व सिव्हिल खात्यांतील सर्व प्रतींच्या अंमलदारांनीं घालण्याचे पोषाख दाखविले होते. एकीनें नानाप्रकारचीं सुवासिक अत्तरें व पाणी हीं दाखविलीं होतीं.

## ब्रम्हदेश कोर्ट.

हें कोर्ट व आसाम कोर्ट यांच्या पृथक मर्यादा आम्हांस समजल्या नाहींत. करितां दोन्ही कोर्टांतील पदार्थांचें एकच टिपण करून घेतलें होतें. यांतील संग्रह फार मोठा नव्हता.

( Dragan ) ड्रागन नांवाच्या कल्पित प्राण्याचें लांकडी चित्र दाखविलें होतें. याची आकृति सर्प किंवा सुसर यांच्या-

सारखी असून त्यास पक्ष होते. याचा जबडा पसरट असून दिसण्यांत हा प्राणी मोठा उग्र आहे. मुलांनीं खेळण्याच्या हस्तिदंती व लांकडी लहान नौका; याची करणावळ मोठी सुबक होती. या प्रांतांत हत्ती फार सांपडतात व येथील लोक हस्तिदंती कामें करण्यांत मोठे कुशल आहेत. सुमारें अडीच हात लांब, भरींव व दंडा एवढा मोठा एक हस्तिदंत घेऊन त्यांत एकीवर एक अशा चार पांच मूर्ति चारी बाजूंकडून कोरिल्या होत्या. या सर्व मूर्ति पृष्ठभागाकडून आंतील गाभ्यास चिकटल्या होत्या. प्रत्येक मूर्तीच्या पुढल्या बाजूस मखराप्रमाणें कमानी कोरल्या होत्या. हा दंत कोणत्याही बाजूनें पाहिला असतां एकीवर एक अशा चार पांच मूर्ति व त्यांच्या पुढच्या बाजूस कमानदार मखरें दृष्टीस पडत. याशिवाय हत्ती, घोडे व दुसरे प्राणी यांचीं सुबक चित्रें दाखविलीं होतीं.

वर सांगितल्या नौकांवर नाविकांचीं व दुसऱ्या लोकांचीं लहान पण सुरेख चित्रें करून ठेविलीं होतीं. रुप्याचीं लहान पात्रें व दागिने यांजवरील कुसरकाम पाहण्यासारखें होतें. बकुल पुष्पाप्रमाणें सोन्याचीं फुलें तयार करून त्यांनीं गुंफलेले हार दाखविले होते. यांची करणावळ मोठी नाजुक असून सफाईदार होती. तरवारींचीं मेणें यांजवर रुपें व हस्तिदंत यांचें वेलबुटीचें सुरेख काम केलें होतें. एक सुंदर बदक, याजवर खोटे खडे बसविले होते. कुसर काम केलेलें एक गोपुर, यावर मुलामा दिला असून त्याच्यावरील कळसाचें काम मोठें मजेदार होतें. आसामांत व लगतच्या प्रदेशांत उत्पन्न होणाऱ्या चहाचे अनेक मासले दाखविले होते. एक दोन जातींचीं खनिज तेलें दाखविलीं होतीं. तक्तपोशीस व छावणीस घालण्याकरितां स्लेटीच्या दगडाचे पत्रे; आसाम प्रांतीं उत्पन्न होणाऱ्या तंबाकूच्या विड्या व तिकडील देखाव्याच्या तसबिरी इत्यादि अनेक पदार्थ दाखविले होते.

ब्रम्हदेशांतील एके कंपनीनें एक वखार तयार करून दाखविली होती. तिची लांबी सुमारें ९०, रुंदी २० व उंची २९ हात होती. ही बांधण्याच्या कामीं दगड व माती किंवा चुना यांचा

मुळींच उपयोग केला नव्हता; हें सर्व काम लांकडाचें केलें होतें. कोठें लोखंडी लहान चुका मात्र दृष्टीस पडत. यावरून ती बांधण्यास लांकूड फार लागलें असेल असें कोणास वाटेल तर तशीही गोष्ट नव्हती. एकादी इमारत भरींव लांकडांनीं बांधली असतां तीस जर शंभर फूट लांकूड लागणार तर तेवढीच इमारत या कंपनीच्या रीतीनें बांधण्यास निम्मे किंवा त्याहून थोडें कमीच लांकूड पुरतें. इतकें असूनही या प्रकारें बांधलेली इमारत मजबुदींत कमी नसते म्हणून कंपनीच्या एजंटांनीं सांगितलें. खर्चाच्या मानानें पाहिलें असतां आपण ज्या तऱ्हेनें नेहमीं इमारत बांधतों तीस जो खर्च लागतो त्याचा एक द्वितीयांश किंवा त्याहीपेक्षां थोडा कमी या प्रकारानें बांधण्यास पुरा होतो.

एक खांब उभा करण्याचा असल्यास तेवढ्याच आकाराची, चतुष्कोनी व आंतून पोकळ अशी एक लांकडी चौकट तयार करून शिंद भरल्याप्रमाणें चार अंगुलें रुंद, अर्ध अंगुल जाडी व खांबाच्या गाभाऱ्याएवढे लांब असे लांकडी तुकडे घेऊन तींत बसवून टाकितात; अर्थात् हा खांब आंतून पोकळ तयार होतो, त्यामुळें लांकूड फार कमी पुरतें. अशा प्रकारें तयार केलेली इमारत एका ठिकाणाहून दुसरीकडे सहज नेतां येते. पाहिजे असल्यास उलगडून ठेवितां येते. अशा प्रकारें बांधण्यांत कांहीं सोई आहेत खऱ्या, परंतु वरील वखार आम्हीं पाहिली तेव्हां टिकाऊपणांत ती कमी येईल असें आम्हांस वाटलें. याच प्रकारें तयार केलेल्या शिड्या व घडवंच्या या कंपनीनें दाखविल्या होत्या. त्यांचा उपयोग प्रदर्शनगृहांत करीत असत.

## मध्यहिंदुस्थान कोर्ट.

या कोर्टांत ग्वालेर, बुंदेलखंड, छत्तरपूर इत्यादि उपकोर्टें होतीं, किंवा या प्रसिद्ध स्थलांहून पदार्थसमूह दाखविण्यास आला होता. अलिजा बहादर शिंदे सरकार यांजकडून एक जंगी दरवाजा पाठविण्यांत आला होता. तो आकारमानानें मोठा भव्य असून

त्याची करणावळही विशेष तारीफ करण्यासारखी होती; करितां त्याचें वर्णन प्रथम देतों. वर सांगितलेला लांकडी पूल उतरून इंडियन कोर्टांत जाऊं लागलें म्हणजे त्या कोर्टाच्या मुख्य द्वारीं तो उभा केला होता. त्याच्या पुढच्या बाजूस मात्र सोडावी तेवढी प्रशस्त जागा सोडली नसल्यामुळें तो प्रेक्षकांच्या नजरेंत भरावा तितका भरत नसे व त्याचें खरें रूप प्रथमदर्शनीं चांगलें लक्षांत येत नसे.

या दरवाज्याचें सर्व काम दगडी होतें. याची एकंदर उंची पस्तीस व रुंदी बारा फूट होती. नुसत्या दरवाज्याची उंची बेवीस फूट असून वरील मेहराप तेरा फूट उंच होती. याचें किंवा यांतील एकंदर दगडाचें वजन ७२ टन म्हणजे शंभर खंडींवर होतें. हें जंगी काम चार महिन्यांत तयार केलें असल्याचें आम्हीं ग्वालेर येथें ऐकिलें होतें. ग्वालेरीच्या आसपास नानाप्रकारचे चांगले दगड सांपडणाऱ्या खाणी पुष्कळ आहेत. मालीपूर नांवाचें एक स्थल आहे, तेथील खाणींत तीसपस्तीस फूट लांबीच्या तुळया निघतात. हा दगड क्वार्ट्झ् जातीचा आहे. लांकडी सामानावर जसें नकशीदार काम करितात तसें या दरवाज्यावर सुरेख काम केलें होतें, व वरील बाजूवर दोन हत्तींची लढाई कोरली होती. इंडियन कोर्टांत पाऊल टाकण्यापूर्वी हें काम पाहून सर्व लोक मोठें आश्चर्य करीत. येथें एक गोष्ट सांगणें योग्य वाटतें ती अशी कीं, हें सर्व काम आपले देशांतील म्हणजे ग्वालेर येथील कारागीर यांनीं मेजर कीथ साहेबांच्या देखरेखीखालीं तयार केलें. या संबंधाची दुसरी गोष्ट मात्र मोठी दिलगीर वाटण्यासारखी आहे. ती अशी कीं, कलकत्ता येथील प्रदर्शन संपतांच या दरवाज्याची रवानगी विलायतेस केन्सिंगटन येथील प्रदर्शनाकडे व्हावयाची होती. आपल्या देशांतील सर्व प्रकारचें ऐश्वर्य विलायतेकडे जावें असा ईश्वरेच्छेनें ओघच पडून गेला आहे. तो कधीं बंद होईल तो होवो!

जयपूर व जोधपूर येथील महाराजांनीं दोन मोठे उंच हत्ती तयार करून प्रदर्शनांत पाठविले होते. ते इंडियन कोर्टांत बिलोरी कारंज्याजवळ उभे केले होते. एकावर हौदा व एकावर अंबारी

घातली होती. हौदा व अंबारीसह या हत्तीस कोर्टाच्या आंत बाहेर जाण्यायेण्यास अडचण पडूं नये या विचारानें दरवाज्याचें काम शिंदे सरकारांनीं एवढें मोठें करविलें असेल असें वाटतें.

आतां या कोर्टांत दाखविलेल्या दुसऱ्या पदार्थांचें टिपण देतों. रेशमी कपडे, यांत कलाबतूचें व जरतारीचें काम केलें होतें. मिन्याचें सुरेख काम केलेल्या अत्तरदाण्या व गुलाबदाण्या. हत्यारें—एका मेणांत दोन तरवारी; एक चमत्कारिक भाला, यांतच लहानसें पिस्तुल होतें. करवती तरवार; धनुष्य व बाण यांनीं युक्त एक बंदूक; फरस व दुसरीं कांहीं हत्यारें दाखविलीं होतीं. नकशीदार काम केलेलें मखर, हें काम मोठें पहाण्यासारखें होतें. लालादयाळ नांवाच्या गृहस्थानें मध्यहिंदुस्थानांतील प्रसिद्ध इमारती व देखावे यांचे घेतलेले फोटो (तसबिरी) दाखविले होते. सटना येथून एक कामगार आला होता, त्यानें एक चमत्कारिक शिला दाखविण्यास आणली होती. ती हात सव्वा हात लांब, चार पांच अंगुलें जाडी, व सात आठ अंगुलें रुंद होती. ही शिला लांकडी फळीप्रमाणें पाहिजे तिकडून लवत असे. अशा जातीचा दगड हिमालयाच्या पायथ्यापाशीं सांपडतो.

## राजपुताना कोर्ट.

या कोर्टांत अजमीर, भरतपूर, बिकानीर, कोटा, अलवार, धोलपूर, जोधपूर, इत्यादि प्रसिद्ध ठिकाणांहून पदार्थ दाखविण्यास आले होते. आपल्या देशांतील जुन्या शस्त्रास्त्रांचा भरणा येथें जसा दाखविला होता तसा अन्य कोर्टांत नव्हता; करितां त्याविषयीं माहिती प्रथम देऊन नंतर अन्य पदार्थांची देऊं.

शस्त्रास्त्रें, दहा पंधरा प्रकारच्या तरवारी, जसें समशेर, खंडा, सुरा, सोसन, पत्ता, गोलिया, गुटरा, सयफ्, पट्टा, तेगा, सडक, फिरंग, गुरुज, गुप्ती, निमचा; कांहीं जातींच्या बंदुका, जसें कराबिन, शेरबच्चा; तमंचा, बोकमार; जंबूर, जेजल व दुसऱ्या जातींच्या तोफा; चमत्कारिक पिस्तुलें; कटार, कुबडी, खंकर, खंजीर, चुगा,

चक्र, जंबिया, जफरतक्या, जंजीरटोप, तबलदमामा, परशु, पेषकबज, फरडू, बिचवा; सांग, सकीन (जंब्याचें स्त्रीलिंगरूप), वाघनख, बिचवा, बर्ची, जोडबर्ची; भाले, बलमचा विटेचा चिमचा; नानाप्रकारचे बाण, जसें, पत्याचे, काठीचे, फलाचे, बिछूचे, भाले, ढाली, चिलखतें, शिरस्त्राणें, दस्तानी (हातास घालण्याचें आच्छादन); घोड्यांवर घालण्याचीं चिलखतें. याप्रमाणें शेंकडों शस्त्रास्त्रें, व कवचें दाखविलीं होतीं. पूर्वकालीं समरांगणांत यांचाच उपयोग करीत. यांतील कांहींच्या मुठी व म्यानें यांजवर नकशीचें सुरेख काम केलें होतें. कांहींच्या मुठी मौल्यवान् पाषाणाच्या असून त्यांजवर रत्नें जडविलीं होतीं. कांहींच्या मुठी, सिंह, व्याघ्र, श्वान, इत्यादि हिंसक पशूंच्या मुखाकृति होत्या. इतिहासदृष्टया हा समूह मोठा महत्वाचा मानला पाहिजे. कारण यांतील कांहीं हत्यारें ज्या राजेरजवाड्यांनीं दाखविलीं होतीं त्यांच्या पूर्वजांनीं मोठे पराक्रम करून विजय मिळविले तेव्हां त्या कालच्या बादशहांनीं फार खूष होऊन दिलेल्यापैकीं हीं होतीं. कांहींच्या साहाय्यानें त्या पूर्वजांनीं आपल्या जीवांचें रक्षण करून शत्रूंचा प्राण हरण केला होता. कांहीं दोन चारशें वर्षांचीं जुनीं आहेत. कांहीं आपल्या देशांत जोधपूर, अलवार, दिल्ली इत्यादि स्थलीं तयार झालीं होतीं व कांहीं इस्पहान येथें तयार झालीं होतीं.

हस्तिदंती सामान—पंखे, चक्या, गुलाबदाण्या, बुद्धिबळें, रथ, कांकणें, ताफा (उभा केलेला नाच), सारसपक्षी, इत्यादि पदार्थ दाखविले होते. कपडे—साटिनावर कशिद्याचें सुरेख काम केलेले पडदे, सरपोस; गाद्या व तक्ये यांचे अभरे; रेशमी, सुती व लोंकरी गालिचे, निरनिराळ्या जातीचे मसलीन कपडे, अलवार येथील तुरुंगांत काढिलेले गालिचे, सर्वांत मोठ्याची किं० साडेचारशें रुपये दिली होती; कोटा येथें काढलेल्या मसलीन कापडाचे मासले. लांकडी सामान—चंदनी पंखे व चंवऱ्या, पेट्या, कमलें, कलमदानें. दगडी सामान—निरनिराळ्या प्रकारचीं पात्रें, घराचा नमुना किं० १०० रु०, पांढरा, पारवा, तांबूस इत्यादि रंगांच्या संगमरवरी दग-

डांचे नमुने; या दगडांच्या खाणी अजमीर, दिल्ली, आग्रा यांच्या आसमंतात् अनेक आहेत; स्त्रीपुरुषांनीं घालण्याचे सोनें व रुपें यांचे अनेक दागिने; खुबीदार कुलुपें; नारळीच्या सालीच्या बांगड्या, कृत्रिम फळें व बदकें हीं पाण्यावर तरंगत होतीं. लहान मोठे हुक्के व नेचे, पितळेचा रथ; इराणी व आरबी लिपींत लिहिलेले ग्रंथ, यांतील कांहीं तीन चारशें वर्षांचे जुने होते. अवरंगजेब बादशहानें स्वतः लिहिलेला एक व त्याच्या आज्ञेवरून लिहिलेला एक असे दोन यांत दाखविले होते. इमारतीचा चुना—उत्तर हिंदुस्थानांत चुना इतका उत्तम कमवितात कीं त्यानें केलेलें काम संगमरवराच्या कामाप्रमाणें दिसतें. आपल्या इकडे ही कमावण्याची रीति माहित नाहीं, व तशी मृत्तिकाही आपल्या प्रदेशांत मिळत नाहीं. कातड्याचें सामान—जिनें, नमदे, लगामी, बुदल्या, कमरपट्टे, दोस्तानें, इत्यादि पदार्थ दाखविले होते.

## जयपूर कोर्ट.

येथील महाराजांकडून पदार्थसमूह मोठा आला होता; व याचें एक वेगळेंच कोर्ट बनविलें होतें. हा समूह जसा सुंदर तसाच मौल्यवान् होता. यांत महाराजांनीं स्थापन केलेल्या कलाकौशल्याच्या शाळेंत तयार झालेल्या पदार्थांचा व त्यांच्या म्यूझियमांतील पदार्थांचा बराच भरणा होता. अशा प्रकारची शाळा व म्यूझियम् हीं आपल्या देशांत अन्य राजांच्या येथें असल्याचें आह्मांस माहीत नाहीं. असो, आतां या कोर्टांतील पदार्थांपैकीं कांहींचें थोडेंसें वर्णन करितों.

संगमरवरी दगडाच्या मूर्ति, चित्रें व दुसरे पदार्थ; जसे—हत्ती, सिंह, जिराफ, उंट, गेंडा, गाय, हरिण, घोडा, कुत्रा, बकरा; यांतील एक हत्ती मनुष्यास पायांखालीं तुडवीत आहे असें चित्र होतें. शोभिवंत बरण्या; एकीवर लक्ष्मीची मूर्ति असून एकीवर राधाकृष्ण खेळत असल्याचें चित्र काढिलें होतें. गणपति, महिषासुर, हनुमान्, वानरसेना, शेषशायी, एक स्त्री; यांतील कांहींची करणावळ मोठी

तारीफ करण्यासारखी होती. याच प्रकारचीं हस्तिदंती चित्रें, लांकडी सामान, लोंकरी व कशिद्याचें काम केलेले कपडे, येथील तुरुंगांत तयार केलेले गालिचे किं० पांच रु० पासून हजार रु० पर्यंत, हीं दाखविलीं होतीं. शस्त्रास्त्रें—पोलादी परशु, याची आकृति बैलाच्या डोक्यासारखी होती; चंद्राकृति बाण, नानाप्रकारच्या बंदुका व तरवारी; खंजीर, जंब्ये, चिलखतें, शिरस्त्राणें, रुप्याचे दोन हुक्के, यांजवर कॉफ्ट (koft) कांम केलें होतें, आणि त्यांत बायकांचे नाच काढिले होते. जयपूर येथें शेंकडों जातींचीं चिटें तयार होतात त्यांचे नमुने दाखविले होते.

सांप्रतच्या महाराजांचे पूर्वज जे मानसिंग राजे, यांची कुबडी दाखविली होती. ती तीनशें वर्षांची जुनी आहे. तिजवरील मिन्याचें काम मोठें सुरेख आहे. दोन तीनशें वर्षांचे जुने किनखाबाचे तागे दाखविले होते. पण त्यांची चकाकी नवीन ताग्यांप्रमाणें होती. येथील राजे लढाईंत विजयी होऊन आल्यावर त्यांस बादशहाकडून जे पोषाख मिळाले त्यांत हे तागे दिले होते. तसेंच बादशहांनीं दिलेल्या जुन्या खिलाती (झगे) व तेराशें वर्षांचा जुना गालिचा दाखविला होता. पेहराव व दुसरे पदार्थ ठेवण्याची एक पेटी, तिचें झांकण व्याघ्राच्या मस्तकासारिखें असून त्यांत ती आपोआप उघडण्यास एक खीळ केली आहे तिच्या योगानें झांकण मागें सारिलें कीं ती पेटी उघडते. तींत सुऱ्या, कातऱ्या, सुंगधी अत्तरांच्या कुप्या व दुसरे पदार्थ ठेविले होते. चार पौंड वजनाचा एक याकूत दाखविला होता. हें रत्न या प्रांतीं कांहीं स्थलीं सांपडतें. महाराजांनीं खऱ्या हत्तीएवढा एक मोठा हत्ती करून पाठविला होता. हा आंतून कांबट्यांचा बनविला होता. यावर भरगच्ची सामान व मौल्यवान् अलंकार घातले होते. याची करणावळ मोठी सुरेख होती. या महाराजांकडून आलेलें जवाहीर व तसबिरा यांचें वर्णन जवाहीर कोर्टांत दिलें आहे.

## मुंबई कोर्ट.

या कोर्टांत, एडन, सिंध, गुजराथ, नागपूर, पुणें, बेळगांव, सावंतवाडी, रत्नागिरि, कारवार इत्यादि प्रदेशांतून व खुद्द मुंबई शहरांतून पदार्थसमूह आला होता, पण तो असावा तसा मोठा नव्हता. असो, आतां या कोर्टांतील संग्रहाविषयीं ठोकळ माहिती देतों.

लांकडी सामान—लहान मोठीं कपाटें, पेट्या, पाळणे, पलंग, कार्डकेसेस्; शिसवी खुर्च्या, बुकें ठेवण्याचे सुरेख स्थांड, खानेदार पेटी ( cabinet ) तिच्या दोन बाजूंस दोन टेबलें व त्यांजवर दोन्हीकडे दोन बिलोरी आरसे व खालच्या बाजूस दोन कबोर्डस् ( cupboards ) याची किं० ४९० रु० दिली होती. कांहीं पेट्या व टेबलें यांजवर रुपेरी व हस्तिदंती सुरेख वेलबुटीचें काम केलें होतें. कांहींवर शिंपल्याची पानपत्ती काढली होती. चंदनी पेट्या, चौरंग, चंवऱ्या; कांहीं पेट्यांवर देवांचीं चित्रें काढलीं होतीं. एकीवर रामावतार काढला होता. रोठ्या सुपारीच्या केलेल्या हातांत धरण्याच्या काठ्या, गोकाकी चित्रें व फळें; हस्तिदंती सामान—एक मुरलीधर, जवाहीर ठेवण्याची पेटी, किं० ४०० रु०, हिचें काम पाहण्यासारखें होतें. गंजिफा, कंगवे, फण्या, कागद कापण्याच्या सुऱ्या; शिंगांचें सामान—शामदानें, कमलें, गायी, हरिण, सर्प.

कपडे—पुणें, अहमदाबाद, नारायणपेठ, नागपूर, येवलें इत्यादि प्रसिद्ध स्थलीं निघणारें जरीचें, रेशमी व गर्भसुती कापड; पागोटीं व पगड्या यांचे अठावीस प्रकार दाखविले होते. नानाप्रकारचे गालिचे व सतरंज्या; पुष्कळ जातींचे किनखाब; मुंबईतील सासून अलायन्स् व माणकजी पेटीट यांच्या गिरण्यांत निघणारे रेशमी व दुसरे कपडे; ( मुंबईस जाणारांनीं या गिरण्या एकवार जाऊन पहाव्या अशी आमची त्यांस शिफारस आहे ). सिंध हैदराबाद येथें उत्तम कशिद्याचें काम केलेले कपडे.

अलंकार व शोभिवंत पदार्थ—सोनें रुपें यांचे मध्यम व कनिष्ठ प्रतींतील बायकांमुलांनीं घालण्याचे सर्व प्रकारचे दागिने; आरब

लोकांच्या बायका जे दागिने अंगावर घालतात त्यांचे अनेक नमुने दाखविण्यास आले होते. चिनंई भांड्यांप्रमाणें मृत्तिकेचीं शोभिवंत पात्रें, यांतील कांहींवर मिन्याप्रमाणें सुरेख काम केलें होतें. नकशीदार काम केलेलीं रुप्याचीं भांडीं, यांतील कांहींची करणावळ तारीफ करण्यासारखी होती. पुष्कळ जातींचीं जुनीं हत्यारें; सुंद्री, सतार, बीन, ताऊस, विणा, सारंगी इत्यादि सुस्वर वाद्यें. इटालियन संगमरवरी दगडाची एक सुरेख गाय व कांसव, व एक मोठा ताबूद; अगेट (agate) दगडाचे शोभिवंत पदार्थ—तबकड्या, पेले, लहान डबे, कोंबडी, चकत्या, हत्यारांच्या मुठी, सोंगट्या, बुद्धिबळें, व खेळण्याची एक लहान तोफ; नासिक, पुणें, इत्यादि ठिकाणीं तयार होणाऱ्या भांड्यांचे शेंकडों मासले दाखविले होते. मुंबईंतील आर्टस्कूलचे विद्यार्थी व दुसरे उत्तम चित्रकार यांनीं काढलेल्या अजंठा येथील कोरींव लेण्यांच्या व दुसऱ्या अनेक स्थलांच्या किंवा देखाव्यांच्या तसबिरी पाठविल्या होत्या. त्यांचें वर्णन जवाहीर कोर्टाच्या सदरांत दिलें आहे.

बडोदें सरकाराकडून भरजरी कापडांनीं मढविलेली शिसवी लांकडाची एक उंच खुर्ची; तिजवर सुरेख कोरींव काम केलें होतें. सागवानी लांकडाचा एक दरवाजा, याजवर गुजराथी पुरुषाचे दोन व लहान मुलाचा एक असे तीन पुतळे उभे केले होते. हें काम तारीफ करण्यासारखें होतें. गणपति व दत्त यांच्या मूर्ति; हत्तींची लढाई; हस्तिदंती सामान, कृत्रिमफळें, चिलखत, तरवार, जंब्या, गुप्ती, शोभिवंत, पदार्थ ठेवण्याचे स्क्यांड्स; सुस्वर वाद्यें इत्यादि पदार्थ दाखविले होते.

भावनगर व नवानगर येथील सरकारांकडून—संगमरवरी दगडाची छत्री, हिची कारागिरी पहाण्यासारखी होती. महिषासुर, कांसव; लहान मुलांचे खेळण्याचे पदार्थ, दुपेटे, मंदील, शालू व दुसरे मौल्यवान् कपडे व घोड्यावर घालण्याचें भरजरी सामान; भावनगर येथील दिवाणसाहेब व युरोपियन अंमलदार यांचे मुखवटे, सुस्वर तंतुवाद्यें, शिसवी लांकडाची लिहिण्याची पेटी, तिजवर मो-

त्यांच्या शिंपल्यांचें सुरेख काम केलें होतें. हे व अशा प्रकारचे दुसरे अनेक पदार्थ दाखविण्यास आले होते.

मुंबई येथील 'कार्न्याक आयर्न वर्कस्' (Carnack Iron Works) या कंपनीनें आपल्या कारखान्यांत तयार झालेला माल दाखविला होता. त्यांत एक लहानशी आगबोट होती. तिची लांबी सुमारें पन्नास फूट, रुंदी बारा व उंची सात आठ फूट होती. यांतून साठ सत्तर मनुष्यें व पांच सात खंडी ओझें प्रवास करूं शकत होतें. तिच्या तळास पितळेचे पत्रे बसविले आहेत. ती दर तासांत सुमारें आठ मैल जाऊं शकते. तिची किंमत अठरा हजार रुपये सांगत होते.

## मद्रास कोर्ट.

या इलाख्यांतून जो पदार्थसंग्रह पाठविण्यांत आला होता तो मुंबई इलाख्यापेक्षां विशेष मोठा होता. हैदराबाद, त्रावणकोर, म्हैसूर, तंजावर, विजयानगर, त्रिचनापल्ली, मंडसर इत्यादि स्थलें या इलाख्याचे पोट भाग आहेत. पण यांतूनही चांगला भरणा आला होता. आतां या कोर्टांत दाखविलेल्या पदार्थांपैकीं कांहीं मुख्यमुख्यांचें टिपण देतों.

हस्तिदंती सामान—लहान टोपल्यांसारखीं सुरेख पुष्पपात्रें, घड्याळें, व कार्डस् ठेवण्याचीं घरें (पेट्या), पंखे, तसबिरी बसविण्याच्या फ्रेमी (चौकटी), पुष्पांचा गेंद, चित्रें व मूर्ति; राम व सीता यांचा विवाह, यांत लक्ष्मण व भरत हे डावे बाजूस व उजवे बाजूस ऋषिमंडळ असून पुढच्या बाजूस वानरसेना दाखविली आहे. चंदनी सामान—पंखे, चंवऱ्या, यांचें काम तारीफ करण्यासारखें होतें. पेट्या, सिंह, कलमदानें, लिहिण्याचें सामान ठेवण्याच्या पेट्या, यांतील कांहींवर उत्तम कुसरकाम करून त्यांत पशुपक्षी व देवांचे अवतार कोरले होते. रुपें व तांबें यांचीं शोभिवंत पात्रें व दुसरे पदार्थ—तांब्याच्या भांड्यांवर रुपें चढवून वेलबुटीसारखें काम केलेलीं पाणी पिण्याचीं भांडीं. हें काम आपल्या देशांत दु-

सरीकडे होत नाहीं. या भांड्यांस हळूहळू रुप्याच्या भांड्यांइतकी किमत पडते. या इलाख्यांत तयार होणाऱ्या तांबें व पितळ यांच्या भांड्यांचे शेंकडों नमुने दाखविले होते. पितळेचे केलेले सर्प, सरड व बेडूक दाखविले होते. रुप्याच्या भांड्यांचें कामही या इलाख्यांत चांगलें करितात. साहेब लोक जेवण्यांत सुंठ, मिरें, दालचिनी इत्यादि पदार्थांच्या पुडींचा उपयोग करितात, त्या ठेवण्याकरितां पंचपाळ्याप्रमाणें केलेलीं डौलदार भांडीं दाखविलीं होतीं.

कपडे— मसलिनचे तागे; आर्नी येथें काढलेल्या एका ताग्यावर शंभर रु० किं० लिहिली होती. बल्लारीकडील रेशमी लुगडीं, यांतील कांहींचे पदर व कांठ जरीचे होते. कलाबतू व रेशीम यांनीं कशिद्याचें काम केलेले कपडे; निरनिराळ्या जातींचे रुमाल; उपरणी जोड्या, व पशमिना नांवाचें कापड; लहान मोठ्या किमतीचे गालिचे व सतरंज्या. शोभिवंत व उपयुक्त पदार्थ—ताडाचे पंखे, यांजवर वेलबुटींचें सुरेख काम केलें होतें. अनेक जातींच्या चटया किंवा हंतऱ्या दाखविल्या होत्या. यांतील कांहीं रेशमाप्रमाणें मऊ होत्या. एक लहान चटई वेऊन गुंडाळली असतां ती गुंडाळी हातांत धरण्याच्या काठीएवढी मोठी होते. पंचवीस रु० किमतीची एक चटई दाखविली होती. लांकडी चित्रें—कलावंतिणीचा नाच, गारोडी, ताडवृक्ष, पालखी, व भोई दाखविले होते. येथें गोकाकेंत तयार होतात तशीं फळें होतीं. उंच जातीची कांच किंवा बिलोर आपल्या देशांत तयार होत नाहीं. हातांत घालण्याचे बिलोर व कांकणें अन्य इलाख्यांप्रमाणें येथेंही तयार होतात, त्यांचे मासले दाखविले होते. कांचेचीं पात्रें व शोभेकरितां टांगण्याचे गोळे करितात; पण तीं फार ठिसूळ असतात. या इलाख्यांत अगदीं रानटी अवस्थेंत राहणाऱ्या लोकांच्या कांहीं जाती आहेत. या लोकांचीं भांडीं, कपडे, दागिने, पारधीचीं व शेतकीचीं हत्यारें हीं दाखविलीं होतीं. तीस पस्तीस प्रकारचीं तंतुवाद्यें व दुसरीं वाद्यें दाखविलीं होतीं. येथें हत्यारें वर्णन करण्यासारखीं नव्हतीं. श्रीरंगपट्टण येथें तयार केलेली एक बंदूक, तिला चोवीस नळ्या होत्या; किं० ६०० रु० लिहिली होती. कला-

बतूनें कशिद्याचें काम केलेला एक चांदवा, याच्या झालरीस खरीं मोत्यें लावलेलीं होतीं. सुवर्णाच्या मिश्र धातूंचे मासले दाखविले होते.

या इलाख्यांतून आलेल्या तसबिरी व जवाहीर यांचें वर्णन जवाहीर कोर्टाच्या वर्णनांत सामील केलें आहे.

## हैदराबाद कोर्ट.

या कोर्टांत कलाबतू व जरतारी कपड्यांचा मोठा भरणा दाखविण्यांत आला होता. हत्तीवर घालण्याचे भरगच्ची गाशे, गालिचे, व चादरीं, हीं फार मौल्यवान् होतीं. त्याच्या गंडस्थळावर घालण्याच्या शिऱ्या, तसेंच घोड्यावर घालण्याच्या पाखरा व दुसरें सामान, व मोठ्या दरबारांत बैठकीस लागणारें सामान हीं दाखविलीं होतीं. लढाईंत उपयोगीं पडणारीं कांहीं जुनीं शस्त्रास्त्रें दाखविलीं होतीं. यांतील कांहीं अलीकडे फारशीं दृष्टीस सुद्धां पडत नाहींत. कपाटें, पेट्या इत्यादि थोडें लांकडी सामान व दुसरे कांहीं पदार्थ दाखविण्यांत आलें होतें. पण या कोर्टांतील पदार्थसंग्रह असावा तसा मोठा नव्हता.

## त्रावणकोर कोर्ट.

यांतील पदार्थसंग्रह जसा बाहुल्यानें तसाच वैचित्र्यानेंही मोठा होता. पण त्याची विशेष टिपणें घेण्यास आम्हांस चांगली सवड झाली नव्हती; तत्रापि कांहीं पदार्थांचें वर्णन देतों.

रुप्याचीं पात्रें—डबे, तबकें, गुलाबदाण्या, चंबू, जाळीदार तबकें, लोटे, फुलपात्रें, कार्डकेसेस्; यांतील कांहींवरचें नकशीदार काम तारीफ करण्यासारखें सुरेख होतें. मृत्तिकेचीं भांडीं—सुरया, चहादाण्या, डबे, ताटल्या व दुसरीं पात्रें; यांवर रुपेरी वेलबुट्टीचें सुरेख काम केलें होतें. तसेंच तांबे व पितळ यांच्या मिश्रणाचीं कांहीं शोभिवंत भांडीं दाखविलीं होतीं. शस्त्रास्त्रें—राजपुताना कोर्टाप्रमाणें येथेंही बरींच हत्यारें होतीं. सात आठ जातींच्या बंदुका व तलवारी; बल्लम व दुसरीं हत्यारें दाखविलीं होतीं. हस्तिदंती चित्रें,

यांत एक मच्छ्याळी बाई वेणीफणी करीत बसली आहे. या प्रदेशांत हस्तिदंती काम चांगलें तयार करितात. बंगलोरी भरजरी कांचेसारख्या व शालीसारख्या मऊ घोंगड्या दाखविल्या होत्या.

शोभिवंत किंवा उपयुक्त पदार्थ—चंदन, ताड, व अभ्रक यांचे पंखे, अभ्रकाचे पंख्यावर वेलबुटीचे व चंदनीवर कुसरीचें उत्तम काम केलें होतें. हे सर्व पंखे प्रेक्षक लोकांनीं थोडयाच दिवसांत विकत घेतले. एका जातीच्या भेंटाचीं कामें,—देवालयें, व दुसऱ्या इमारती; हीं कामें हस्तिदंताच्या कामासारखीं दिसतात. महाराजांच्या होडीचा नमुना याच भेंटाचा केलेला दाखविला होता. शिसवी लांकडाचा मोठा पाट, याजवरील फुल्या मोठ्या सफाईनें मारल्या होत्या. मद्रास इलाख्यांतील तंतु व दुसरीं वाद्यें होतीं, पण त्यांतील कांहींचीं नांवें आम्हांस समजलीं नाहींत. संगमरवरी दगडाच्या आंखण्या, तपकिरीच्या सुरेख डब्या, व दुसरे पदार्थ दाखविले होते.

## म्हैसूर कोर्ट.

येथें दाखविलेला पदार्थसमूह अन्यकोर्टांप्रमाणें बराच मोठा होता. तथापि त्यांत जे कांहीं स्वारस्याचे पदार्थ दृष्टीस पडले त्यांचें टिपण मात्र खालीं देतों.

भगवद्गीतेचें एक फार जुनें पुस्तक, यांत भगवंतांनीं वृंदावन येथें ज्या क्रीडा केल्या त्यांचे हे देखावे काढिले आहेत. म्हैसूरच्या राजाच्या येथील जुनीं निशाणें, यांजवर हनुमान् व गरुड हे काढिले आहेत. हजार वर्षांपूर्वी दक्षिण हिंदुस्थानांत रोज चालणारीं जुनीं नाणीं; मेणाचीं केलेलीं अनेक जातींचीं फळें व पुष्पें, यांची करणावळ फार सुरेख होती. शिसवी लांकडाचें टेबल व चौरंग, यांजवर सोन्याच्या शिंपल्याचें वेलबुटीचें काम केलें होतें. चंदनी लांकडाच्या पेट्या, पंखे, तबकें, व दुसरे पदार्थ; हस्तिदंती करंडे, यांजवर मिन्यासारखें सुरेख काम केलें होतें. सोनें व रुपें यांचे दागिने; नकशीदार काम केलेलीं रुप्याचीं अनेक पात्रें, कृत्रिम फळें, भरजरी व दुसरे

कपडे; शिसवी लांकडाचा दरवाजा, याजवर हस्तिदंती वेलबूट काढली होती. याशिवाय दुसरे अनेक पदार्थ दाखविले होते.

## सामान्य इंडियन कोर्ट.

काशीचे महाराज यांजकडून—एक नालकी, उत्तम जातीची मखमल व रेशमी कापड यांनीं मढविली असून तिजवर कलाबतूचें सुरेख काम केलें होतें. हत्तीवर घालण्याचा रुप्याचा हौदा, याजवर नकशीदार काम केलें होतें, व आंतून मखमलीनें मढविला होता. पितळेचा एक मोठा देव्हारा, यांतील जाळीदार काम चांगलें होतें. याच्या पुढच्या बाजूस एक तैलंग व एक बैरागी जप करीत बसले आहेत. या दोघांमध्यें रुप्याची एक लहान तोफ ठेविली असून जवळच एक म्हातारा शिपाई उभा केला होता. हस्तिदंती एक कोच, यावरील जाळीदार व कुसरकाम तारीफ करण्यासारखें होतें.

टोंकचे नवाब साहेब यांजकडून—एक बडी कटार, ही खुरासन येथें तयार केली होती. नबाबांचा प्रसिद्ध पूर्वज जो अमीरखान तो रजपूत राजांबरोबर लढाया करितांना नेहमीं ही जवळ बाळगी; चापाची एक बंदूक, तिचें नांव दिलफाटकर (अंतःकरण कापणारी) औरंगजेब बादशहानें स्वहस्तें काढलेली कुराणाची एक प्रत, ही आरबी भाषेंत लिहिलेली आहे. फत्तेउल्ल हरामी नांवाचा दुसरा ग्रंथ दाखविला होता. इस्पहानचा राजा जो महमद तेहरखान बहादूर याच्या हुकुमावरून हा तयार झाला होता; व त्यास पांचहजार होन दिले होते. हा साडे तीनशें वर्षांचा जुना आहे. दरभंगाचे महाराज यांजकडून— मखमलीवर सलम्याचें उत्तम काम केलेले चोग्यासारखे झगे; रुप्याचा एक डबा, हुक्का व नेचा; नेचाची लांबी वीस हात होती. वर दिवाणखान्यांत बसून चार पांच उमरावांस एकदम ओढतां येईल अशी तजवीज यांत केली आहे. हा लहान व पातळ पट्टीदार कलाबतूनें मढविला आहे. हस्तिदंती कामें—राजाची कचेरी, बोटी, चंवऱ्या यांचे तंतु केंसासारखे बारीक व स-

फईदार काढले आहेत. महिषासुरमथनी देवी व दुसरीं कामें होतीं. यांची करणावळ तारीफ करण्यासारखी सुरेख होती.

इंडिया सरकाराकडून—मेघाची वांटणी दाखविणारे बारा महिन्यांचे बारा नकाशे; कोणत्या भागांत कोणत्या महिन्यांत किती पाऊस पडतो हें दाखविणारे नकाशे; हवेचा दाब दाखविणारे बारा नकाशे; दर महिन्यांतील उष्णतेचें प्रमाण दाखविणारे; बंगाल्यांत सरासरी मानानें किती पाऊस पडतो हें दाखविणारे नकाशे सात; कोणत्या भागांत कोणते धर्म व भाषा चालू आहेत हें दाखविणारे; भूगर्भसंबंधी व दुसरी माहिती दाखविणारे अनेक नकाशे होते. तसेंच नद्यांचे ओघ, डोंगर व त्यांची उंची दाखविणारे नकाशे होते. लोहमार्ग व तारायंत्र यांची गति दाखविणारे नकाशे सर्वांस माहितच आहेत. सूर्याची उष्णता मापण्याची, व हवेचा समशीतोष्णपणा व दाब मापण्याचीं यंत्रें होतीं. तारायंत्रें, टेलिफोन यंत्रें, सर्वे करण्याचीं यंत्रें, निरनिराळ्या कामांस लागणारे वीस पंचवीस जातींचे स्टांप, अनेक विषयांच्या माहितीचीं पुस्तकें व रिपोर्ट इत्यादि पदार्थ दाखविले होते.

डाका येथील मसलिन—डाका येथें पूर्वीं उत्तम जातीचे कपडे तयार करीत. येथें निघणाऱ्या मसलिन कापडाची कीर्ति केवळ आपल्याच देशांत नव्हे, पण युरोप खंडांत देखील रोमन बादशहांच्या वेळेपासून आहे. हा कपडा इतका बारीक विणतात कीं, एका ग्रंथकारानें त्यास मौजेनें हवेचा कपडा असें म्हटलें आहे. यांत विशेष चमत्कार असा आहे कीं, याचे तंतु केळीच्या सोपटाचेही करितात. ही कला अगदीं नष्ट होण्याची वेळ आली आहे. माणिकगंज येथें दोन म्हाताऱ्या बाया आहेत, त्यांस मात्र यास लागणारा दोरा तयार करितां येतो, व डाका येथें या दोऱ्याचें कापड विणणारे दोन कारागीर राहिले आहेत; पण तेही म्हातारे झाले असल्यामुळें त्यांच्या पश्चात् ही कला आपल्या देशांतून मुळींच जाणार असें दिसतें, तर देशाभिमानी लोकांनीं याजविषयीं चांगला विचार करावा.

‘निटाईचरण आणि को.’ या कंपनीनें दहा यार्ड लांब मसलि-

नचा एक तागा दाखविला होता. तो इतका बारीक होता कीं, त्याची सुरळी केली असतां ती बोटांतील आंगठींत जाण्यासारखी लहान होत होती. याच कंपनीनें कांहीं जामदान्या व विणतांना ज्यांत फुलें काढितात असे दुसरे कपडे दाखविले होते. मिसरदेश, अरबस्थान, इराण व तुर्कस्थान या देशांत हे कपडे हजारों वर्षांपासून जात आहेत.

किरकोळ—एका संगमरवरी शिलेवर चित्रें काढून स्वर्गांतील सुख व नरकांतील यमनातना यांचे देखावे दाखविले होते. पहिल्यांत मेजवानी, नाच व गाणें याप्रमाणें सर्व प्रकारची चैन चालली असल्याचें व दुसऱ्या भागांत मनुष्याच्या डोक्यावर पर्वत कोसळत असून पुढें त्याला तेलांत कढवीत असल्याचें व शेवटीं त्यास पशुपक्षी फाडून खात असल्याचें दाखविलें आहे. तांब्याच्या पत्र्यावर रुपें चढवून त्याचीं पाणी पिण्याचीं भांडीं करितात. याचे अनेक नमुने दाखविले होते. हें काम काबूल, दिल्ली, व लाहोर येथें फार उत्तम करीत. ही कला इराण देशांतून आपल्या देशांत आली. गुजराथेंतही हें काम करितात, पण चांगलें साधत नाहीं. तसेंच बिद्री व काफ्‌ म्हणून दोन जातींचीं कामें आहेत; त्यांचे केलेले पदार्थ दाखविले होते.

कानपूर येथें कातड्याचें उत्तम काम करितात. कातडें जनावराच्या अंगावरून काढल्यापासून तें पुरें तयार होण्यास त्यास चौसष्ट संस्कार द्यावे लागतात. प्रत्येक संस्कार दिल्यानंतर त्याची स्थिति कशी बदलत जाते हें दाखविण्याकरितां चौसष्ट मासले दाखविले होते. घोडे व गाड्या यांजकरितां तयार केलेलें सर्व प्रकारचें कातड्याचें सामान व दुसरे अनेक पदार्थ होते. मिरजापूर व झांशी येथें तयार केलेले शंभरपासून एक हजार रु० किमतीचे गालिचे दाखविण्यास व विकरीस आले होते. मेणाचे पुतळे कसे करितात हें दाखविण्याकरितां एक कारागीर ते करीत बसला होता; व कोणास आपला किंवा दुसऱ्याचा पुतळा पाहिजे असल्यास सांगितल्या नमुन्याप्रमाणें माफक किंमत घेऊन करून देत असे. तसेंच

लखनौ येथील फर्द कसे तयार करितात हें दाखविण्याकरितां एक कारागीर तें तयार करीत बसला होता. या कोर्टाच्या बाहेरच्या बाजूस आपल्या देशांत शेतकीस लागणारीं हरएक जातीचीं आउतें, कोष्टी लोकांचे माग व दुसऱ्या कारागीर लोकांस लागणारीं यंत्रें व हत्यारें हीं मांडून ठेविलीं होतीं. आतां या कोर्टाच्या संबंधानें अखेर एवढेंच सांगतों कीं, राजाच्या राजवाड्यांत किंवा रंकाच्या खोपटांत असणाऱ्या किंवा त्याच्या ऐषआरामास व निर्वाहास लागणाऱ्या सर्व पदार्थांचा संग्रह येथें दाखविला होता.

## लंका कोर्ट.

या कोर्टास पूर्वेकडील चौकाच्या उत्तरभागच्या वरांड्यांत जागा दिली होती. या द्वीपाच्या ऐश्वर्याप्रमाणें येथून पदार्थांचा भरणा आला नव्हता.

द्वीपांतील रम्य देखावे, लाखों रुपये खर्च करून बांधलेलीं बुद्धाचीं देवालयें व दुसऱ्या इमारतींचे अवशिष्ट भाग यांच्या तसबिरांचें एक अलबम्; निरनिराळ्या जातींचे बुंद, चहा, दालचिनी, सिंकोना, कोको, यांचे मासले, तसेंच कित्येक उपयुक्त वृक्षांच्या साली, पर्णें व वेलदोडे, आणि जायफळ यांचे मासले दाखविले होते. या द्वीपांत नारळीचे वृक्ष कोट्यावधि आहेत; नारळाचें तेल, काथ्या व त्याच्या विणलेल्या चटया, व मालदीव बेटांत तयार केलेल्या चटया दाखविल्या होत्या. (हीं बेटें लंकासरकारच्या अमलाखालीं आहेत.) क्यांडियाचा राजा व राणी यांच्या मूर्ति व बुद्धासंबंधी थोड्या जुन्या वस्तु येथें होत्या. या द्वीपाची अति प्राचीन काळापासून रत्नांकरितां प्रसिद्धि असल्याप्रमाणें तेथील खाणींत निघालेलीं माणकें, नील, चंद्रकांत, याकूत, लसण्या, क्याटस् आय (cat's eye) इत्यादि रत्नांचे नमुने दाखविले होते. यांतील शेवटचें रत्न मात्र जांबुळाएवढें मोठें होतें; बाकीचीं साधारण होतीं. या द्वीपाच्या लगत मानारच्या खाडींत मोत्यांचे शिंपले सांपडतात; पण त्यांचे मासले दाखविले नव्हते, ही मोठी उणीव होती.

## तुर्की कोर्ट.

या कोर्टास संगीत कोर्टाच्या दक्षिणेस जागा दिली होती. जरूशलम् येथील कांहीं व्यापारी येऊन त्यांनीं या कोर्टांतील पदार्थसंग्रह दाखविला होता.

शिपांच्या लहान मोठ्या ताटल्या; शिपा प्रथम साफ करून त्यांस जिल्हई देतात आणि नंतर त्यांजवर सुरेख वेलबुटी काढितात. लहान व बारीक शंखांच्या व प्रवालांच्या गळ्यांत घालण्याच्या माळा. प्रवालाचे आंब्याच्या कोयरीएवढे गोटे घेऊन ते खोदून फुलें, वेली, फुलपाखरें, लहान मूर्ति व तयार केलेले दुसरे पदार्थ दाखविले होते. मोत्यांच्या शिंपल्यांचे लहान डबे हस्तिदंती मुठीच्या पेना, यांजवर नकशीचें सुरेख काम करून त्यांत लहान तसबिरी बसविल्या होत्या. एक जातीच्या बियांच्या माळा, सुया व टांचण्या ठेवण्याचीं जुगदानें, हीं लिंबासारख्या बियांनीं जडित होतीं. अशाच जातीच्या बियांनीं जडित घड्याळें ठेवण्याच्या पेट्या दाखविल्या होत्या. टेबलावर ठेवून वाजविण्याच्या लहान घंटा. शुभ्र पाषाणाच्या लहान, दीर्घ, वर्तुलाकार चकत्या घेऊन त्यांजवर लहान चित्रें (ज्यांस इंग्रजींत बसृ म्हणतात) काढलीं होतीं. घड्याळांच्या सांखळ्या, पैसे ठेवण्यास चामड्याच्या लहान पिशव्या व दुसरे पदार्थ दाखविले होते. या सर्वांत प्रवालांच्या पदार्थांचा भरणा विशेष होता, व त्यांची करणावळही सुरेख होती. यांशिवाय कांहीं लांकडी सामान दाखविलें होतें. यांतील कांहींवर चांगलें कोरींव काम केलें होतें.

## चीन व जपान कोर्ट.

चीन व जपान, ब्याटेविया, मारिशियस, या व दुसऱ्या कांहीं लहान कोर्टांस इंडियन कोर्टाच्या पूर्वभागीं जागा दिली होती. पूर्वी सांगितल्याप्रमाणें हीं कोर्टें एकमेकांस अगदीं लागून असल्यामुळें दोन्ही कोर्टांत दाखविलेल्या पदार्थांचें एकच टिपण करून घेतलें असल्याप्रमाणें पुढील माहिती देतों.

ब्रोन्स मिश्रधातु (तांबें व कथील यांचें मिश्रण) कारणपरत्वें यांत जस्तही थोडें मिसळतात, यांचीं केलेलीं लहान मोठीं पात्रें व दुसरे शोभिवंत पदार्थ, चार हात उंचीच्या मोठ्या वेसेस (Vases) याच मिश्रणाचा केलेला एक गरुडपक्षी, मासे, खेंकडे, मुखवटे, पुष्पपात्रें व बिलोरी झाडासारखें एक झाड हीं दाखविलीं होतीं. या मिश्र धातूचें ओंतीव काम करण्याचे-या देशांत पुष्कळ कारखाने असून कामही चांगलें तयार होतें.

वर सांगितल्या वेसेसपैकीं कांहीं आठशें वर्षांच्या जुन्या आहेत. एका पडद्यावर जपान देशाचा देखावा काढला होता, तो पहाण्यासारखा होता. प्रवालवेलींची एक जोडी दाखविली होती. तिची किंमत ४५०० रु० लिहिली होती. जेड जातीच्या दगडाचे दोन मोर व एक हत्ती (हा दगड हिरव्या, पांढऱ्या व पिंगट रंगाचा असतो), मोरांवर मोत्यांच्या शिंपल्यांच्या फुलांचें व वेलबुटीचें काम केलें होतें. मनुष्यांचे व जनावरांचे लांकडी पुतळे, यांचें कोरींव काम इतकें सुरेख व बारीक केलें होतें कीं, अगदीं लहान अवयव सुद्धां चांगले दाखविले होते. शोभिवंत पदार्थ वर मांडून ठेवण्याचीं कपाटें व खानेदार पेट्या; यांतील एकीवर हस्तिदंताची वेलबुटी काढली होती. चंदनी लांकडाचे पडदे, यांजवरही हस्तिदंती फुलांचे व पत्तीचें काम केलें होतें. थोरल्या पडद्यांच्या जोडीची किंमत एक हजार रुपये लिहिली होती. हस्तिदंती मूर्ति; दहा रुपयांपासून पन्नास रुपयेपर्यंत किमतीचे पंखे, यांची करणावळ फार सुरेख होती. कशिद्याचें काम केलेले रेशमी कपडे व दुसरे अनेक पदार्थ दाखविले होते.

## मारीशियस कोर्ट.

या बेटाचा नकाशा; येथें मसाल्याचे पदार्थ विकतात; त्यांतील लवंगा, दालचिनी, व कांहीं वृक्षांच्या साली व तंतु हें दाखविलें होतें. हें बेट उंसाच्या लागवडीकरितां प्रसिद्ध आहे; येथील उंस आपल्या देशांतील उंसापेक्षां दुपटी तिपटीनें मोठा असतो.

त्याची लागण दरसाल करावी लागत नाहीं. यापासून तयार केलेली साखर, काकवी व दारू यांचे अनेक मासले होते. ही साखर तयार करण्यास ज्या जातींचा चुना लागतो त्याचे व रेशमाचे कांहीं मासले दाखविले होते. कांहीं जातींचें बीं, शहामृग पक्ष्याचे पंख व दुसरे थोडे पदार्थ दाखविले होते. या सर्वांत साखरेचे मासले मात्र पहाण्यासारखे होते.

## नेदर्लँड्स इंडियन कोर्ट.

या कोर्टांत सुमात्रा, जावा, व लगतच्या दुसऱ्या बेटांतील पदार्थ दाखविण्यास आले होते. या बेटांत कथिलाच्या खाणी आहेत, त्यांतील अशोधित धातूंचे व दुसऱ्यां खनिज पदार्थांचे मासले, तसेच लवंगा, जायफळ, पत्री हे मसाल्याचे पदार्थ येथें फार विकतात, त्यांचे मासले व उंसापासून केलेल्या साखरेचे व रम् नांवाच्या दारूचे मासले होते. येथें उत्पन्न होणारा चहा, काफी व नीळ यांचेही मासले दाखविले होते. याशिवाय येथील लोकांचे पोषाख, नाचणाऱ्या नायकिणीचें चित्र, बुद्धाचें देवालय व लहानमोठ्या होड्या यांचे नमुने दाखविले होते.

## आस्ट्रेलियांतील कोर्ट.

या द्वीपाच्या निरनिराळ्या भागांतून एवढा मोठा व इतका बहुविध पदार्थसंग्रह दाखविण्यास आला होता कीं, प्रत्येक भागाचें एकेक स्वतंत्र कोर्ट केलें होतें. यांतील न्यू साउथवेल्स् व व्हिक्टोरिया हीं दोन कोर्टें तर एक ब्रिटिश कोर्ट खेरीज करून बाकीच्या परदेशीय कोर्टांपेक्षां मोठीं होतीं. येथून पांचसहाशें प्रदर्शक आले होते. या द्वीपांतील सर्व कोर्टांस ब्रिटिश कोर्टाच्या दक्षिणेस जागा दिली होती. हीं कोर्टें प्रदर्शकांनीं आपल्या खर्चानें उभारलीं होतीं. वरील दोन्ही प्रत्येक कोर्टाची लांबी सुमारें पांचशें फूट व रुंदी पाउणशें ऐशीं फूट होती.

नकाशे व पुस्तकें—न्यू साउथवेल्स् या भागाचा, न्यू क्यासल्, सि-

डनी, आर्मडेल इत्यादि शहरांचे, आगगाडी, टपाल, तारायंत्र यांचा मार्ग दाखविणारे व खनिज पदार्थांच्या खाणी दाखविणारे नकाशे, देशाच्या माहितीचीं पुस्तकें, रिपोर्ट व प्रसिद्ध वर्तमानपत्रें हीं दाखविलीं होतीं. खनिज उत्पन्न—वर सांगितल्या प्रदेशांतील खाणींत सांपडणारें सोनें, रुपें, तांबें व कथील यांच्या मिश्रधातूंचे शेंकडों मासले दाखविले होते. या मिश्रधातूपासून शुद्ध धातु सारख्या प्रमाणानें सांपडत नाहींत, म्हणजे एकाद्या खाणींत सोनें अधिक सांपडतें व एकाद्यांत फार कमी सांपडतें. ज्या खाणींत सोनें फार सांपडतें तींतील एक टन मिश्रधातु घेतली असतां तिजपासून शुद्ध सोनें २१०० औंस म्हणजे पक्के पांसष्ट शेर पन्नास तोळे प्राप्त होतें, आणि जेथें अगदीं कमी सांपडतें तेथें पंधरा वीस तोळे सांपडतें. याचप्रमाणें अन्य धातूंविषयीं नियम आहे. रुप्याच्या मिश्र धातूपासून शुद्ध रुप्याशिवाय एकपासून पांच औंसपर्यंत सोनें सांपडतें; या मिश्र धातु मिळण्यास येथें चारशें फूट पावेतों केव्हां खणावें लागतें. येथें तांब्याच्या विटांचा एकवीस फूट उंचीचा एक बुरूज उभा केला होता. यांतील सर्व विटांचें वजन सात खंडींवर होतें. कथिलाच्या विटा रचून त्यांचाही दीपमालेसारखा एक खांब उभा केला होता.

खाण्यापिण्याचे पदार्थ—जतन करून ठेविलेलें अनेक प्राण्यांचें मांस, लोणी व तूप यांचे मासले, अनेक जातींचे मेवे, मोरंब्यासारखे अनेक फळांचे पाक, द्राक्षें, बंपारे, अंजीर, नारिंगें, महाळुंगें, या फळांचे कृत्रिम मासले दाखविले होते. या द्वीपांतून हीं फळें इंग्लंडास विकावयास जातात. येथें अंजीर फार मोठा पिकतो. याच कोर्टांत गोडच्या भजांचा ( बिस्किटांचा ) लहानसा एक बुरूज उभारला होता. निरनिराळ्या पदार्थांपासून केलेल्या पिण्याच्या दारूचे अनेक मासले होते. द्राक्षासव येथें उत्तम होतो. तो जसा मुरत जाईल तसा अधिक चांगला होतो. आपले माजी गव्हर्नर सर जेम्स् फर्ग्यूसन हे दहाबारा वर्षांपूर्वी या द्वीपांत याच हुद्यावर होते. त्यावेळीं घेतलेल्या द्राक्षासवाच्या कांहीं बाटल्या त्यांनीं इतकीं वर्षें जतन करून ठेविलेल्या दाखविण्यास पाठविल्या होत्या.

किरकोळ—आगगाडीकडे व खाणींच्या कामास लागणारीं यंत्रें, कारागीर लोकांस लागणारीं हत्यारें व शेतकीचीं आउतें; जहाजें, इमारती व घरांतील सामान हीं तयार करण्यास लागणाऱ्या लांकडाचे शेंकडों मासले होते. या लांकडाचा रंग, मोहरा, सफाई व चिवटपणा हे गुण चांगले होते. दारापुढें व खिडक्यांत लावण्याचे लांकडी पडदे; यांजवर सुरेख कुसर काम केलें असून उत्तम जातीचें वार्निस लाविलें होतें. मृत्तिकेचीं पात्रें व दुसरे पदार्थ यांजवरील जिल्हई फार चांगली होती. निरनिराळ्या जातींच्या कृत्रिम वेली व पुष्पें, हीं मोठीं सुरेख होतीं. अनेक जनावरांचीं चांबडीं व त्यांचीं केलेलीं लेपें; हीं लेपें फार चांगलीं व मोठ्या किमतीचीं करितात. लोंकरीचे अनेक मासले व त्यांजपासून केलेले कपडे; सोन्यारुप्याचे व खऱ्या व खोट्या खड्यांचे अनेक प्रकारचे दागिने दाखविले होते. हे फार मौल्याचे नव्हते, पण यांची करणावळ सुरेख व सुबक होती. प्रदर्शन संबंधीं पदकें ( मेडल्स ) पाडून देण्याचें यंत्र येथील लोकांनीं आणिलें होतें. ते पाहिजे तितकीं पदकें फारच थोड्या वेळांत पाडून देत. तीं सोन्यारुप्याचीं केल्याप्रमाणेंच चकाकत असत.

## विक्टोरिया कोर्ट.

या कोर्टांत जाण्याच्या द्वारास एक सोनेरी कमान उभी केली होती. तिची उंची सुमारें वीस पंचवीस व रुंदी आठ दहा फूट होती. विक्टोरिया नांवाच्या वसाहतींत सोनें सांपडणाऱ्या मुख्य खाणी चार आहेत. तेथील निशाणें या कमानीवर उभीं केलीं होतीं. या चार खाणींत आजपर्यंत किती सोनें सांपडलें याची ही कमान दर्शक होती. या कमानीच्या आकारमानाइतकें म्हणजे तीन हजार घन फूट किंवा बारा कोट शहांणव लक्ष तोळे सोनें इसवी सन १८८३ पावेतों सांपडलें. सरासरीच्या मानानें दरसाल तीन साडे तीन कोट रुपयांचे सोनें येथें सांपडतें. या संपत्तीस म्हणावें तरी काय? याचेंच नांव संपत्तीचा लोट येणें. निरनिराळ्या खाणींत सांपडणाऱ्या सोन्याच्या अशोधित धातूचे वीस बत्तीस कृत्रिम गोळे दाखविले होते.

ते खऱ्या सोन्याच्या गोळ्याप्रमाणें चमकत. जे खरे गोळे सांपडतात त्यांस वेगवेगळालीं नांवें देतात. सर्वांत मोठ्या गोळ्याचे नांव वेल्कम् होतें. याचें वजन सुमारें साडेपांच हजार तोळे असून तो एक लक्ष पांच हजार रुपयांस विकला गेला असें त्याच्या नमुन्यावर लिहिलें होतें. याशिवाय दुसऱ्या धातूंचे व खनिज पदार्थांचे शेंकडों मासले दाखविले होते; त्यांत पक्के आठ नऊ मण वजनाचा कथिलाचा एक गोळा होता. उत्तम जिल्हई दिलेले संगमरवर व आलबास्टर दगडांचे पाटाएवढे फळे; लांकडी व धातूंच्या सामानास जिल्हई आणणाऱ्या मृत्तिका यांचे मासले दाखविलें होते.

उपयुक्त व शोभिवंत पदार्थ—वेगवेगळ्या उपयोगास येणाऱ्या साबणाचे अनेक मासले; नानाप्रकारचीं तेलें; यांतील कांहीं सुवासिक व कांहीं औषधी होतीं. त्यांत ‘ योला ’ नांवाच्या पक्ष्याचें तेल होतें. सप्तंबर खेरीज करून हे पक्षी या प्रदेशांत दृष्टीस पडत नाहींत. त्या महिन्यांत मात्र हजारों दृष्टीस पडतात. ते आपलीं घरटीं वाळवंटांत किंवा एका प्रकारच्या झुड्याखालीं करितात. त्यांची मुंडी मुरगाळून शेंपटाकडून मानेकडे जोरानें त्यांस पिळीत गेलें म्हणजे त्यांच्या चोंचींतून थोडेंसें तेल निघतें. शंभर पक्ष्यांपासून ऐक ग्यालन तेल निघतें. हें तेल वातावर मोठें वस्ताद आहे. त्या देशांत मिळणारीं जनावरें व पक्षी भाता भरून दाखविण्यास आणलीं होतीं. अनेक प्रकारच्या गाड्यांचे नमुने; दोन कृत्रिम घोडे, सर्प, किरडें, फळें हीं दाखविलीं होतीं. यांतील सर्प इतके हुबेहूब होते कीं, त्यांनीं भरलेली पेटी एक गैरमाहीत कारागीर खुली करून तो त्यांस बाहेर काढूं लागला तेव्हां ते खरे जीव आहेत असें त्यास वाटून तो घाबरला आणि हातचें काम सोडून दूर पळाला! तसबिरीस देण्याचे पाण्याचे, व तेलाचे रंग. औषधी जलें; शस्त्रवैद्यास लागणारीं शस्त्रें, चामड्याचें सामान; घोडीं व बैल यांच्या पायांस मारण्याचे अनेक प्रकारचे नाल. चार पांच लहान मुलांचे पुतळे; मृत्तिकेंचीं पात्रें; हीं शोभिवंत होतीं. लांकडी सामान; मेलबोर्न येथून ऐशीं जातींचें लांकूड दाखविण्यास आलें होतें.

अन्नवस्त्र—या प्रदेशांत उत्पन्न होणारे गहूं, तांदूळ, मका, सातू या धान्यांचे नमुने; साखरेचे मासले, नानाप्रकारची मिठाई व अनेक जातींच्या फळांचे पाक; माशांचे पाक (टिकण्यासारखे साखरेच्या पाकांत ठेवलेले मासे; ) लोणचीं व चटण्या यांचे मासले; अनेक जातींची पिण्याची दारू; सरबतें, चहा, पन्हेर; रक्षण केलेल्या दुधाचे मासले. याप्रमाणें खाण्यापिण्याच्या पदार्थांचे शेंकडों मासले; रेशमी, सुती व लोंकरी कपडे; यांत लोंकरी कपडे फार चांगले होते. अनेक विषयांची माहिती देणारीं पुस्तकें व नकाशे व तसबिरी दाखविल्या होत्या.

## ब्रिटिश कोर्ट.

या कोर्टांतील संग्रहाविषयीं आम्हीं कितीही माहिती दिली तरी ती अगदीं थोडी होणार. यानें दोन एकर जमीन व्यापिली होती. यांतील पदार्थप्रदर्शकांची संख्या सहाशेंवर होती.

आपल्या कारखान्यांत जो माल तयार होतो त्याची चोहोंकडे प्रसिद्धि होऊन आपला व्यापार वाढावा या हेतूनें शेंकडों कंपन्यांच्या मालकांनीं आपल्या येथें तयार होणाऱ्या मालाची नांवनिशीवार यादींदाखल लहान मोठीं बुकें किंवा जाहिराती वांटण्याचा क्रम चालू ठेविला होता. यांतील कांहीं मालकांनीं किंवा त्यांच्या गुमास्त्यांनीं आपल्या मालाविषयींची माहिती आमच्या पुस्तकांत यावी म्हणून सुचविलें होतें. त्यास अनुसरून प्रथम कांहीं कंपन्यांविषयीं पुढें लिहितों.

१. जी ऑर्टेली आणि को. ( G. Ortelli & Co. ) या कंपनीनें आरसे, क्याबिनेट्स्, टेबलें व दुसरें शोभिवंत सामान दाखविलें होतें. त्यांत आरशाचें एक मोठें मखर होतें.

२. ( Daultan and Co. ) हिनें पाण्याच्या खोल्या, मुताऱ्या, बाटल्या व लहान मोठीं शेंकडों फिल्टरें ( पाणी स्वच्छ करण्याचीं यंत्रें) दाखविलीं होतीं. यांत नुसतीं फिल्टरेंच तीस हजार रु० किमतीचीं होतीं.

३. ( S. R. Stewart and Co. ) हिनें जनावरांचीं शिंगें व कांसवाच्या पाठीचें कवच ( शिप ) यांचे केलेले अनेक पदार्थ दाखविले होते. यांच्या कारखान्यांत दरसाल दहालक्ष खूर व पस्तीस लाख शिंगें खरेदी करतात. त्यांचे अनेक पदार्थ करितात; त्यांत फण्या एक कोट तयार होतात. कांसवाचें कवच पातळ असतें म्हणून सोन्याचे दोन गट जाळून त्यांचा जसा एकजीव करितात त्याप्रमाणें दोन कवचें एकत्र जोडून त्यांचें एक बनवितात.

४. ( W. Avery and Co. ) हिनें वजन करण्याचे अनेक जातींचे ताजवे दाखविले होते. यांतील थोरल्यानें खंडोगणती माल एकदम वजन केला जाऊन तो अमुक वजन आहे असा त्यावर छाप मारिला जातो. यानें आगगाडीकडील वागणीचें आंतील मालासह वजन करितां येतें.

५. ( J. Keiller and Sons. ) हिनें नानाप्रकारच्या फलांचे मोरंबे व मिठाईचीं, फलें, झाडें दाखविलीं होतीं. तीं इतकीं सुरेख होतीं कीं त्यांवरील फळें व पर्णें हीं खऱ्याप्रमाणें दिसत होतीं. यांच्या कारखान्यांत दरसाल तीन चार हजार खंडी मोरंबा तयार होतो.

६. (Rylands and Brothers) हिनें बारीक व लठ्ठ तारांचीं बिंडळीं दाखविलीं होतीं. यांचा उपयोग लोंबत राहणारे पूल, जाहजांचें (rigging) रिगिंग्, तारायंत्र इत्यादि कामाकडे होतो. यांच्या कारखान्यांत दरसाल पंचवीस हजार टन वजनाची तार तयार होते. याच प्रकारचीं बिंडळीं (R. S. Nawall and Co. ) हिनें दाखविलीं होतीं. निआगराच्या धबधब्यावर या तारांचा लोंबता पूल बांधलेला आहे.

७. ( Trubner and Co. ) हिनें संस्कृत व जोऱ्यास्त्रियन् ( पार्शी लोकांची आद्यभाषा ) यांतील, तसेंच मिसर व असीरिया येथील प्राचीन ग्रंथांतील अति उपयुक्त व मौल्यवान् माहिती देणाऱ्या पुस्तकांचा भरणा दाखविला होता.

८. (Milners Safe Company.) हिनें जवाहीर, पैशाच्या नोटी, सनदापत्रें व रोकड ठेवण्याच्या लहान मोठ्या पेट्या दाखविल्या

होत्या. त्यांस चोर व अग्नि यांची भीति नाहीं. यांच्या कारखान्यांत अडीचशें टन वजनाची पेटी तयार केलेली आहे. जवाहीर कोर्टांतील पेट्या यांच्याच येथें तयार झाल्यापैकीं होत्या.

९. (Lincoln Bennet and Co.) या कंपनीनें जंजीर टोप व साहेबलोक व मडमा यांनीं घालण्याच्या वीस पंचवीस जातींच्या टोप्या दाखविल्या होत्या. यांत निजाम साहेब व जोहारचे महाराज यांच्या पगड्यांचे नमुनेही दाखविले होते.

१०. (W. Burroughs and Co. व Howard's Sons.) या कंपन्यांनीं शेंकडों प्रकारच्या औषधी, आरोग्यरक्षक द्रव्यें, व सुवासिक पदार्थ यांचा हजारों रु० किमतीचा भरणा दाखविला होता.

११. (Stiff (James) and sons of Boote (T. and R.) पहिलीनें पुतळे, व मृत्तिकेचीं नानाप्रकारचीं शोभिवंत पात्रें, आणि दुसरीनें इमारतीस व तक्तपोशीस लागणाऱ्या विटा व कौलें यांचे अनेक नमुने दाखविले होते.

१२. (The Aluminium Crown Metal Company.) (आल्युमिनम्) ही धातु आपल्या लोकांस माहित नाहीं. ती रुप्यासारखी पांढरी असून तिच्या अंगीं विशेष चकाकी असल्यामुळें तिच्या पदार्थांची जिल्हई फार दिवस टिकते. पण वजनांत ती रुप्यापेक्षां हलकी आहे. अन्य धातूपेक्षां ही कारागीर लोक अधिक पसंत करितात; कारण तिच्या अंगीं घनवर्धनीयता, प्रसरक्षमता, लवचिकपणा, इत्यादि गुण विशेष आहेत. या गुणांमुळें तिला "धातूंचा शिरामंड" असें नांव मिळालें आहे. ही पाहिजे त्या कामास उपयोगीं पडते. तांबें, कथील व जस्त या धातूंशीं ती मिश्रण पावते. हिचीं केलेलीं शोभिवंत पात्रें व दुसरें सामान वरील कंपनीनें दाखविलें होतें.

१३. (Coalbrookdale and Co.) हिनें वरील धातूचे व तांबें, लोखंड या धातूंचे पुतळे, पुष्पपात्रें, जिने, कारंजीं, स्थ्यांड, कठाडे, इत्यादि पदार्थांचा मोठा भरणा दाखविला होता.

१४. (Waterlaw and Sons.) हिनें अनेक जातींचीं, छा-

पण्याचीं, कागद आंखण्याचीं व कापण्याचीं, पाकिटें तयार करण्याचीं, लेबल ( निशाणी ) करण्याचीं, तारीख व नंबर मांडण्याचीं, आगगाडीकडील टिकिटें छापणें, मोजणें, रद्द करणें याचीं यंत्रें; कामगार लोकांस चालू कामाचे कागदपत्र ठेवण्यास लागणाऱ्या पेट्या, स्टेशनावर लागणारें सर्व प्रकारचें सामान, शिक्का, मोहोर करण्याचे छापे, टपालखात्याकडे लागणाऱ्या पेट्या, तराजू व वजनें; अनेक जातींचे स्टांप, निरनिराळ्या खात्यांकडील हिशेब ठेवण्याच्या बुकांचे नमुने इत्यादि पदार्थांचा मोठा भरणा दाखविला होता.

१९. ( Isaac Hollis and sons ) हिनें बंदुका, रायफल्स्, पिस्तुलें यांचे तीस पस्तीस नमुने दाखविले होते; त्यांत बारा हात लांबीची व पाऊण हात घेराची एक जंगी बंदूक होती.

१६. ( W. Macfarlane and Co., ) यांच्या कारखान्यांत फार माल तयार होतो. बागेंत उभारावयाचे टुमदार बंगले,-कारंजीं, जाळीदार काम केलेले कठाडे, दिवे वर लावून ठेवण्याचे-शोभिवंत खांब, पुष्प व दुसऱ्या वेली चढविण्याकरितां तारांचे कुंजाकृति सांपळे, कमानी, कोचें, खुर्च्या, इत्यादि अनेक पदार्थ दाखविले होते.

१७. ( Prices Patent Candle Company ) हिचा कारखाना फार मोठा आहे. यांत चौदाशें लोक कामास लावलेले आहेत. येथें निरनिराळ्या कामास लागणाऱ्या बोटापासून तों मणगटाएवढ्या मोठ्या मेणबत्त्या, साबण, व अनेक जातींच्या यंत्रांस लागणारीं तेलें तयार करितात; त्यांचे पुष्कळ मासले दाखविले होते. ताडाच्या तेलाच्या मेणबत्त्या प्रथम यांच्याच कारखान्यांत तयार होऊं लागल्या.

१८. ( "Willesden" Waterproof Paper and Canvas Company ) यांच्या कारखान्यांत हंगामी बंगले किंवा आश्रयाकरितां कोणत्याही प्रकारची जागा तयार करण्याच्या कामीं येणारे कागद व कनवास कापड हीं तयार होतात. यांचे केलेले बंगले सात आठ वर्षें टिकतात. ते उभारण्यास लांकूड, खर्च, काल व श्रम हीं थोडीं ला-

गतात. पाहिजे तेव्हां त्यांचें स्थलांतर करितां येतें. हे कागद व कापड यांचीं बिंडळीं व त्यांचे लहान बंगले उभारून दाखविले होते. या कागदाचा शंभर ग्यालनपर्यंत पाणी रहाण्यासारखा हौद करितां येतो.

१९. ( G. Smith and Co. ) हिनें सज्जास लावण्याचे कठडे, ब्यांडस्ट्यांड, न्हाणीघरें, छतें, कारंजीं, गेटें, कमानी, नागमोडी जिने, लहान दुकानें, प्ल्याटफॉर्मवरील आच्छादनें, देवडी, दीपस्तंभ इत्यादि तयार करण्यास लागणारें लोखंडी ओंतीव सामान दाखविलें होतें.

२०. ( R. Hudson and Co. ) यांनीं अमेरिका, आफ्रिका, यूरोप, आस्ट्रेलिया व इंडिया येथील हिरे व सोनें रुपें यांच्या खाणींकडे लागणाऱ्या निरनिराळ्या प्रकारच्या पंचवीस हजार गाड्या पुरविल्या आहेत. त्यांचे नमुने दाखविले होते.

२१. (The Telegraph Construction and Maintenance Company ) यांनीं लहान मोठ्या तारांचीं बिंडळीं दाखविलीं होतीं. समुद्रांतून जी तार नेतात ती यांच्या येथें तयार होते. ऐशीं लक्ष मैल तार येथें तयार होऊन पृथ्वीच्या सर्व भागांत पसरली आहे. एवढी लांब तार पृथ्वीस तीनशेंवीस वळसे घालून उरली असती.

२२. (Patent Nut and Bott Company ) यांच्या कारखान्यांत आगगाडीकडे व दुसऱ्या कामास लागणारा माल फार तयार होतो. येथें तीन हजार लोक कामावर असून चार हजार टन वजनाचा माल दर महिना तयार होतो.

२३. ( C. Cammell and Co. ) हिचा कारखाना फार मोठा आहे. त्यांत आगगाडीकडे लागणारीं यंत्रें, व दुसरें सामान तयार करितात. लोहमार्गाच्या गाड्यांस लागणारे कणे एक आपल्याच देशांत पंचवीस हजार पुरविले आहेत. अयोध्या व रोहिलखंड येथील लोहमार्गाकरितां सोळा हजार टन वजनाचे रेल तयार करून दिले असून न्यू साउथ वेल्स्करितां बहात्तर हजार टनाचे रेल तयार करून देण्याचा मक्ता घेतला होता. यांच्या येथें दर आठव-

ड्यास पांच हजार टन वजनाचे रेल तयार होतात. याशिवाय जहाजांचे शाफ्टस् ( Shafts ) व दुसरें सामान तयार होतें. येथें साडेपांच हजार लोक कामावर आहेत. त्यांस दर आठवड्यास एक लाख पांच हजार रु० पगार द्यावा लागतो.

२४. ( Decauville Aive. ) ही कंपनी फ्रान्स देशांतील आहे. यांचा कारखाना मोठा जंगी आहे. येथें अरुंद लोहमार्ग करण्यास लागणारें सामान, व खाणी व गिरण्यांत लागणारीं यंत्रें तयार होतात. तसेंच बागांत ठेवण्याचे शोभिवंत पदार्थ तयार होतात. यांच्या येथें दररोज पांच मैल लोहमार्ग तयार करण्यास लागणारें सामान व शंभर व्यागन्स ( गाड्या ) म्हणजे शंभर टन वजन लोखंडाचें काम तयार होतें. गेल्या सहा सात वर्षांत आपल्या व दुसऱ्या देशांत दोन हजार मैल लोहमार्ग बांधण्यास लागणारे रेल व तीस हजारांवर व्यागन्स पुरविल्या आहेत.

२५. ( Dixan James and Sons ) हिनें रुप्याचीं व मुलामा दिलेलीं अनेक प्रकारचीं भांडीं व दुसरे शोभिवंत पदार्थ दाखविले होते. ( James Brother and Co. ) हिनें लांकडी शोभिवंत सामानाचा मोठा भरणा दाखविला होता. ( G. Warner and Sons ) हिनें देवालयें, लोहमार्गावरील स्टेशनें व दुसऱ्या ठिकाणीं लागणाऱ्या लहान मोठ्या घाटेंचे अनेक नमुने दाखविले होते.
(J. Yates and Co. ) हिनें कारागिरांस लागणारीं हत्यारें व शेतकीचीं आउतें यांचा मोठा भरणा दाखविला होता. ( Duncan Brothers ) यांनीं शेंकडों जातीच्या यंत्रांचे पोटोग्राफ दाखविले होते. ( Hadlay Brothers ) हिनें पंचवीस प्रकारचे तारांचे केलेले खिळे दाखविले होते. ते मोठ्या गमतीनें जुळून ठेविले होते.

एकीनें अनेक प्रकारच्या शोभिवंत कार्ड्स; मानपत्रें लिहिण्याकरितां उत्तम चर्मपत्रांचे मासले ; ब्यांक, करेन्सि, प्रॉमिसरी इत्यादि नोटी तयार करण्याचे कागद ; त्यांजवरील निरनिराळ्या जातींचे छाप; अनेक प्रकारच्या स्टांप कागदाचे मासले; सरकारी व सावकारी जमाखर्च ठेवण्याचीं बुकें, हीं दाखविलीं होतीं. एकीनें तारांनीं गुंफ-

लेले पक्षी ठेवण्याचे लहान सुबक पिंजरे, झाडें, फुलपात्रें, पुष्पवेलीवर सोडून मनुष्यांस आंत बसतां उठतां यावें एवढें मोठें कुंज तयार करण्याचे सांपळे, दाखविले होते. एकीनें सर्व प्रकारची स्टेशनरी (लिहिण्यास लागणारें सामान) जसें, अनेक जातींचे नोटपेपर, पाकिटें, टांक, टांचण्या, पेना, मोहर करण्याचीं वेफरें, चाकू, कात्र्या, कागदकापण्या, आंखण्या इत्यादि पदार्थ दाखविले होते. त्यांतील टांक व टांचण्या हीं अशा शिताफीनें लावून ठेविलीं होतीं कीं त्यांच्या वेगवेगळ्या आकृति बनविल्या असून त्या टांक व टांचण्या यांच्या बनविल्या असें एकदम लक्षांत सुद्धां येत नसे. एकीनें हत्ती, वाघ, रानरेडे, डुकरें व दुसरे पशुपक्षी मारण्याच्या बंदुका, दारू, छरे, काडतुसें, क्यापस्, व शिकारीस लागणारें दुसरें सामान दाखविलें होतें. कोणीं रसायन शास्त्राच्या क्रिया करून दाखविण्यास लागणारीं (Chemicals) रसायन द्रव्यें दाखविलीं होतीं. कोणीं शस्त्रवैद्य, दंतवैद्य, नेत्रवैद्य, अश्ववैद्य यांस लागणारीं शस्त्रें दाखविलीं होतीं. कोणीं नानाप्रकारच्या लहान मोठ्या दुर्भिणी, चष्मे, डोळ्यांच्या रक्षणार्थ केलेले बारीक तारांचे गाज दाखविले होते. रसायनें तयार करणारे किंवा तीं वापरणारे लोकांस व कांहीं कारखान्यांत काम करणाऱ्या लोकांस हे गाज नेत्ररक्षणाच्या मोठे उपयोगीं पडतात. एकीनें सुवासिक तेलें, पाणी व दुसरीं द्रव्यें दाखविलीं होतीं. एकीनें अनेक जातींच्या साबणाचे मासले दाखविले होते. येथें साबणाचा एक गणपती दाखविला होता. तो संगमरवरी दगडाचा केल्याप्रमाणें दिसे.एकीनें सोनेरी व दुसऱ्या रंगांचीं निरनिराळ्या प्रकारची वेलबुटी काढलेल्या कागदांचीं बिडळीं दाखविलीं होतीं. एकीनें (silicate) कापूस दाखविला होता. हा लोखंडाच्या अशोधित गाळापासून तयार करितात. हा दिसण्यांत मळीण व उद्भिज्ज कापसाप्रमाणें दिसतो; खनिज कापसाचा ही मासला येथें दाखविण्यांत आला होता.

कांहीं कंपन्यांनीं हंडया, झाडें, झुंबरें, वालशिटें, आरसे, शोभिवंत पात्रें इत्यादि बिलोरी सामान दाखविलें होतें. हीं निरानिराळ्या रंगांचीं असून कांहींवर मिना केल्याप्रमाणें वेलबुटीचें सुरेख काम

केलें होतें. कांहींनीं पाषाण व मृत्तिका यांचे शोभेकरितां दिवाणखान्यांत मांडून ठेवण्याचे व उपयोगीं पडणारे पदार्थ दाखविले होते. कांहींनीं नानाप्रकारचें शोभिवंत व उपयोगी लांकडी सामान दाखविलें होतें. त्यांतील कांहीं खुर्च्यांत असें कळसूत्र केलें होतें कीं, त्यांजवर बसून आसन न बदलतां आपणास पाहिजे तिकडे वळतां येत होतें. कांहींनीं लहान मोठीं दहा रुपयांपासून दहाहजार रुपये किमतीचीं शेंकडों घड्याळें दाखविलीं होतीं. कांहीं कंपन्यांनीं रेशीम, लोंकर व सूत यांचे निरनिराळ्या जातीचे कपडे दाखविले होते. यांची सफई, बारीकपणा, त्यांतील वेलबुटी व जाळीदार काम हीं पाहून मन थक्क होऊन जाई. कांहींनीं बग्या, रथ, घोडे न लावतां पायांनीं स्वतः चालविण्याच्या दोन व तीन चाकी गाड्या दाखविल्या होत्या. यांत एक बगी अशी खुबीदार होती कीं, झांकून घेऊन आंत बसून ती हांकितां येत होती. एकीनें, काथ्या, ताग यांचे लहान मोठे अठ्ठावीस प्रकारचे दोर दाखविले होते. कांहींनीं खाद्य व पेय पदार्थांचा भरणा दाखविला होता. कांहीं सुस्वर वाद्यें व खेळण्याचे मजेदार पदार्थ दाखविले होते.

किरकोळ—दारू, सोडावाटर वगैरेच्या बाटल्यांच्या बुचांस तारेचे तुकडे बांधितात, व उघडतांना ते काढून टाकितात; हे तुकडे एका कावळ्यानें एकत्र जमवून त्यांचें घरटें बांधिलें आणि त्यांत अंडीं घातलीं. हें घरटें आंतील अंड्यांच्या टरपलांसह दाखविलें होतें. मासे धरण्याचे आंकडे ( हुक ) दाखविले होते. हे केंसाइतके हलके असतात असें म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं. कारण एका तोळ्यांत चार हजार म्हणजे एक गुंजेंत चाळीस आंकडे तयार करितात. ( Anchor line steamer ) चा नमुना दाखविला होता. यांतील यंत्रें व रचना हीं पाहून मनास साल्हाद आश्चर्य वाटतें. प्रिन्स ऑफ् वेल्स् व डयूक ऑफ् एडिम्बरो हे आपल्या देशांत आल्यावेळीं त्यांनीं पुष्कळ शिकार केली तींत एके जाळींत एक वाघ व दुसरींत वाघीण व तिचीं पिलें असतां त्यांस गोळी घालून मारिलें. जाळींत असलेला तो वाघ व पिलांसह वाघीण येथें दाखविली होती.

## फ्रेंच कोर्ट.

या कोर्टास वरील कोर्टाच्या शेजारीं जागा दिली होती. पण यांतील कांहीं पदार्थ वड्या चौकाच्या उत्तरेकडील दुसऱ्या मजल्यावर ठेविले होते. या कोर्टांतील संग्रह म्हणण्यासारखा मोठा नव्हता. कारण जानेवारी महिन्याचे अवधीपर्यंत सर्व माल आला नव्हता, व याच कारणामुळें या कोर्टाचा क्याटलाग तयार होण्याचा राहिला होता. तत्रापि येथें दाखविलेल्या पदार्थांचें सौंदर्य, कारागिरी, झकाकी व टुमदारपणा हीं पाहून फ्रान्स देशांतील लोक मोठे कुशल, आनंदी व मिजाशी म्हणून जी प्रसिद्धि आहे ती योग्य आहे असें वाटलें.

रेशमी, लोंकरी व सुती कपडे; हे मसलिन प्रमाणें मोठे बारीक असून त्यांत अंगच्या फुलांचें व वेलबुटीचें सुरेख काम केलें होतें. तसेंच जाळीदार व कशिद्याचें काम केलेले कपडे; लोंकरी फुलझाडें व त्यांवर लहान फळें; सोनें व रुपें यांचे खरे व खोटे दागिने, यांतील कांहींची करणावळ फार तारीफ करण्यासारखी होती. स्त्रियांनीं वक्षस्थलीं व गळ्यांत घालण्याचे दागिने, जसें लाकेटस्, ब्रूचेस्, हार इत्यादि हे त्यांच्या शरीरास मोठी शोभा देणारे आहेत. यांत लहान घड्याळें, मासे, फुलपांखरें बसविलेलीं असतात, व हे खऱ्या किंवा कृत्रिम रत्नांनीं जडविलेले असतात. येथें कृत्रिम रत्नें अशीं उत्तम तयार करितात कीं, खऱ्या पारख्याशिवाय तीं कृत्रिम म्हणण्याचें कोणाच्या लक्षांत यावयाचें नाहीं; आरसे व बिलोरी सामान, यांतील कांहींवर मिन्यासारखें वेलबुटीचें काम केलें होतें. स्त्रिया व पुरुष यांनीं वापरण्याचीं अनेक तऱ्हेचीं घड्याळें; लहानसे डौलदार पिंजरे व त्यांत मंजुल शब्द करणारे सुरेख पक्षी; सुस्वर वाद्यांच्या पेट्या; नाना प्रकारच्या दुर्भिणी; खनिज जलें व औषधें; निरनिराळ्या उपयोगास येणाऱ्या बंदुकी व पिस्तुलें, दोन तीन पुतळे, यांचें काम फारच वर्णनीय होतें. या देशांतील एके कंपनीनें प्रदर्शनगृहाच्या आवारांत ट्रॅमवेसारखा आगगाडीचा अरुंद रस्ता करवून लोकांस दाखविण्याकरितां चालू ठेविला होता.

## जर्मन कोर्ट.

या कोर्टास जवाहीर कोर्टाच्या उत्तरेकडील वरांड्यात जागा दिली होती. येथलि पदार्थसंग्रह बराच मोठा होता. तो तीस पस्तीस कंपन्यांनीं दाखविला होता.

येथें येशूख्रिस्ताची बाल्य, मध्यम व प्रौढ अवस्था दाखविणारे दहा बारा पुतळे दाखविले होते. त्याची माता जी कुमारी मेरी तिचे ही तीन पुतळे होते. अनेक कोर्टांत निरनिराळे पुतळे होते, पण सौंदर्याच्या संबंधानें यांच्यासारखे दुसरे उत्तम नव्हते. मेरी आपल्या प्रिय बालकास कडेवर घेऊन त्याजकडे मोठ्या प्रेमानें व कौतुकानें पहात आहे. बाळाचें हास्यमुख, पाणीदार नेत्र व अंगावरील बाळसें हीं फारच उत्तम साधलीं आहेत. यांच्या पुढच्या बाजूस सेंट पॉल व सेंट पीटर यांचे दोन पुतळे उभे केले होते. ख्रिस्ताचा क्रॉस व त्यास फांशीं दिल्याचा देखावा येथें दाखविला होता. पलीकडच्या बाजूस ख्रिस्ताच्या धर्मांतील लीला दाखविणाऱ्या चार पांच तसबिरा टांगून ठेविल्या होत्या. यांच्या समोर एक उंच सुंदर मखर उभें केलें असून त्यास चांदवा दिला होता. शेजारीं एके कपाटांत सर्व जातींच्या रंगाचे उत्तम मासले व त्या रंगांनीं रंगविलेले रेशमी कपडे दाखविले होते. हे रंग मोठी तारीफ करण्यासारखे होते. एका कपाटांत कृत्रिम फळें मांडून ठेविलीं होतीं. यांतील द्राक्षांचे घोंस मोठे हुबेहूब होते. एकांत लहान मोठ्या खोट्या मोत्यांच्या सरी लावून ठेविल्या होत्या. यांतच कलाबतूचे केलेले गोफ व गोंडे व सलम्याचें काम करण्यास लागणारें सामान होतें. या देशांत कलाबतूचें व सलम्याचें काम फार उत्तम तयार होतें. याच कपाटांत चार कोपऱ्यांस सोनें व रुपें यांच्या कलाबतूचीं बारीक नकशीदार फुलझाडें करून ठेविलीं होतीं.

तांबें व पितळ यांच्या केंसासारख्या बारीक व मोठ्या तारा चार वोटें लांब नळकंड्यांस गुंडाळून तीं मोठ्या खुबीनें जुळून ठेविलीं होतीं. या तारांनीं विणलेलीं जाळीदार व दुसऱ्या प्रका-

रचीं कापडाच्या बिडळ्यासारखीं बिडळीं दाखविलीं होतीं. गार किंवा दुसरा दगड याच्या लहान चकत्या घेऊन त्यांत मनुष्यें व दुसरे प्राणी कोरलेले दाखविले होते. याच दगडाचे लहानसे सुबक डबे केलेले दाखविले होते. बुचांचे तुकडे जुळून त्यांचा चार पांच हात उंचीचा एक बुरूज उभारला होता. पियानो, हार्मोनियम् इत्यादि सुस्वर वाद्यें; कांहीं प्रकारचे कपडे, कांचेचीं व मृत्तिकेचीं शोभिवंत पात्रें; खाद्यपदार्थ व कांहीं प्रकारच्या पिण्याच्या दारू, सुवासिक द्रव्यें व दुसरे पदार्थ दाखविले होते. याच कोर्टाच्या एके बाजूस निरनिराळ्या प्रकारचें शिवणकाम करण्याचीं यंत्रें दाखविलीं होतीं.

## इटालियन कोर्ट.

हें कोर्ट आस्ट्रेलियन कोर्टाच्या दक्षिणेस होतें. येथील पदार्थसंग्रह मोठा नव्हता. व त्यांच्या प्रदर्शकांची संख्याही विशेष नव्हती. तत्रापि यांतील कांहीं पदार्थ मोठे वर्णनीय होते.

उत्तम पुतळे व तसबिरी तयार करण्याकरितां या देशांतील कारागिरांची प्रसिद्धि असल्याप्रमाणें कांहीं उमदे पुतळे दाखविले होते. यांची करणावळ मोठी चित्तवेधक होती. यांतील दोन तीन पुतळे निजाम सरकारांनीं विकत घेतले म्हणून कळलें. संगमरवरी दगडाच्या खाणी आपल्या देशांत अजमीर व जयपूर इकडे जशा पुष्कळ आहेत तशाच या देशांतही आहेत. या दगडांचे कांहीं मासले व त्यांचे केलेले सुरेख पदार्थ दाखविले होते. वेसूवियस नांवाच्या पर्वतावरील ज्वालामुखींतून एक प्रकारच्या रांध्यासारखा द्रव बाहेर पडतो, त्यास इंग्रजींत लाव्हा असें म्हणतात. या द्रवाचे गळ्यांत घालण्याचे हार व मुखवटे केलेले दाखविले होते. प्रवालाचे पदार्थ—गळ्यांत घालण्याचे लहान मोठे हार; सर्वांत मोठ्या हाराची किंमत सहा हजार रुपये लिहिली होती. याच किंमतीचा पाटल रंगाच्या प्रवालाचा दुसरा एक हार होता. याजवरील कुसर काम पहाण्यासारखें होतें. मजेदार लहान पुष्पें, मुखवटे व दुसरे शोभिवंत पदार्थ दाखविले होते. लहान पेरूएवढीं मोठीं कांहीं

सुटीं पोंवळीं दाखविलीं होतीं. शिंपल्याचे पदार्थ—एका शिंपल्यावर महाराणीसाहेब व युवराज प्रिन्स ऑफ् वेल्स् यांचे मुखवटे कोरले होते; आणि त्यांच्याभोंवतीं सुरेख पुष्पवेली व तिजवर लहान पक्षी कोरले होते. हें काम तयार करण्यास दोन वर्षें लागलीं म्हणून समजलें. याचीही किंमत सहा हजार रुपये लिहिली होती. याच प्रकारचे पण कमी मोलाचे लहान हार, मासे, पुष्पें, पक्षी, सर्प व दुसरे शोभिवंत पदार्थ दाखविले होते. सोनें व रुपें यांचे मिलान शहरांत तयार केलेले अलंकार, थोडेंसें बिलोरी सामान, रंगविलेलीं चामडीं, मुलांनीं खेळण्याचे पदार्थ, मणगटाएवढ्या मोठ्या मेणबत्त्या, आलिव नामक वृक्षाच्या तेलाचे मासले इत्यादि अनेक पदार्थ दाखविले होते.

## इतर कोर्टें.

येथपावेतों आम्हीं कांहीं मुख्य कोर्टांतील पदार्थसंग्रहाची थोडीशी माहिती दिली; बाकी राहिलेल्या कोर्टांतील कांहीं कोर्टें पहाण्यास आम्हांस सवड झाली नाहीं, पण तीं विशेष महत्वाचीं नव्हतीं. पुढें सांगितलेलीं पांच सहा कोर्टें आम्हीं थोड्या वेळांत पाहून घेतलीं त्यांचें टिपण देऊन हें प्रकरण पुरे करितों.

**स्विस् कोर्ट**—या देशांतील जिनीवा नांवाचें शहर घड्याळें तयार होण्याकरितां प्रसिद्ध आहे. तेथें तयार झालेलीं लहान मोठीं अनेक प्रकारचीं घड्याळें, बाजाच्या पेट्या, लढाईस लागणारें कांहीं सामान व दुसरे थोडे पदार्थ आमच्या पाहण्यांत आले.

**बेलजियम् कोर्ट**—वरील कोर्टाप्रमाणें या कोर्टांतील संग्रहही लहान होता. त्यांत पाहण्यासारख्या मुख्य वस्तु—घरांत वापरण्याचीं लोखंडी पत्र्याचीं भांडीं, यांजवर गिल्ट काम केलेलें होतें; फलानिल, ब्ल्यांकिटें व दुसरे लोंकरीचे कपडे; संगमरवरी दगडाच्या चिपा, तारायंत्राकडील सामान; शेतकीचीं आउतें; व साबण इत्यादि पदार्थ दाखविले होते.

**आस्ट्रियन कोर्ट**—हें इटालियन कोर्टाशेजारीं होतें. निरनिराळ्या प्रकारचें कांचेचें सामान, यांतील कांहींवर वेलबुटीसारखें काम केलें होतें. लोंकरी व सुती शाली, दुलया, मृत्तिकेचीं पात्रें व पलंग, खुर्च्या, इत्यादि लांकडी सामान दाखविलें होतें. यांतील लांकडी सामान मात्र तारीफ करण्यासारखें होतें. म्यूझियम् चौकांतील संगमरवरी दगडाचें सिंहासन याच देशांतील एके कंपनीनें उभारलें होतें. त्याचें वर्णन वेगळेंच पुढें दिलें आहे.

**युनायटेडस्टेट्स् कोर्ट**—या देशाच्या लौकिकाप्रमाणें येथून पदार्थसंग्रह आला नव्हता. अमेरिकेंतील प्रसिद्ध शहरांचे देखावे; देशांच्या माहितीचीं पुस्तकें, ग्लोब, कांचेचीं फुलें व फळें हीं मोठीं सुरेख होतीं; निरनिराळ्या प्रकारचें शिवणकाम करण्याचीं यंत्रें; डुकरें मारण्याचें विशेष प्रकारचें यंत्र; स्टेशनरीचें सामान, रबराचे केलेले अनेक पदार्थ, छत्र्या, साबणाचे मासले व कांहीं औषधी पदार्थ दाखविले होते.

**ब्रिटिशग्वायना कोर्ट**—या कोर्टांत उद्भिज पदार्थांचा मोठा भरणा होता. पन्नास साठ जातींच्या औषधी वनस्पतींच्या साली; अनेक वृक्षांच्या काष्टांचे मासले; ज्यांपासून तंतु निघतात अशा वनस्पती व गवतें; खाण्याच्या उपयोगीं पडणारीं अनेक वनस्पतींपासून काढलेलीं पिठें; साखरेचे मासले; (Starch) स्टार्च, नारळ, कॉफी, तांदूळ यांचे मासले; नानाप्रकारच्या फळांचे मोरंबे व लोणचीं, व रम् नांवाची पिण्याची दारू हीं दाखविलीं होतीं. याशिवाय दोऱ्यांचा विणलेला पाळणा, एक जातीच्या कांसवाच्या दांतांचा केलेला हार; हातांत धरण्याच्या काठ्या; राघू व दुसरे पक्षी यांच्या पंखांचे केलेले किरीट इत्यादि पदार्थ दाखविले होते.

या वसाहतींत हंगामाच्या दिवसांत रोजगाराकरितां आमच्या देशांतून मजूर दरसाल जातात. या लोकांनीं मजूरी करून किती पैसा आपल्या देशांत मिळवून नेला याचा सूचक सुलामा दिलेला सोन्याचा एक स्तंभ या कोर्टाच्या मध्यभागीं उभा केला होता.

त्याचें वजन दोन लक्ष तीस हजार पांचशें तोळे होतें. म्हणजे चाळीस लाख रुपयांपेक्षां अधिक पैसा यांनीं या वसाहतींतून नेला.

## जवाहीर कोर्ट,

### व तसबिरांची ग्यालरी.

हें कोर्ट ता०२९ डिसेंबर रोजीं खुलें झालें. तें इतके दिवस न उघडण्याचें कारण कोणी म्हणत कीं, तें चालू करण्यासारखी तयारी झाली नव्हती; कोणी म्हणत कीं, जे लोक बाकीचें प्रदर्शन एक किंवा अनेक वेळ पाहून गेले होते ते या कोर्टांतील मोठें मौल्यवान् जवाहीर व अत्युत्तम तसबिरी पहावयास पुनः एक वेळ तरी येतील या उद्देशानें **एम्. जोबर्ट** यांनीं तें उघडण्याचें काम बुद्धया लांबणीवर टाकलें होतें. कसेंही असो, पण हें कोर्ट चालू झाल्यावर प्रेक्षक लोकांची गर्दी पूर्वीपेक्षां फार अधिक होऊं लागली होती. प्रदर्शनगृहांत दाखविलेल्या पदार्थसंग्रहाविषयीं या पुस्तकांत फार अल्प माहिती दिली असल्याचें आरंभीं सांगितलेंच आहे. तत्रापि हें कोर्ट व पुढील दोन तीन कोर्टें यांजविषयीं कांहीं विशेष माहिती देण्याचा यत्न केला आहे.

नवीन एक पक्की इमारत बांधली असल्याचें मागें सांगितलेंच आहे. तींत हें कोर्ट भरविलें होतें. याची लांबी सुमारें नव्वद व रुंदी तीस फूट होती. या दिवाणखान्याच्या चारीही बाजूंच्या भिंतींस आपल्या व परदेशांतील प्रसिद्ध चित्रकारांनीं काढिलेल्या अतिसुरेख व मौल्यवान् तसबिरी टांगून ठेविल्या होत्या. यांतील कांहीं उत्तमांचें टिपण देऊन नंतर जवाहिरांचें वर्णन देऊं.

दिवाणखान्यांत जाण्याबरोबर डाव्या बाजूस आपल्या महाराणी साहेब यांची पूर्ण आकाराची एक व उजवीकडे एम्. जोबर्ट यांची एक अशा दोन तसबिरी लावून ठेविल्या होत्या. तैमूरलंग बादशहाची व त्याच्या नंतर बहादरशहापर्यंत जे गादीवर बसले त्यांच्या समूहाची, सर जंग बहादूर, उदेपूरचे राणेसाहेब, रणजितसिंग, जसवंतसिंग महाराज, राजा काली बहादूर, अकबर बादशहाचा दरबार,

जहांगीर बादशहाच्या वेळीं झालेली एक लढाई, टोंकचे नबाबसाहेब, बडोदें, जयपूर, भावनगर, दर्भंगा, पतियाला येथील महाराज यांच्या, त्रावणकोरच्या थोरल्या राणीसाहेब लक्ष्मीबाई, मुंबईचे प्रसिद्ध व्यापारी डेविड सासून, व बाळासाहेब शास्त्री पटवर्धन, यांच्या तसबिरी दाखविल्या होत्या. जसवंतसिंग महाराजांच्या तसबिरीची किंमत सव्वासहा हजार रुपये लिहिली होती.

एक वनदेवता नग्न होऊन स्नान करीत असतां सेंटार नांवाचा राक्षस तिला पाठीवर घेऊन बलात्कारानें नेत आहे; एक तरुण व रूपवती स्त्री गाईची धार काढीत असतां तिच्या लहान बालकानें मागून येऊन तिच्या गळ्यास गच्च मिठी मारिली असतां ती साल्हाद कौतुकानें त्याजकडे पहात असून तशीच धार काढीत आहे; एक बंगाली स्त्री शिवपूजा करीत आहे; एक सुंदर स्त्री बीन वाजवीत बसली आहे; तिची किंमत तीनशें रुपये लिहिली होती; नेटिव स्त्रियांचा समूह; मोहरम, हिची किं. ४००० लिहिली होती. ही व दुसऱ्या कांहीं तसबिरी निजाम साहेबांनीं खरेदी केल्या. एक कोळी आपल्या बायकोचा हात धरून तिला आपल्या झोंपडींत नेत आहे; एक गुजराथी शिंपी शिवण काम करीत बसला आहे; मि. नेटलशिप् नांवाच्या प्रसिद्ध चिताऱ्यानें काढलेली चित्त्याची शिकार; प्रिन्स ऑफ् वेल्स आपल्या देशांत आल्यावेळीं त्यांनीं ही शिकार केली होती; स्विट्झर्लंड, इटली, काश्मीर इत्यादि देशांतील रमणीय देखावे; अमृतसर येथील सोनेरी देवालय; अजंटा येथील कोरींव लेणीं; लाहोर, दिल्ली, आग्रा इत्यादि जागच्या प्रसिद्ध इमारती, कृष्ण, बलदेव, महाकाली, मोहिनी, शीक लोकांचा गुरु नानक, वसंत, हिंवाळा, पावसाळा, यांच्या व दुसरे नामांकित देखावे, स्थलें, इमारती, व प्रसिद्ध पुरुष यांच्या येथें हजारों तसबिरी दाखविल्या असून त्या लाखों रुपये मौल्याच्या होत्या. तसेंच हस्तिदंती व रांध्याच्या चकत्यांवर प्रसिद्ध पुरुषांचे काढलेले मुखवटे दाखविले होते, जवळ जाऊन या तसबिरी पहातां याव्या, पण त्यास हात लावतां येऊं नये म्हणून भिंतीपासून एक गज अंतरावर सभोंवतीं गज लावून कठडा केला होता.

आतां येथील जवाहिराची माहिती देण्यापूर्वी त्याच्या संरक्षणार्थ जो बंदोबस्त केला होता त्याजविषयीं प्रथम दोन शब्द लिहिणें योग्य वाटतें. कोर्टाच्या द्वारा बाहेर गोऱ्या शिपायांचा खडा पहारा ठेविला होता. त्यांत दोन शिपाई द्वारापाशीं एकसारखे उभे असत. शेंपन्नासांपेक्षां अधिक प्रेक्षकांस आंत जाऊं व राहूं देत नसत. आंत गेल्यांपैकीं दहावीस लोक पाहून परत आले म्हणजे पुनः तितके आंत सोडीत; पण हा नियम गौरकाय लोकांस लागू नव्हता. कोर्टांत कांहीं शिपाई जवाहिराकडे किंवा प्रेक्षकांकडे नजर ठेवून एकसारखे टेहळत असत. याप्रमाणें कडक बंदोबस्त ठेविला होता, तथापि एक ( किंवा २ अधिक ) वस्ताद भामट्यानें आपला वस्तादपणा गाजविला, यामुळें फार मौल्यवान् जवाहीर होतें तें येथून काढिलें; अर्थात् जे लोक पुढें प्रदर्शन पहावयास गेले त्यांस तें पहावयास मिळालें नाहीं म्हणून वर्तमान ऐकिलें. असो, अन्य कोर्टांप्रमाणें येथेंही मौल्यवान् व मजबूद कपाटें मध्यभागीं ओळीनें ठेविलीं असून त्यांच्या झडपांस उत्तम तावदानें बसविलीं होतीं. त्यांच्या दोहों बाजूंस फिरतां येण्यास प्रशस्त वाट सोडली होती. कपाटांतून सर्व जवाहीर अशा व्यवस्थेनें मांडून ठेविलें होतें कीं प्रेक्षकांच्या तें चांगलें दृष्टीस पडावें.

**मुरशिदाबादचे नवाब साहेब यांनीं दाखविलें तें.**

१. तीन पाचांची पोंची, मधील पाच चौकोनी, एक इंच लांब व तितकीच रुंद, बाजूंच्या दोन पाचांत चिचोक्या एवढे हिरे बसविले आहेत.

२. शिरोभूषण ( तुऱ्यासारखें ); याच्यामधील हिरा एक इंच लांब व पाउण इंच रुंद, भोंवताले दहा मोठे तरतरे बसविले आहेत.

३. फ्रान्सदेशाची माजी बादशाहीण जी युजिनिस् हिचा हिऱ्यांचा स्टार ( पांच पाकळ्यांच्या फुलासारखा,); प्रत्येक पाकळीस उत्तम चार हिरे बसविले आहेत. किंमत रुपये अडीच लक्ष.

४. एका हिऱ्याचें पदक, यांतील मुख्य हिरा दीड इंच लांब व तितकाच रुंद. याचें नाव दर्यानूर ( तेजाचा प्रवाह ) यास को-

हिनूरचा धाकटा बंधु म्हणतात. वडील बंधूचें वर्णन आम्हीं वाचलें आहे, त्यावरून यास त्याचा धाकटा बंधु हें पद चांगलें शोभत नाहीं असें आम्हांस वाटलें. याच्या भोंवतीं चिंचोक्या एवढे दहा हिरे जडविले आहेत.

५. एका पाचेची पोंची. हिची लांबी व रुंदी दीड इंच, भोंवतालीं उत्तम हिरे बसविले आहेत. बाजूंच्या दोन हिऱ्यांवर नकशीसारखें कांहीं बारीक काम केलें आहे.

६. रुप्याच्या बारीक तारांनीं गुंफलेला एक हत्ती; याजवरील अंबारीचें व खालच्या चौकीचें काम मोठें तारीफ करण्यासारखें आहे.

**बरद्वान येथील महाराजांनीं दाखविलें तें.**

१. लहान मोठ्या भोंकराएवढ्या वाटोळ्या पैलूदार हिऱ्यांचा हार, यांत मोठे हिरे सत्तावीस आहेत.

२. हिरेजडित पगडी. यांत मोठे हिरे दहा आहेत. सर्वांत मोठा बदामाएवढा असून तशाच घाटाचा आहे. या सर्व हिऱ्यांचें तेज अप्रतिम आहे. यांतील मध्यम हिरे लिंबोणीएवढे, व लहान आहेत ते पावट्याएवढे; यांची किंमत रुपये ११ लक्ष.

३. पगडीवर बसविण्याचा शिरपेंच. यांतील मुख्य पाच एक इंच लांब व एक इंच रुंद आहे.

४. माणिकें व हिरे यांनीं जडित शिरपेंच. यांतील थोरलें माणिक पुणें शिक्क्याएवढें, व लहान त्याच्या पाउणपट.

५. पाचा, हिरे, माणकें यांनीं जडित पगडी; दुसरी.

६. पगडी नंबर तीन, हिजवर नुसतीं माणकें बसविलीं आहेत.

७. पाचाचा हार, यांतील मोठ्या पाचा पुणें शिक्कयाएवढ्या, व लहान गाडी अधेली एवढ्या आहेत.

८. सोन्याचा हौदा, भोंवतालच्या कठड्यास फिरक्या बसविल्या आहेत. एका भामट्यानें वस्तादगिरी गाजविल्याचें वर सांगितलें आहे; ती यांतील एक दोन फिरक्या व दुसरा कांहीं जिन्नस लांबविल्याचें ऐकिलें ही होय.

९. रुप्याचा एक मोठा मेणा.

## राय बद्रीदास बहादूर मुकिम, कलकत्ता येथील एक बडे सावकार यांनीं दाखविलें तें.

१. हिऱ्यांचा शिरपेंच, यांत पैलूदार हिरे आहेत. यास सात पदकें आहेत. प्रत्येक पदकांतील हिरा मोठा आहे.

२. लसण्यांचा शिरपेंच. यांतील सर्वांत मोठ्या लसण्याची लांबी सव्वा इंच व रुंदी एक इंच. याची घडणावळ फार सुरेख आहे. किंमत रुपये पाऊण लक्ष.

३. लाल नांवाच्या रत्नांचा हार. यांत दहा पदकें आहेत. थोरला लाल पुणें शिक्क्याएवढा. प्रत्येक पदकाभोंवतीं चौकोनी आठ पाचा बसविल्या आहेत. किंमत रुपये एक लाख.

४. मोत्यांचा हार, यांत फार मोठे दाणे सतरा; सर्वांत मोठा मध्यम जांभुळाएवढा आहे; लहान आहेत ते भोंकराएवढे; प्रत्येक पदरास मध्यें हिऱ्याचे लोलक आहेत. यांत ८५ दाणे आहेत. किंमत रुपये अडीच लक्ष.

५. हिऱ्यांचा हार, पदकें दहा, मुख्य हिरे दहा; मधल्या पदकांतील हिरा मध्यम जांभुळाएवढा; लहान आहेत ते निंबोणी-एवढे. किंमत रुपये दीड लक्ष.

६. पाचांचा कमरपट्टा; मधील पाच फार मोठी आहे. तिचा व्यास दीड दोन इंच येईल. तिच्या प्रत्येक बाजूस तेरा पाचा आ-हेत; त्या पुणें शिक्क्याएवढ्या आहेत.

७. एक पाचेचा पेला, याच्या तोंडाचा व्यास दोन सव्वादोन इंच असून उंचीही तेवढीच आहे.

८. माणकांचा कंठा, याच्या पदकांतील मुख्य माणिक पुणें शिक्क्याएवढें आहे. मधल्या पदकाच्या खालीं लोंबणारें लहान जांभु-ळाएवढें आहे. बाकीचीं अर्ध रुपया व अर्धपैशाएवढीं आहेत. यांत सोळा माणकें मोठीं आहेत.

याशिवाय आणखी दोन तीन दागिने या सावकारांनीं दाख-विले होते. त्या सर्वांची किंमत वीस लक्ष रुपये होती. याच गृहस्थां-

नीं वीस लक्ष रुपये किंमतीचा शंकराचा कैलास दाखविला होता. त्याचें वर्णन खालीं देतों.

**शंकराचा कैलास**—सुमारें सव्वाफूट लांब, एक फूट रुंद व तितकाच उंच असा चौकोनी सुवर्णाचा देव्हारा केला आहे. त्यास दोन मजले आहेत. वरील मजल्याचें काम जाळीदार आहे. याजवर मेघडंबरी आहे. खालच्या मजल्याच्या बाजूवर नकशीचें काम केलें आहे. वरील मजल्याच्या मध्यभागीं शिवाची शाळुंखा आहे. ती स्फटिकाची आहे. तिजवर नील रत्नाचें लिंग बसविलें आहे. तें खबुतराच्या अंड्याएवढें होईल. शाळुंखेच्याभोंवतीं करंगळीच्या पुढच्या पेराएवढीं नवरत्नें जडविलीं आहेत. शंकराच्या उजव्या बाजूस तीन साडेतीन बोटें उंचीचा गणपति आहे. तो एका माणिकाचा आहे. डावे बाजूस तेवढाच मोठा दुसरा आहे. तो " क्याट्स् आय् " म्हणजे मांजराच्या डोळ्यासारखें चमकणारें एक रत्न आहे त्याचा आहे. दोन्ही गणपतींचीं सिंहासनें रत्नजडित आहेत. दोहोंपुढें दोन लहान उंदीर आहेत. ते एकेक मोत्याचे आहेत. उजव्या बाजूच्या गणपतीपुढें सूर्य व डावीकडे चंद्र आहेत. सूर्य माणकाचा व चंद्र पाचेचा आहे. या दोहोंच्या मध्यें एक नंदी ठेविला आहे. तो नील रत्नाचा असून जांबुळाएवढा मोठा आहे. दुसऱ्या मजल्याची तक्तपोशी हिरेजडित आहे. मेघडंबरीच्या खालच्या बाजूस रत्नमणी लोंबत सोडिले आहेत.

या कैलासाचे मालक आम्हांस एके दिवशीं याच कोर्टांत भेटले होते. त्यांच्या सांगण्यावरून सर्व कैलासाची किंमत वीस लक्ष रुपये आहे. यांतील शंकराचें लिंग, गणपति, सूर्य, नंदी हीं रत्नें मकसुदाबाद येथील प्रसिद्ध सावकार जगत्शेट व लखनौचे नबाब साहेब यांजपासून त्यांनीं खरेदी केलीं. क्याट्स् आयचा गणपति म्हैसुराहून आणविला. हे बडे जवाहिरी मोठ्या उदार अंतःकरणाचे आहेत; कारण हा कैलास कोणी मोठे राजेरजवाडे विकत घेऊन योग्य किंमत देतील तर तो पैसा कलकत्ता येथें हिंदु लोकांकरितां एक सदावर्त घालण्याकडे खर्च करावयाचा आपला इरादा आहे म्हणून त्यांनीं सांगितलें.

## जयपूरच्या महाराजांकडून दाखविण्यांत आलें तें.

१ लहान हिऱ्यांचा हार. २ मोत्यांची कंठी. ३ सोन्याचा गोफ; याच्याखालीं हिऱ्याची पानडी असून तिच्या दोन बाजूंस दोन पाचा जडविल्या आहेत. ४ निरनिराळ्या नमुन्यांचे ब्रूचेस् ( Brooches) हा दागिना मडमा वक्षःस्थलीं घालितात. ५ लहान हिरेजडित तबकडी. ६ अत्तरदाण्या, गुलाबदाण्या, तबकें, डबे, कार्डकेसेस् इत्यादि अलंकार व शोभिवंत पात्रें दाखविलीं होतीं. अत्तरदाणीस पांच पेले असून मधला मयूरावर आहे. हे पेले सोनेरी मुलाम्याच्या कळसांत बसविले आहेत. कमळाच्या खालीं करवेदार हिरवे लोलक आहेत. हें जवाहीर विशेष मौल्यवान् नव्हतें, पण यांतील कांहींची करणावळ तारीफ करण्यासारखी होती.

## गिरधरलाल गोपाळ या नांवाच्या व्यापाऱ्यांनीं दाखविलें तें.

१. अंबर नांवाच्या मण्यांचा कंठा, यांत मोठे मणी सव्वीस आहेत. याचा वर्ण कांहीं पिंवळा आहे. यास खालीं लाल रत्नाचें पदक आहे.

२. याकूत रत्नाची पोंची, यांतील मणी सुपारीएवढे आहेत.

३. पुष्पराग रत्नाचे दोन तोडे.

४. फेरोज नांवाच्या रत्नाची अंगठी, याचें क्षेत्र एक पैशाएवढें आहे.

५. दोन ब्रूच, एकांत कटायला नांवाचें रत्न बसविलें आहे व दुसऱ्यांत सुपारीएवढें एक रत्न बसविलें आहे. त्याचा रंग काळसर तांबडा आहे.

६. हुक्क्याचा मुनाल; याजवर अनेक रत्नें जडलीं आहेत.

७. रत्नजडित सिंह, व्याघ्र, हत्ती, घोडा, हरिण. यांची उंची चार साडेचार अंगुलें होती, व या सर्वांवर मिन्याचें सुरेख काम केलें आहे. याच नमुन्याचें एक बदक व दोन लहान करंडे दाखविले आहेत.

## बल भुदरदास यांनीं सामान दाखविलें तें.

१. कोंचाच्या आकृतीचें सिंहासन. हें रुप्याचें केलें असून त्याजवर सोन्याचा पत्रा बसविला होता किंवा मुलामा केला होता. याच्या पुढच्या दोन बाजूंच्या खुरांवर दोन सिंह बसविले आहेत. मागील बाजूस तीन कळसांची प्रभावळ असून तिच्या दोहों बाजूंस दोन सुरेख मयूर खोदले आहेत. सर्व सिंहासनावर कुसर काम केलें असून तें उत्तम मखमलीनें मढविलें आहे. याची किंमत रुपये पांच हजार.

२. रुप्याची नालकी; तिजवर सोन्याचे पत्रे बसविले आहेत. ती आंतून तांबड्या व बाहेरून हिरव्या मखमलीनें मढविली आहे. वरच्या बाजूस सलम्याचें व कलाबतूच्या कशिद्याचें काम उत्तम केलें आहे; व कमानीच्या पुढच्या बाजूस कलाबतूचे गोंडे लाविले आहेत. आंतल्या दोहों बाजूंस हात टेंकण्याच्या जागीं दोन सिंह आहेत. यांच्या पुढच्या बाजूस दोन परी बसविल्या आहेत. किंमत रुपये पंधरा हजार.

३. तक्याचा अभरा, मखमलीचे कापडावर सलम्याचें व कलाबतूचें सुरेख काम केलें आहे. किंमत रुपये पांचशें.

४. भरगच्ची शालू किंमत रुपये नऊशें.

५. भरगच्ची उंचा किनखाब, गज पांच ; किंमत रुपये नऊशें.

६. यापेक्षां कमी किंमतीचे किनखाब, दुपेटे, मंदील, व दुसरे भरजरी कपडे दाखविले होते.

तंजावरच्या राजकन्येकडून कांहीं जवाहीर व भरगच्ची कपडे येथें दाखविण्यांत आले होते.

खालीं नमूद केलेलें जवाहीर अमक्याच मालकाकडून आल्याचें बरोबर समजलें नाहीं. यांतील कांहीं पदार्थ डाक्याचे नबाब साहेब यांजकडून आले असावे म्हणून लोक बोलत असत.

१. पाचा व मोतीं यांचे हार; यांतील मोठ्या हारांत पाचेचे करवेदार तीस मणी आहेत. ते टपोऱ्या भोंकराएवढे होतील. मधील मुख्य पाचेचें क्षेत्र दोन रुपयांएवढें; ती कांहीं वाटोळी आहे. ति-

च्याखालीं मध्यम जांभुळाएवढा पाचेचा एक लोलक आहे. यांतच आवळ्याएवढे व तशाच आकाराचे चार मणी आहेत. यांतील मोतीं दाणे पाचांस शोभण्यासारखे मोठे नाहींत.

२. माणिकें, पाचा, व मोतीं यांचे हार; यांतील दोन हार फार मोठे आहेत. मोठ्यांतील माणकें खरोखर मोठ्या बोराएवढीं असून कांहींशीं त्याच आकाराचीं आहेत. थोरल्या हारांत अशीं मोठीं माणकें सात आहेत. यांतच पाचांचे करवेदार सोळा मणी आहेत, ते मध्यम आवळ्याएवढे आहेत. याच्या खालच्या बाजूस नीलजडित पदक आहे; तो नीळ लहान पोफळाएवढा आहे. पदका-भोंवतीं चापटे हिरे बसविले आहेत. पदकाखालीं जांभळाएवढा माणकाचा एक लोलक आहे.

३. हिरे व पाचा यांचे हार; हिऱ्यांचे लोलक मोठ्या करवंदाए-वढे आहेत. पाचा पुणें शिक्याएवढ्या आहेत. मोठ्या हारांत आठ पाचा व अठ्ठेचाळीस लोलक आहेत.

४. नुसत्या पाचांचा एक बडा हार; यांत पंधरा पाचा फार मोठ्या आहेत. मधील पाच मोठ्या जांभळाएवढी पण चापटकी; बाजूचे मणी आवळ्याएवढे व तसेच करवेदार आहेत. याच्या बिर-ज्यास नीळ आहे तो लहान जांभळाएवढा होईल.

५. चार नाग एकत्र जोडल्यासारखा एक दागिना; त्यास को-णी शिरोभूषण, कोणी पोंची व कोणी अंगद असें म्हणत. यावर चौकोनी पाच आहे, ती सव्वा, दीड इंच लांब होईल. तिजवर कांहीं कुसर केली आहे. याच्या दोन बाजूंस दोन माणकें जडविलीं असून भोंवतालीं तरतरे बसविले आहेत. हा दागिना लहानशा तळहाताएवढा आहे.

६. एका पाचेची पोंची; लांबी दोन व रुंदी पावणे दोन इंच होईल, हिचें तेज फार उत्तम असून तींत कोणत्याही प्रकारचा दोष नाहीं. अशा मासल्याची पाच दुसरीकडे कोठें नाहीं असें साहेब लोक व आमचे लोक बोलतांना ऐकिलें.

७. माणकांचें शिरोभूषण. यांतील मुख्य माणिक जांभुळायेवढें

पण अधिक गोल; दुसरीं पुणे शिक्क्याएवढीं, लहान चार आहेत. तीं गाडी अर्ध रुपया एवढीं. यास तेरा लोलक आहेत. मधला किंवा तळाचा बराच मोठा आहे.

८. पेल्यासारखा वीतभर लांबीचा हिऱ्याचा दागिना, यास लहानशा तळहाताएवढें एक पदक आहे; याचें नांव माहीत नाहीं.

९. टोपी, ही लहान मोठ्या वाटाण्याएवढ्या मोत्यांनीं गुंफली आहे; हिच्या झालरीस पाच व माणिक यांचे लोलक आहेत.

१०. पाचांचा शिरपेंच यांत तीन पदकें आहेत, मधल्या पदकांतील पाच एक इंच लांब व तितकीच रुंद. बाजूच्या दोहीं पदकांतील पाचा गाडी अधेली एवढ्या. तीनही पदकांभोंवतीं लहान पाचा बसविल्या आहेत.

११. एक चिलखत, याची गळपट्टी व छातीपट्टी यांजवर हिरे, माणकें व मोतीं, जडविलीं असून पुढची गुंडी पाचेच्या लोलकाची आहे.

१२. मोत्यांचें लठ्ठ पेंडें, यास तळहाताएवढें हिरेजडित एक पदक आहे.

१३. रत्नजडित हुके, त्याचे नेचे, गुलाबदाण्या, अत्तरदाण्या, तबकें, चौफुले, ताटल्या, डबे इत्यादि.

आतां येथें दाखविलेल्या जवाहिरापैकीं मुख्य दागिन्यांचा गोषवारा खालीं देतों. मोठे हार सोळा होते पैकीं:—

१. पाचांचे लोलक किंवा पाचा व मोतीं याचे सहा.

२. पाचा व हिरे यांचे चार.

३. हिरा, माणीक व मोतीं यांचे चार.

४. नुसत्या पाचांचा एक.

५. हिऱ्यांच्या लोलकांचा एक.

६. टोप्या चार; हिऱ्यांची एक, पाचांची एक, माणकांची एक व तिहीं रत्नांनीं जडित एक.

७. एका पाचेच्या पोंच्या किंवा चौक्या तीन.

८. तुरे चार, हिऱ्याचे दोन; माणकांचा एक व पाचेचा एक.

९. शिरपेज चार, पैकीं मोत्यांचे दोन, हिऱ्यांचा एक व माणकांचा एक

१०. मोत्यांचीं पेंडीं दोन, पैकीं एक फार मोठें होतें, पण त्यांतील मोतीं लहान होतीं.

११. पिंपळवाणें मोठीं दोन हिरेजडित.

१२. हिऱ्यांच्या पेट्या जोड चार, यांतील दोन मोठे होते.

१३. तन्माणि दोन, यांतील एक मोठा असून त्यांत हिरा, पाच व मोतीं होतीं.

याप्रमाणें हिरे, मोतीं, पाच, माणीक इत्यादि रत्नांचे व सोन्या-रुप्याचे सर्व प्रकारचे अलंकार, शोभिवंत पात्रें व दुसरे पदार्थ दाखविले होते.

येथें साहेब लोकांच्या कंपन्यांनींही जवाहीर व दुसरें शोभिवंत सामान दाखविलें होतें. त्याजविषयीं थोडेंसें टिपण देऊन हें प्रकरण पुरें करतों.

मार्क आणि को.—हिनें बारीक पैलूदार हिऱ्यांच्या लहान मोठ्या अंगठ्या; मोठ्या अंगठीची किंमत सहा हजार रुपये. स्टार( एक प्रकारचा दागिना ); सोन्यारुप्याचे तोडे, कांकणें, हार, कंठे, नानाप्रकारचे लाकेट व ब्रूच, हे दागिने साहेब लोकांच्या स्त्रिया घालितात; त्यांत चिमणी, राघू, फुलपांखरें, मासे किंवा दुसरे लहान पण शोभिवंत कृत्रिम प्राणी बसविले असतात. यांत लहान घड्याळेंही असतात. हे दागिने आपल्या लोकांनीं एक वेळ अवश्य पहावे. कारण त्यांची करणावळ मोठी खुबीदार असून ते मजेदार दिसतात. मुलामा दिलेले तीन पिंजरे; एकांत लहानसा वृक्ष कुंज असून त्यांत तीन पक्षी बसले आहेत; किल्ली दिली म्हणजे एक पंख झाडून मान हालवितो; इतक्यांत दुसरा मधुर शब्द करूं लागतो, यांतलि एक थांबतो तों तिसरा चिवचिव शब्द करून उडूं लागतो. थोरल्या पिंजऱ्याची किंमत ९०० रुपये; यांतील एकावर घड्याळ बसविलें आहे. या कंपनीकडे दहा रुपयांपासून दहा हजार रुपये किमतीचीं घड्याळें विकत मिळतात. एक घड्याळ मो-

ठी तारीफ करण्यासारखें दाखविलें होतें. त्यावरून वार, तारिख महिना, चंद्राच्या कला, सूर्यास्त व सूर्योदय, हीं समजत होतीं. दर पाव तासास वाजा होतो, आणि तास वाजतात. याची किंमत बत्ती-सशें रुपये लिहिली होती. अतिसूक्ष्म म्हणजे एक सेकंदाचा सोळावा हिस्सा दाखविणारें एक घड्याळ येथें दाखविलें होतें.

**जे. एम्. लफ्फ एस्कायर, हजारी बाग, या गृहस्थांनीं दाखविलें तें.**

चार बोटें लांब, व तीन रुंद व तेवढाच जाड एक प्रवालाचा गोटा घेऊन त्यांत एकमेकांकडे तोंड करून गच्च मिठी मारून बसले-लीं दोन मुलें खोदलीं आहेत. यांची करणावळ तारिफ करण्यासा-रखी आहे. पक्के तीन तोळे वजनाचा एक नीळ. हा लहानशा लिंबाएवढा आहे. दिल्ली दरबारांतील मोहोर किंवा शिक्का; याच्या खालच्या चौकीच्या भोंवतालीं लहान नवरत्नें बसविलीं आहेत. त्यावर बरेंच मोठें एक मोतीं असून त्याजवर सुवर्णाची एक चिमुकली बाहुली आहे. तिचें पोट व छाती यांत एकेक मोतीं बसविलें आहे. तिजवर हिजरी शकाचें अकराशें पं-चाहत्तर वर्ष कोरिलें आहे. (Onyx) ऑनिक्स् नांवाच्या रत्ना-च्या मण्यांचा तीन पदरी कंठा; काश्मिरी जुन्या शाली इत्यादि पदार्थ दाखविले होते. श्री शंकराचें प्रसिद्ध लिंग याच साहेबांनीं दाखविलें होतें. त्याचें वर्णन या प्रकरणाचे अखेरीस देऊं.

**हॅमिल्टन आणि को. या कंपनीनें दाखविलें तें.**

पाचांच्या लोलकांची कंठी; यांतील थोरले लोलक मोठ्या निं-बोणीएवढे आहेत. पाचा व हिरे यांच्या लोलकांचे तीन तुरे; यांतील पाचांचे लोलक सुपारीएवढे असून, हिऱ्यांचे लहान बोरा-एवढे आहेत. मोकळे हिरे पांच; यांतील दोन लहानशा लिंबाएवढे व सुपारीएवढे तीन. दोन पोंच्या; निरनिराळ्या रत्नांच्या अंगठ्या व दुसरे इंग्रजी दागिने दाखविले होते.

याचप्रमाणें मद्रास येथील 'पी. आर. आणि कों. व कलकत्ता ये-थील ' डंकनब्रास ' या कंपन्यांनीं कांहीं जवाहीर व दुसरे मजेदार सामान दाखविलें होतें. तसेंच ' आस्लर ' व ' लॉजर्स ' यांनीं कांहीं शोभिवंत बिलोरी पदार्थ दाखविले होते.

## श्रीशंकराचें प्रसिद्ध लिंग.

हें लिंग फार प्राचीन आहे. त्याजविषयींची कथा मोठी चमत्कारिक आहे. लिंगाची रचना प्रथम सांगून नंतर त्याच्या कथेंतील मुख्य तात्पर्य वाचकांच्या मनोरंजनार्थ पुढें देतों. सुमारें अडीच हात उंच व दोन हात परिघाचा संगमरवरी दगडाचा एक खांब उभारून त्याजवर सोन्याचें लहान सिंहासन ठेविलें आहे. याच्या भोंवतीं नवरत्नें जडविलीं आहेत; तीं पावल्याएवढीं मोठीं आहेत. सिंहासनावर पुष्कराग रत्नाची पिंडी आहे, तिजवर क्याट्स् आय (Cat's eye) रत्नाचें लिंग आहे. तें मध्यम जांभुळाएवढें आहे, व यावर ग्लासाचें झांकण घातलें आहे.

याची कथा अशी आहे कीं, आपल्या देशांत यवन लोकांचें राज्य होण्यापूर्वी हें लिंग दिल्लीमध्यें एका हिंदुदेवालयांत होतें. तें सत्राशें वर्षांचें जुनें असून आपल्या देशांतील लोकांत प्रसिद्ध आहे. याचें दर्शन घेतलें असतां संतति प्राप्त होते, असा आपल्या देशांतील लोकांचा भरंवसा असल्यामुळें त्याच्या दर्शनास देशाच्या सर्व भागांतून हजारों लोक जात असत. त्यांत स्त्रियांचा भरणा मोठा असे. हा दर्शनास जाण्याचा क्रम एक हजार वर्षें चालू होता. पुढें इ०स० ११९३ वे वर्षी कुतुबुद्दीन यानें आपल्या देशावर स्वारी करून दिल्ली शहर हिंदु राजापापासून हिसकून घेतलें. त्या वेळीं त्यानें " कुतुबमसजिद " नांवाची प्रसिद्ध मशीद बांधण्याकरितां सत्तावीस हिंदु देवालयांचा नाश केला. तेव्हां तें लिंग चमत्कारिक रत्नांचा एक मासला म्हणून सुरक्षित राखून ठेवण्याकरितां मोंगल लोकांच्या जामदारखान्यांत ठेविलें; तेथें तें इ. स. १८५७ पर्यंत म्हणजे सहाशें चौसष्ट वर्षें होतें. याजविषयीं हिंदु लोकांची मोठी पूज्य बुद्धि असून त्यांचा असा भाव होता कीं, तें ज्याच्या जवळ असेल त्यास नशीब नेहमीं अनुकूल राहील. १८०७चें मोठें बंड झालें त्या वेळीं दिल्लीचा शेवटचा बादशाह जो बहादूरशहा यास इंग्रजांनीं तेथून रंगून येथें हांकून दिलें व पुढें तो तेथेंच मरण पावला. त्याची राणी हें लिंग व दुसरें जवाहीर घेऊन गेली आणि तिजपासून हें सांप्रत मालकाच्या हातीं आलें, असें लिहिलें

आहे. पण तें कोणच्या रीतीनें यांच्या हातीं आलें याचा खुलासा दिलेला नाहीं. याचें इंगित काय असेल तें असो.

## कांचकाम तयार करण्याचें कोर्ट.

हें कोर्ट इंडियन कोर्टाच्या दक्षिणेस होतें. तें आकारमानानें फार मोठें नव्हतें, पण त्यांत पाहण्यासारिखें बरेंच चमत्कारिक होतें. त्याचे मालक आस्ट्रेलियांतील लोक होते. त्यांनीं खुली जागा भाड्यानें घेऊन हें कोर्ट तयार केलें होतें.

येथें तीन साहेब लोक व एक कुमारी अशीं चार मनुष्यें काम करीत होतीं. ही मंडळी मोठी सुशील होती. यांतील मि. वुड्राफ हे कांचेच्या दोन बोटें व्यासाच्या वाटोळ्या भरींव कांड्या घेऊन त्यांचे मजेदार पदार्थ करून दाखवीत व विकत देत. लाखेचें किंवा मेणाचें काम जसें त्वरित व सफाईनें करितां येईल त्याप्रमाणें तो उष्णतेच्या योगानें कांच फुगवून ती टपालाच्या कागदापेक्षां अधिक पातळ करी व त्याचे मजेदार पदार्थ करून देत असे. तसेंच कांचेचे रेशिमाप्रमाणें बारीक व लवचीक तंतु काढून त्यांचेही शोभिवंत पदार्थ करून देत. या तंतूंत एक विशेष चमत्कार असा असतो कीं, ते इतके बारीक असून आंतून पोकळ असतात.

मि० वुड्राफच्या डावे बाजूस मिस अंडरसन ही काम करीत असे. वर सांगितल्याप्रमाणें निरनिराळ्या रंगांच्या कांचेच्या लहान कांड्या घेऊन त्यांचे लहान पेले, जाळीदार पुष्पपात्रें, सुरेख पक्षी व दुसरे शोभिवंत पदार्थ तयार करून देत असे. या पदार्थांवर सिन्याप्रमाणें नकशीचें काम करी. या दोघांच्या मध्यें टेबलावर बंब व वाफेचें यंत्र यांचे कांचेचे केलेले नमुने चालू ठेविले होते. हीं यंत्रें सर्व कांचेचीं केलेलीं असल्यामुळें त्यांची सर्व रचना एकदम चांगली लक्षांत येत असे.

या बाईच्या समोरच्या बाजूस मिस्तर इलियट हे पाणी पिण्याचे ग्लास किंवा दुसरीं पात्रें चरकावर धरून त्यांजवर आपण सांगितलेलें नांव व 'कलकत्ता प्रदर्शन' हे शब्द दोन चार मिनिटांत

कोरून देत. ग्लास आपण खरेदी करून नेला असतां खोदणावळीबद्दल तेवढी दर पात्रास आठ आणे फी घेत. सकाळच्या अकरा वाजल्यापासून तों अस्तमानपर्यंत ही मंडळी एकसारखें काम करून पैसा कमावीत. अस्तमानच्या पुढें हें कोर्ट-बंद असे.

कोर्टाच्या डावे बाजूस मध्यभागीं एक कृत्रिम खडक तयार केला असून त्याच्या समोर मेणाचे सोळा पुतळे उभे केले होते. त्यांत नऊ पुरुषांचे व सात बायकांचे होते. त्या सर्वांची नजर खडकाकडे लागली असून मोठ्या आश्चर्यानें पहात आहेत, असें दाखविलें होतें. मोजेस खडकाजवळ उभा असून त्यानें हातांतील छडी त्यावर मारण्यास उभारली आहे. एक पुरुष अर्धा बसल्यासारखा उभा आहे. एका बाईने आपलें बालक पाठीवर घेऊन त्यास हात मागें परतवून धरिलें आहे. या कोर्टांत दररोज हजारों प्रेक्षक जात; ते आंत गेले म्हणजे या सर्व लोकांनीं तटस्थ उभे राहून आश्चर्ययुक्त मुद्रेनें कोणीकडे नजर लावली आहे असें वाटून थोडें जवळ जाऊन नीट पाहीत तेव्हां हे सर्व पुतळे आहेत व आपणास झालेला सर्व भास खोटा आहे असें त्याच्या लक्षांत येत असे. याप्रमाणें हुबेहुब ते पुतळे होते. त्यांत एक जीव मात्र कमी होता.

या पुतळ्यांच्या समोरच्या बाजूस स्त्रियांचे दोन पुतळे उताणे निजविले होते. वर सांगितलेले मि. वुड्राफ किंवा मि. जे. डुग्लास हे या पुतळ्यांचे सर्व अवयव निराळे काढून दाखवीत; आणि कोणत्या अवयवाचा कोणत्या अवयवाशीं कसा संबंध आहे, मस्तकांतील मज्जेशीं ज्ञानतंतूचा कसा संबंध आहे, रक्तवाहिन्या कशा पसरल्या आहेत; रक्ताभिसरणक्रिया कशी चालते पक्वाशय, गर्भाशय, इत्यादि कोठें असतात, फुपूस, काळीज, प्लीहा व दुसरे मुख्य अवयव कोठें व कसे असतात या गोष्टी समजून दाखवीत.

तसेंच मातेच्या उदरांत मनुष्याचा जन्म झाल्यानंतर दोन आठवड्यांनीं त्याचा पिंड केवढा व कोणत्या आकृतीचा बनतो; पुढें तीन आठवडे, एक महिना, दोन महिने याप्रमाणें नऊ महिने पूर्ण

होऊन मनुष्य प्राणी जन्मास येईपर्यंत तो पिंड कसा वाढत जातो, म्हणजे कोणते अवयव कोणत्या कालीं उदयास येत जातात हें सर्व दाखविण्यासाठीं मेणाचे अनेक पिंड करून ठेविले होते. याचप्रमाणें मधमाशी, सुरवंट, जळू व ( बवा कंस्ट्रिकटर ) एक जातीचा प्रचंड सर्प या प्राण्यांच्या शरीरांच्या आंतील रचना कशी असते हेंही येथें दाखवींत.

## इकॉनामिक ( संपत्ति कोर्ट ).

हें कोर्ट इंडियन कोर्टाच्या पश्चिम भागास होतें. त्यांतील संग्रह एवढा मोठा, महत्वाचा व इतका बहुविध होता कीं, त्याचें बरेंसें वर्णन देणें मोठें अवघड आहे; करितां आम्ही त्याचें केवळ दिग्दर्शन देण्याचा यत्न करितों. आपल्या देशांत उत्पन्न होणाऱ्या सृष्टिजन्य पदार्थांचें ज्ञान प्राप्त करून घेण्यास हें कोर्ट एक मोठी शाला होती. कारण देशांतील उद्भिज, खनिज, अंडज व कांहीं कृत्रिम पदार्थ यांनीं तें भरून टाकिलें होतें. या संबंधानें सर्व कोर्टांत हें विशेष महत्वाचें होतें, आणि याच कारणास्तव यास संपात्ति कोर्ट हें नांव योजिलें आहे.

सर्व प्रकारचीं धान्यें व उपधान्यें. पांचशें जातींचे तांदूळ, तीनशें जातींच्या डाळी, जोंधळे, बाजरी, गहूं, सातू, मका, यांच्या शेंकडों जाती; तसेंच तीळ, मोहरी, खसखस इत्यादि उपधान्यांचे शेंकडों मासले; ज्या द्रव्यापासून तेल काढितां येतें त्याचे तीनशें मासले; व त्यांतील कांहींपासून काढलेलीं तेलें ; ज्या पदार्थांपासून निरनिराळ्या जातींचे रंग तयार करितां येतात, त्यांचे दोनशें ऐंशी मासले; त्यांपासून तयार केलेले रंग; मसाल्याचे पदार्थांचे शेंकडों मासले; ज्या द्रव्यांपासून सुगंधी पदार्थ तयार करितां येतात त्यांचे शेंकडों मासले; आपल्या देशांत उत्पन्न होणाऱ्या औषधी वनस्पति व दुसरे पदार्थ यांचे बहुतेक सर्व मासले; निरनिराळ्या जातींचा चहा व बुंद; अनेक जातींच्या साखरेचे नमुने; तसेंच निळीचे मासले.

ज्या द्रव्यापासून तंतु काढितां येतात त्याचे तीनशें; जहा-

जास लागणाऱ्या मोठ्या लंग दोरापासून तों वाखंडीच्या दोरीसारखे अगदीं बारीक दोराचे अनेक नमुने. मोठ्या लंग दोरांचा परिघ हात सव्वाहात येईल. आपल्या देशांत तयार होणाऱ्या सर्व जातींच्या कागदांचे मासले; अनेक जातींचे कापूस; निरनिराळ्या प्रदेशांत उत्पन्न होणाऱ्या तमाखूचे मासले, व त्यांजपासून तयार केलेल्या ओढण्याच्या विड्या; क्षार पाण्यापासून तयार केलेल्या व खाणींतून काढलेल्या मिठाचे मासले; अनेक प्रकारचे दुसरे क्षार, सोरा, मीठ व गंधक यांचे मासले, निरनिराळ्या खाणींतून सांपडणारे दगडी कोळसे; स्लेट पाटीच्या व दुसऱ्या दगडाचे अनेक नमुने; वीस पंचवीस प्रकारची लाख; राळ व डिंक याचे मासले.

निरनिराळ्या स्थलांतील अनेक जातींचे रेशमी किडे, त्यांचे केश व त्यांपासून उत्पन्न होणाऱ्या रेशिमाचे नमुने व कृमि ज्या पर्णांवर जगतात तीं दाखविलीं होतीं. हा किडा पूर्ण वाढला म्हणजे सुमारें चार इंच लांब असतो. त्याचीं अंडीं लहान चपटीं असून तीं एकमेकांस चिकटून असल्यामुळें त्यांचे केव्हां गोळे होतात. त्यांचा रंग पांढरा असतो. तीं नऊ दहा दिवसांत फुटतात. त्यांतील पतंग पंधरा वीस दिवस कोशावस्थेंत राहतो. परमेश्वरानें या लहान प्राण्यांत देखील स्त्री व पुरुष हे भेद ठेविले आहेत. नरापेक्षां मादीच्या भोंवतीं जो रेशिमाचा कोश बनतो तो मोठा असून त्यांतील रेशिम अधिक चांगलें असतें. मादी पहिल्या दोन तीन दिवसांत पन्नास पासून दोनशेंपर्यंत अंडीं घालतें. अंड्यांतून हा कृमि बाहेर पडल्यापासून पांच सहा आठवड्यांचे आंत आपला कोश बनवूं लागतो. रेशिमाच्या तंतूचा व्यास एक इंचाचा सातशेंवा अंश असतो. अति बारीक तंतूचा $\frac{१}{२२००}$ एक बेविसशेंवा अंश असतो.

आपल्या देशांत प्राप्त होणाऱ्या सर्व जातींच्या लोंकरींचे मासले; अनेक जातींच्या मधमाशांनीं तयार केलेल्या मधाच्या पोळ्या व त्यांपासून काढिलेले मध, व मेण्या माशांची कृत्रिम पोळी तयार करण्याचे सांचेही दाखविले होते. आपल्या देशांत मिळणाऱ्या इ-

मारतीच्या व दुसऱ्या सर्व जातींच्या लांकडांचे तुकडे रचून त्यांची एक कमान उभारली होती. तींत पांच हजार जातींचें लांकूड होतें. तसेंच अनेक जातींच्या वेळवांचे मासले दाखविले होते. हा पुरवठा फॉरेस्ट खात्यांतून झाला होता. या देशांत शेतकीस लागणारीं सर्व प्रकारचीं आउतें व कारागिर लोकांचीं हत्यारें दाखविलीं होतीं. अंडामान, निकोबार इत्यादि बेटांतील रानटी लोकांचे कांहीं पुतळे, त्यांचीं शस्त्रें, आउतें व अलंकार दाखविले होते. हे पुतळे किसनगड येथें राहणारे नाथपाल या नांवाच्या गृहस्थांनीं तयार केले असल्याचें समजलें. समुद्रांतील संपत्तीचाही येथें बराच मोठा भरणा दाखाविला होता. शेंकडों जातींचे लहान मोठे शंख, शिंपले, प्रवालाच्या सारख्या वेली, शेंकडों जातींचे मासे, खेकडे व कांसव दाखविले होते.

## यंत्रांचें कोर्ट.

हें कोर्ट तलावाच्या पश्चिम भागीं तयार केलें होतें. त्यानें सरासरी एक चौरस एकर जमीन व्यापली होती. दूरदूरच्या देशांतून शेंकडों कंपन्यांनीं आपल्या कारखान्यांत तयार केलेलीं यंत्रें व दुसरा माल येथें दाखविण्यास आणला होता. यांतील बहुतेक कंपन्या ग्रेट ब्रिटन येथील होत्या. त्यांची संख्या निदान दोनशेंवर होईल. एकेक यंत्राचे अनेक मासले वेगवेगळाल्या प्रसिद्ध कारखान्यांत तयार झालेले दाखविले होते. येथें दाखविलेल्या सर्व यंत्रांची व मालाची किंमत लक्षावधि रुपये होती. हें कोर्ट ब्रिटिश कोर्टाचा एक भाग होता म्हणण्यास हरकत नाहीं.

१ ड्रेजर ( Dredger ) नांवाचें यंत्र, याच्या योगानें जमिनींतील माती पोंखरली जाऊन ती वर काढून पाहिजे तिकडे कांहीं अंतरावर टाकितां येते. हें वाफेच्या शक्तीनें चालू ठेविलें होतें. हें ( Priestman Bros. ) या कंपनीनें दाखविलें होतें.

२. स्क्रुइंग मशीन ( Screwing Machine ) या यंत्रानें लोखंडी सळईस करवे पाडून वळ्या घालितात आणि स्क्रू तयार करितात.

३. (बोअरिंग मशीन.) भोंकें पाडण्याचें यंत्र. यानें लोखंडाच्या पाहिजे तेवढ्या जाड कांबीस किंवा पत्र्यास भोंकें पाडतां येतात.

४. वाफेचे नांगर. हे वाफेच्या यंत्राच्या साहाय्यानें चालवितात. आठ घोड्यांच्या शक्तीच्या यंत्रानें आठ दहा तासांत तीस चाळीस एकर जमीन उत्तम प्रकारें नांगरली जाते. प्रदर्शनगृहाच्या शेजारच्या मैदानावर हा नांगर चालवून दाखवीत. याचे प्रदर्शक (J. Fawler & Co.).

५. (Hot Air Engine.) उष्ण हवेनें चालणारें यंत्र. यास वाफ किंवा बॉइलर याची गरज लागत नाहीं. तें उष्ण हवेच्या योगानें चालतें. भट्टींत कोळसा जाळून तींत पंपानें हवा नेतात. ती हवा उष्णतेच्या योगानें फुगून तिच्या अंगीं वेग उत्पन्न होतो. हा वेग वाफेच्या यंत्राप्रमाणें उपयोगी पडतो. यास कोळशांचा खर्च फार कमी लागतो, व हें यंत्र फार हलकें असतें. याचे प्रदर्शक (J. Tylar and Sons).

६. (Otto Gas Engine.) आपोआप चालणारें धुराचें यंत्र. वाफेच्या यंत्रोपेक्षां यांत विशेष फायदे आहेत; कारण वाफ तयार होण्याची या यंत्रास वाट पहात रहावें लागत नाहीं. तें एकदम चालू करितां येतें, व चालविण्यास यांत्रिक ज्ञान मोठें लागत नाहीं. यापासून धूर, धुरळा, रक्षा यांचा त्रास उत्पन्न होत नाहीं; उष्णता फार होत नाहीं. यांत बॉइलर फुटण्याचा धोका नाहीं; तसेंच धुराडें (चिमनी) बांधण्याची गरज नाहीं. यास लागणारें पाणी खराब होत नाहीं, व खर्च कमी लागतो. हें यंत्र चाळीस घोड्यांच्या शक्तीचें करतां येतें. याचे प्रदर्शक (Crosslay Brothers). यांच्या कारखान्यांत या मासल्याचीं तयार झालेलीं सात हजार यंत्रें निरनिराळ्या देशांत चालू आहेत.

७. (Refrigerating Machine.) थंडी उत्पन्न करण्याचें यंत्र. या यंत्राचा उपयोग ऐकून आम्हांस मोठी मौज वाटली; याकरितां त्याची विशेष माहिती देतों. समजा कीं आपल्या देशांतून हजारों मेंढ्या युरोपांत किंवा अमेरिकेंत मांसाकरितां पाठविण्याच्या आहेत.

इतक्या मेंढ्या आगबोटींतून नेण्यास जागा अतिशय लागणार म्हणजे जाग्याचें जबर भाडें पडणार; वाटेंत त्यांच्या चारिंद्याचा खर्च मोठा होणार. त्यांच्या मलमूत्राच्या दुर्गंधीपासून जहाजावर एखादा नवीन रोग उद्भवून तेथील लोकांच्या जिवांस अपाय होणार; व हाच रोग त्या मेंढ्यांत उत्पन्न झाला असतां त्या एकामागून एक पटापट मरून मालकाचें सर्व प्रकारें नुकसान होणार. या सर्व गोष्टी किंवा अनर्थ टाळण्याकरितां या यंत्रांचा उपयोग करितात.

पेटीसारखी एक लोखंडी मोठी खोली असते तींतील हवा यंत्रानें इतकी थंड करितात कीं, मेंढरूं किंवा दुसरा जीव आंत टाकिला असतां तो अगदीं गोठून जातो. याप्रमाणें तयार केलेल्या खोलींत मेंढ्या गच्च भरून टाकितात. यामुळें जहाजावर जागा फार थोडी पुरते. म्हणजे जागा व भाडें थोडें लागतें. त्यांच्या चारिंद्याचा खर्च तर अजीबात पदरीं पडतो, आणि मलमूत्राच्या दुर्गंधीपासून रोग उत्पन्न होण्याची तर मुळींच भीति रहात नाहीं! यंत्र मात्र एकसारखें चालू ठेवावें लागतें.

आतां इतकी थंडी कशी उत्पन्न करितात हें थोडक्यांत सांगतों. हवा चोहोंकडून दाबली असतां तींत उष्णता उत्पन्न होते, आणि तीच दाबलेली हवा मोकळी सोडली असतां अतिथंड होण्याचा तिचा धर्म आहे. ज्या मानानें हवा दाबली जाऊन पुनः मोकळी सोडली जाते त्या मानानें ती थंड होते. या यंत्रानें एका तासांत नऊ हजार घनफूट हवा अतिथंड होते. हें यंत्र चालू ठेविलें होतें. याचे प्रदर्शक ( Burn & Co. ).

८. ( Wheat-stripper ). गहूं कापण्याचें यंत्र. हें यंत्र आस्ट्रेलियांतील एका गृहस्थानें शोधून काढलें आहे. याच्या साहाय्यानें गव्हाच्या लोंब्या कापल्या जाऊन त्या आपोआप गाडींत येऊन पडतात. हें चालविण्यास वाफेच्या यंत्राची अवश्यकता नाहीं. मनुष्यांच्या शक्तीनें तें चालू शकतें.

९. ( Grain-separator. ) धान्य साफ करण्याचें यंत्र. याच्या योगानें धान्यांतील खडा, माती व केर हीं निराळीं होऊन धान्य साफ होतें.

१०. (Tea Rolling Machine.) चहाच्या पानांस गुंडाळ्या घालण्याचें यंत्र. थोरल्या यंत्रानें दररोज शंभर मण व लहानानें तीस मण पानें गुंडाळलीं जातात. हें चालविण्यास वाफेच्या यंत्राची मदत लागते. याचे प्रदर्शक (Sons Marshall & Co.); यांच्या कारखान्यांत चहा साफ करण्याचीं, तो वाळविण्याचीं व दुसरीं यंत्रें तयार करितात.

११. (Fulsometers.) पाणी वर चढविण्याचीं यंत्रें. हीं फार साधीं असून निरनिराळ्या शक्तींचीं असतात. नंबर नऊच्यानें दर तासांत तीन हजार सहाशें ग्यालन पाणी वर चढवितां येतें, आणि तें पंचाहत्तर फूट उंच उडवितां येतें. थोडया शक्तीचें यंत्र हातानें चालवितां येतें. प्रदर्शक (Burn & Co.).

१२. (Ice Machines.) बर्फ तयार करण्याचीं यंत्रें; यांतील एक यंत्र चालू ठेवून बर्फ तयार करून दाखवीत आणि तें प्रेक्षकांस वांटून टाकीत. यांतील तीन घोडयांच्या शक्तीच्या यंत्रानें एक दिवसांत पक्के चौदा मण बर्फ तयार होतें, व त्यास दहा मण कोळसा लागतो. याचें प्रदर्शक (Loveth Walsh & Co.).

१३. कागद तयार करण्याच्या कारखान्यांत लागणारीं यंत्रें. यांचे प्रदर्शक (Taylor Brothers).

१४. सोडावाटर, लेमनेट, व वायुमिश्रित पाणी (acriated water) तयार करण्याचीं यंत्रें. प्रदर्शक (Tylor & Co).

१५. रवा व पिठी तयार करण्याचीं यंत्रें. यांतील लहान आहेत तीं मनुष्याच्या शक्तीनें चालतात.

१६. सडकेवर घालण्याची खडी फोडण्याचें यंत्र. यानें एक तासांत दहा बारा खंडी खडी फोडून तयार होते. प्रदर्शक (W. H. Baxter and Co.).

१७. खडक पोंखरण्याचें यंत्र.

१८. हाडांचा चुराडा करण्याचें यंत्र.

१९. तांदूळ सडण्याचें व भात भरडण्याचीं यंत्रें.

२०. साखर तयार करण्याचीं यंत्रें.

२१. उंसाचा रस गाळण्याचा चरक.

२२. जूटचें तेल काढण्याचें यंत्र.

२३. अग्नि विझविण्याचीं यंत्रें. या यंत्रांस पाण्याचा उपयोग न करितां अलीकडे क्यार्बान वायूच्या योगानें आगी विझवूं लागले आहेत.

२४. अग्नि प्रज्वलित करण्याचीं यंत्रें.

२५. उष्ण हवा उत्पन्न करण्याचें यंत्र.

२६. पंखे फिरविण्याचीं यंत्रें. अलीकडे हीं विद्युल्लतेच्या साहाय्यानें चालवितात.

२७. हवा स्वच्छ व थंड करण्याचें यंत्र.

२८. कलाबतू तयार करण्याचें यंत्र. याच्या मदतीनें सोनें व रुपें यांची तार कापसाच्या तंतूवर लपेटतां येते. हरि गोपाळसिंग या नांवाच्या गृहस्थानें हें नवीन तयार केलें.

२९. लिहिण्याचें यंत्र.

३०. कापूस दाबून त्याचे गठ्ठे बांधण्याचें यंत्र.

३१. तेल काढण्याचीं यंत्रें. यांतील मोठ्या यंत्रास वाफेच्या यंत्राची मदत लागते.

३२. कोळशांच्या खाणींतील कोळसे व पाणी वर काढण्याचीं यंत्रें.

३३. नीळ कापण्याचें यंत्र.

३४. (Excavating scoop) टाकें किंवा पाण्याचा खजिना खोदून काढण्याचें यंत्र.

३५. कातडीं कमावण्याचीं व तयार करण्याचीं यंत्रें.

३६. उदकप्रवाहाच्या जोरानें चालणारीं यंत्रें. यांचे प्रदर्शक (J. Warner & Sons).

३७. वाऱ्याच्या शक्तीनें चालणारीं यंत्रें. प्रदर्शक सदर.

३८. (Fuel Economiser.) सरपण कमी लागणारें यंत्रें.

३९. आर्टिशियन (कारंजाची) विहीर काढावयास लागणारीं यंत्रें. या यंत्रानें खडक पोंखरला जाऊन दोनतीनशें फूट खोलीचें पाणी कारंज्याप्रमाणें वर उडतें.

४०. आबिसीनियन् ट्यूबची विहीर काढण्याचें यंत्र; यानें वाळवंटांत विहीर काढून पाणी वर काढतां येतें.

४१. कार्ड छापण्याचीं यंत्रें.

४२. लिहिलेल्या कागदांच्या सत्वर प्रती करण्याचीं यंत्रें.

४३. छापखान्यांत लागणारीं सर्व प्रकारचीं यंत्रें.

४४. सोनें, रुपें इत्यादि धातूंच्या खाणींत लागणारीं यंत्रें.

४५.(J. Evaus and Sons.) यांच्या कारखान्यांत निरनिराळ्या कामांस लागणारे बंब तयार करितात. यांनीं चौदा प्रकारचे बंब दाखविले होते.

४६. ( W. &J. Player. ) यांच्या कारखान्यांत चरक व हातोडे तयार होतात. यांनीं नऊ प्रकारच्या हातोड्यांचे नमुने दाखविले होते.

याप्रमाणें कांहीं यंत्रांविषयीं माहिती सांगितली. आतां अखेर असें सांगतों कीं, बहुतेक कारखान्यांत किंवा कारागिरांस लागणाऱ्या यंत्रांचे नमुने येथें दाखविले होते. वर सांगितल्यापैकीं कांहीं यंत्रें एका वाफेच्या यंत्राच्या मदतीनें चालू ठेविलीं होतीं.

## वाफेचीं यंत्रें.

हीं यंत्रें बऱ्याच कंपन्यांनीं दाखविलीं होतीं त्यांतील कांहीं मुख्यांचीं नांवें खालीं देतों.

१. C. Commel & Co.
२. J. Fawler & Co.
३. E. Humphries & Co.
४. Davey Paxman & Co.
५. W. B. Dick & Co.
६. Marshall, Sons & Co.
७. Decauvill & Co.

या कंपन्यांनीं वाफेचीं व लोहमार्गाकडे लागणारीं दुसरीं यंत्रें व सामान दाखविलें होतें. दुसरी, पांचवी व सातवी या तीन कं-

पन्यांनीं प्रत्येकीं एक मैल प्रमाणें तीन मैल ट्रामवे इंडियन कोर्टभों-वतीं तयार करून दाखविला होता. यांत बसून लोक मजेनें इकडून तिकडे जात असत. नंतर दोनच्या कंपनीनें अमृतसर येथील म्युनिसिपालिटीस ट्रामवे करण्यास लागणारीं यंत्रें व सामान पुरविलें आहे. नंबर ७ ही फ्रेंच कंपनी असून तिच्या कारखान्याचे वर्णन अलाहिदा दिलेंच आहे.

वाफेच्या यंत्राचे, त्यांची रचना, शक्ति व उपयोग या तीन गोष्टींच्या संबंधानें अनेक प्रकार आहेत. सर्वांत लहान यंत्र अर्ध घोड्याच्या शक्तीचें असतें. लढाऊ आगबोटींवरील यंत्रें फारच मोठीं म्हणजे आठ हजार घोड्यांच्या शक्तीचीं असतात. जर्मनी, ग्रेट ब्रिटन व रशिया या राष्ट्रांच्या आरमारांवरील आगबोटींस आठ हजार दोनशें घोड्यांच्या शक्तीचीं यंत्रें आहेत. अगदीं लहान आगबोट असली तरी तिजवरील यंत्र दोनतीनशें घोड्यांच्या शक्तीचें असतें. आपल्या देशांतून परदेशीं ज्या आगबोटी जातात व येतात त्यांवरील यंत्रें तीनशेंपासून एक हजार घोड्यांच्या शक्तीचीं असतात. कार्थेज व रोम या नांवांच्या आगबोटींवरील यंत्रें एक हजार घोड्यांच्या शक्तीचीं आहेत. लहान मोठ्या कारखान्यांतील यंत्रें कामाच्या मगदुरीप्रमाणें असतात.

आतां घोड्याची शक्ति म्हणजे काय हें थोडक्यांत सांगतों. घोडा दर मिनिटांत किती काम करितो याजविषयीं अनेक प्रयोग करून त्यांची सरासरी काढून असें ठरविलें आहे कीं, साधारण शक्तीचा घोडा दर मिनिटांत तेहतीस हजार प्रमाणें काम करितो. हें प्रमाण असें ठरविलें आहे कीं, एक पौंड वजन जमिनीवरून एक मिनिटांत एक फूट उंच उचलण्यास जेवढी शक्ति लागते त्यास एक काम म्हणतात, आणि असलीं ३३ हजार कामें एक घोडा करूं शकतो, म्हणजे तेहतीस हजार पौंड वजन जमिनीवरून एक मिनिटांत एक फूट उंच उचलण्यास जी शक्ति लागते ती एका सामान्य घोड्याची शक्ति समजावी. याप्रमाणें एका घोड्याच्या शक्तीचें यंत्र म्हणजे ज्याची दर मिनिटास तेहतीस हजार कामें करण्याची शक्ति आहे, तें होय.

## लोहमार्ग.

गेल्या वीस पंचवीस वर्षांपासून आपल्या देशांत आगगाडीचा बराच विस्तार होत चालला असल्यामुळें ती कशी असते हें बहुतकरून सर्व लोकांस तींत बसून किंवा पाहून किंवा ऐकून तरी ठाऊक झालें आहे. यांत दोन प्रकार आहेत. एक रुंद व दुसरी अरुंद मापाची. रुंद मापाच्या गाडीचे रेल ५॥ फूट अंतरावर व अरुंदाचे ३। अंतरावर घालितात. विलायतेकडील रुंद मापाचे रेल ७ फुटांच्या अंतरानें असतात. आपल्या देशांतील रुंद मापाचीस विलायतेकडे अरुंद मापाची म्हणतात. आपल्या देशांतील रुदं मापाच्या गाडीस दरतासांत पंचवीस तीस व अरुंद मापाचीस पंधरा वीस मैलांपेक्षां अधिक जाण्यासारखा वेग देत नाहींत. अधिक वेग देण्यास कोळशांचा खर्च फार येतो. मिटर गेजाची रुंदी ३$\frac{१}{३}$ फूट; लाइट रेल्वेची २$\frac{१}{२}$ व पोर्टेबलची दोन फूट असते; यासच ट्रॅमवे म्हणतात. कलकत्ता येथील एका ट्रामवेस लहानसें एक वाफेचें यंत्र लावितात.

### वर सांगितल्याशिवाय लोहमार्गाचे आणखी कांहीं प्रकार आहेत ते.

१. टेंकडीवर चढण्याचा रेल्वे.
२. रेल न घालतां सपाट प्रदेशांतून जाणारा रेल्वे.
३. मिनियाचर रेल्वे.
४. Arial रेल्वे.
५. Rock and Pimion Railway. याच्या गाडीच्या चक्रास घड्याळांतील चक्राप्रमाणें दांते असून ते बसण्यास रेलाला खांचा पाडलेल्या असतात.
६. Wire Rope Tromway. तारेचा रेल्वे.
७. Electric Railway. विजेचा रेल्वे.

या कामांत दिवसेंदिवस विशेष सुधारणा होत चालली आहे.

पूर्वीं ट्रेन जाऊं येऊं लागली म्हणजे निरनिराळीं कामें करण्यास अनेक लोक लागत. अलीकडे असें यंत्र शोधून काढिलें आहे कीं, त्याच्या योगानें गेटरखवालदार, निशाणें दाखविणारा व पॉइंट धरणारा यांचें काम एकच मनुष्य करूं शकतो. हीं यंत्रें यूरोपांतील सुधारलेल्या देशांत चालू आहेत.

आतां दोन शब्द लिहून हें प्रकरण पुरें करतों. या कोर्टांत दूर दूर देशांतील शेंकडों कंपन्यांनीं पदरचे हजारों रुपये खर्च करून लाखों रुपयांचीं यंत्रें व दुसरा माल दाखविण्यास व विकरी करण्यास आणिला होता. पण येथें व्यापार मुळींच झाला नाहीं असें म्हटलें असतां चालेल. कारण प्रदर्शन पहाण्यास जे राजेरजवाडे व श्रीमान् लोक आले होते त्यांनीं या कोर्टांत यंत्रें किंवा दुसरा माल खेरदी केला नाहीं; यामुळें त्या कंपन्यांचे लोक असंतुष्ट झाल्याचे उद्गार कांनीं येऊं लागले होते. ही गोष्ट मोठी खेद करण्यासारखी आहे.

## छोटीं कोर्टें व मजेच्या गोष्टी.

आतां प्रदर्शनांतील मजेच्या दुसऱ्या कांहीं गोष्टी व राहिलेलीं उपकोर्टें यांचें थोडेंसें वर्णन देऊन आम्ही वाचकांचा निरोप घेतों.

**बर्मी लोकांचें नाटक.**—वखारीच्या आंतल्या बाजूस हें नाटक चालू असे. यांतील सोंगें व त्यांचे पेहराव यांत कांहीं अर्थ नव्हता. पात्रांचे अभिनयही आपल्यास चांगले वाटले नाहींत. हीं पात्रें वाकडे मुखवटे घालून एक प्रकारचा नाच करीत. मध्यें गाणीं गाऊन उंच स्वरानें भाषण करीत. तो ओरडा व वाद्यांचा कर्कश घोष हीं मात्र एकसारखीं चालू होतीं.

**ब्यालाक्लेवाची लढाई.**—रशिया देशांत सेब्यास्तपूलजवळ ब्यालाक्लेवा नांवाची एक टेंकडी आहे. तेथें ही लढाई झाल्यामुळें टेंकडीचें नांव लढाईस पडलें आहे. ती इ० स० १८५४ मध्यें झाली. तींत एके बाजूस रशियन् व दुसऱ्या बाजूस इंग्लिश, फ्रेंच व तुर्क लोक होते. एका इंग्लिश चिताऱ्यानें सुमारें आठ हजार फूट लांब

व सात आठ फूट रुंद असा कानवास कापडाचा एक पडदा घेऊन त्याजवर वरील लढाईची तसवीर काढली होती, आणि चोहोंकडून उतरतें एक टेंकाड तयार करून त्यास सृष्टिजन्य टेंकडीची शोभा आणून त्याच्या भोंवतीं हा पडदा उभा केला होता. वरच्या बाजूस चांदणी देऊन मंडप घातला होता. ही लढाई अशी सुरेख व तारीफ करण्यासारखी काढली होती कीं, टेंकडीवर उभे राहून सभोंवताले पाहिले म्हणजे आपण जसें काय खरोखरी चाललेली लढाई पहात आहों असा भास होत असे. ही पहाणारास दोन आणे फी वेगळी द्यावी लागे म्हणून मागें सांगितलेंच आहे.

**फर्नरी वनस्पतिगृह.** हा एक प्रकारचा टुमदार बगीचा इंडियन कोर्टाच्या दक्षिण टोंकास तयार केला होता. यांत लहानसहान पण शोभिवंत व वेंचक अशा वनस्पतींच्या हुंड्या कुंड्यांत लावून ठेविल्या असून मध्यभागीं ग्रीष्मगृह ( समरहाउस ) बनविलें होतें. येथील देखावा मोठा सुरेख होता व हें स्थळ थोडासा वेळ रममाण होण्यास योग्य होतें. अशाच मासल्याचा देखावा एका आस्ट्रेलियन कोर्टांत दाखविला होता.

**अक्केरियम्.**—येथें जलशयांतील चमत्कार दाखविले होते. एक अरुंद व हंगामी पडवी ( वरंडा ) उभारून त्याच्या आंतील दोहों बाजूंस दोन फूट उंचीचा कट्टा बांधला होता. यावर एके बाजूस चौदा व दुसऱ्या बाजूस सात अशा आरशांच्या पेट्या असून त्यांच्यामधून प्रेक्षक लोकांस जाण्या येण्यास तीन फूट रुंदीचा मार्ग सोडला होता. सर्व पेट्या पाण्यानें भरल्या असून तें पाणी खेळतें ठेविलें होतें. पेट्यांच्या तळास वाळू, वाटोळे खडे व लहान मोठे गोटे घातले असून त्यांजवर शेवाळ वाढूं दिलें होतें. त्यांत सोनेरी, तांबडे व दुसऱ्या रंगाचे लहान मोठे मासे, खेकडे व जलांत राहणारे प्राणी सोडले होते. यांतील मोठे मासे दंडाएवढे लठ्ठ व हात सव्वा हात लांब होते. कांसवेंही बरींच मोठीं होतीं. नानाप्रकारचे शंख, शिंपले व दुसरे पदार्थ आंत ठेविले असून लहान जलवेली लावल्या होत्या.

सारांश जलाशयांतील मनोहर चमत्कार दाखविण्यास येथें चांगला यत्न केला होता.

**म्यूझियम् चौकांतील संगमरवरी सिंहासन.**—हें सिंहासन निरनिराळ्या जातींच्या व रंगांच्या सगंमरवरांचें बनविलें होतें. तें ज्या चौकीवर उभारलें होतें तिची लांबी वीस व रुंदी सोळा फूट होती. याचा आकार मोठ्या देव्हाऱ्यासारखा होता. हें काम मोठें सुरेख केलें असून वरच्या बाजूस उत्तम मखमलीचा चांदवा लावला होता. आपले अतिप्रिय व्हॉइसरॉय लॉर्ड रिपन व डयूक ऑफ कानाट यांनीं ता० १ डिसेंबर रोजीं तें विराजमान करून प्रदर्शन चालू केलें. हें काम विएना येथील सिलबर्ग आणि को. नांवाच्या कंपनीनें तयार केलें असून कोणी विकत घेईल तर देण्याचा तिचा इरादा होता.

**सभ्य स्त्रियांचें कोर्ट.**—येथें स्त्रियांनीं हस्तकौशल्यानें केलेलीं कशिद्याचीं जाळीदार व दुसरीं सुरेख कामें दाखविलीं होतीं. खुर्च्या व टेबलें यांजवर घालण्याचे सरपोस, तक्यांचे अभ्रे, टोप्या, गळपट्टे, हातरुमाल, व दुसरे पदार्थ दाखविले होते. यांजवर वेलबुटी व फुलें काढलीं होतीं. एकावर मधमाशांची पोळी काढली असून तिजवर कोळ्यानें आपलें जाळें पसरल्याप्रमाणें काम केलें होतें. कांहींवर कशिद्याचें काम करून त्यांत अरण्यांतील देखावे, फुलपांखरें व लहान पक्षी काढले होते.

**सभ्य स्त्रियांचा तंबू.**—येथें स्त्रियांनीं उपाहार घेण्यास व मजेनें विश्रांति घेत बसण्यास किंवा गप्पा मारीत बसण्यास एक पृथक् जागा तयार केली होती.

**चहाची सिंडिकेट.**—कलकत्ता कोर्टाच्या उत्तरेस टुमदार एक हंगामी बंगला उभारून त्यांत अनेक जातींच्या चहांचे व त्यांच्या बीजांचे मासले दाखविले होते.

**बंगाली पाठशाळा.**—ही शाळा कांचकोर्टाच्या समोर होती. ती आठवडयांतून दोन तीन दिवस चालू असे. त्यांत पंचवीस तीस मुलें होतीं. त्यांस लिहिणें वाचणें, उजळणी व थोडेंसें गणित शिक-

वीत. पंतोजी व मुलें बसकुरांवर बसत. मुलें ताडपत्रांवर अक्षर लिहीत. पंतोजी मुलांकडून पर्वचा म्हणवूं लागला म्हणजे नवीन आलेल्या साहेब लोकांस ती मोठी मौज वाटून थोडा वेळ ते ऐकत उभे राहत.

**लष्करी कोर्ट.**—येथें निरनिराळ्या प्रकारच्या लहान तोफा, बंदुका, तरवारी इत्यादि लढाईंत लागणारीं शस्त्रें, दारूगोळा, काडतुसें व शिपायांस लागणारें दुसरें सामान दाखविलें होतें. याच कोर्टांत एके कपाटांत खिलात, गिझनी, हिरात, व शाइस्थान येथें सांपडलेलीं रुप्याचीं व तांब्याचीं दोन अडीच हजार वर्षांचीं जुनीं नाणीं ठेविलीं होतीं.

**तुरुंगांत तयार केलेले तंबू.**—कांच कोर्टाच्या मागल्या बाजूस लहानसें एक हंगामी कोर्ट उभारलें असून त्यांत आपल्या देशांतील निरनिराळ्या तुरुंगांत तयार केलेले अनेक प्रकारचे तंबू, राहुट्या कनाथी, सत्रंज्या, वेताच्या विणलेल्या खुर्च्या व सुरेख टोपल्या यांचे नमुने दाखविले होते.

**निशाण मारण्याचें दालन.**—येथें निशाण बरोबर लागलें किंवा नाहीं हें समजण्यास कांहीं खुबीदार तजवीज केली होती. निशाण मारणारे शौकी लोक येथें जाऊन निशाणें मारीत आणि त्या कसबांतील आपली हुशारी दाखवीत.

**जलक्रीडेचें साधन व धबधबा.**—प्रदर्शनगृहाच्या आवारांत एक लहान तलाव घेऊन तो चोहोंकडून सुशोभित केला होता. लोकांनीं जलक्रीडेचा सुखोपभोग घ्यावा म्हणून त्यांत लहान प्लेझरबोटी ठेविल्या होत्या. चैनी लोक यांचा उपयोग करीत असत. तलावाच्या कांठीं एके बाजूस कृत्रिम खडक तयार करून त्यावरून एक धबधबा पडत होता. तो एका वाफेच्या यंत्राच्या साहाय्यानें चालू ठेविला होता. तो पाहून मनास मोठी मौज वाटे.

**पुतळे.**—तलावाच्या पलीकडच्या बाजूस स्त्रिया व पुरुष यांचें पुतळे उभे केले होते. ते मोठे सुरेख होते. पण त्यांतील कांहीं अशिष्ट चालीचे होते.

**रथ व गाड्या.**—परदेशीय कोर्टाच्या एका भागांत निरनिराळ्या देशांत तयार केलेले रथ व गाड्या यांचे नमुने दाखविले होते.

**जंगी बाटली.**—एका मोठ्या कंपनीनें दीपमाळेसारखी एक मोठी अवाढव्य कृत्रिम बाटली तलावाच्या एका बाजूस उभी करून तिजवर सुरापानानें बेफाम झालेले व भयंकर मुद्रेचे दोन मोठे पुतळे उभे केले होते.

**कचेरी.**—चौकाच्या पूर्व बाजूस एम्. जोबर्ट यांचे आफिस असून तेथें प्रदर्शनसंबंधी जमाखर्च, पत्रव्यवहार व दुसरीं कामें चालू होतीं.

**बाजार.**—कलकत्ता येथील कांहीं व्यापाऱ्यांनीं इंडियन कोर्टांत जागा भाड्यानें घेऊन दुकानें लावलीं होतीं. त्यांत कलाकौशल्याचे व दुसरे पदार्थ विक्रीस ठेविले होते. पैसा देऊन लगेच पदार्थ आपल्या ताब्यांत यावा म्हणून ज्यांस इच्छा असेल ते लोक येथें खरेदी करीत. फ्रान्स, इटली व टर्की या कोर्टांतील कांहीं व्यापाऱ्यांनीं विक्री करण्याची परवानगी घेतली असल्यामुळें या कोर्टांतही विक्रीचें काम चालू होतें. आग्रा येथें तयार झालेले संगमरवरी दगडाचे कित्येक सुरेख पदार्थ येथें विक्रीस ठेविले होते.

**क्याटलाग व जाहिराती यांचा बटवडा.**—कित्येक कोर्टांतील पदार्थसंग्रहाचे क्याटलाग, त्यांच्या जाहिराती, व प्रदर्शनसंबंधी दररोज निघणाऱ्या वर्तमानपत्रांच्या प्रती वांटण्याची किंवा खपविण्याची गडबड एकसारखी चालू असे. यांतील कांहीं फुकट देत व कांहींस किंमत द्यावी लागे.

**भामटे**—ज्या स्थलीं दररोज हजारों लोक जमून मोठी गर्दी होते तेथें उचले लोक कमरा बांधून तयार असावयाचेच; त्यांजकडून प्रेक्षक लोक बुचाडले जाऊं नयेत म्हणून 'भामट्यांविषयीं सावध असा' या अर्थाचीं इंग्रजी वाक्यें लिहिलेल्या जाहिराती जागोंजाग चिकटविल्या होत्या.

**सुस्वर वाद्यें**—फॉरिन् कोर्टाच्या एका दिवाणखान्यांत निरनिराळ्या प्रसिध्द पंचवीस कारागिरांनीं तयार केलेलीं, पियानो,

हार्मोनियम्, आर्गन व दुसरीं सुस्वर वाद्यें ठेविलीं होतीं. नादलुब्ध लोक केव्हां केव्हां मौजेनें तेथें जमून तीं वाजवीत बसत. तसेंच प्रेक्षक लोक कोर्टें किंवा दुसरे चमत्कार पहाण्यास इकडून तिकडे फिरतां फिरतां अगदीं थकून जात, त्यांस विसावा घेत बसण्याकरितां जागोजाग बांकें मांडलीं होतीं, व त्यांच्या मनोरंजनार्थ तिसरे प्रहरानंतर आठवडयांतून दोन तीन दिवस इंग्रजी ब्यांड, बाजा व दोन दिवस स्वदेशीय वाद्यें वाजवीत असत.

**पोट प्रदर्शनें**—आम्हीं कलकत्ता सोडल्यानंतर हें वडें प्रदर्शन चालू असतां त्यांतच गुरांचें एक व पुष्पांचें एक अशीं दोन प्रदर्शनें झालीं.

प्रदर्शनगृहाचे आवारांत म्यूझियमचा समावेश केला असल्याचें आरंभीं सांगितलेंच आहे. अशी मोठी म्युझियम् हिंदुस्थानांत दुसरीकडे नाहीं. तींतील पदार्थसंग्रहाचें वर्णन देणें म्हणजे एक वेगळाच ग्रंथ लिहिला पाहिजे.

## गेल्या वीस पंचवीस वर्षांत झालेल्या महान् प्रदर्शनांचे टिपण.

| नंबर. | स्थलाचें नांव. | वर्ष. | प्रदर्शनगृहाचें क्षेत्रफल चौ० एकर. | किती दिवस चालू होतें. | प्रदर्शकांची संख्या. | प्रेक्षकांची संख्या. | एकंदर उत्पन्न पौंड्स. | खर्च. | शेरा. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | लंडन........ | १८६२ | २२½ | १७१ | ,, | ६२११९०३ | ४०८५३० | ,, | ही माहिती एम्. जोबर्ट यांचे लेक्चरांतून घेतली आहे. |
| २ | विएना ...... | १८७३ | ,, | ,, | २५७६० | ६७४०५०० | १०६४७७ | ,, | |
| ३ | फिलाडेल्फिया. | १८७६ | ७० | १८० | ,, | ८००४२१४ | ७६३८९९ | ,, | |
| ४ | पारिस ...... | १८७८ | १०० | ,, | ,, | १३०००००० | ,, | १००००० | |
| ५ | सिडनी ...... | १८७९ | १५ | ,, | ९३४५ | १११७५३६ | ४०४३२ | ,, | |